# देव स्वत:स साधेपणात लपवितो, मग त्याचप्रकारे स्वत:स प्रगट करतो

धन्यवाद, भाऊ नेविल. प्रभु तुम्हाला आशीर्वाद देवो. शुभ सकाळ, मित्रांनो. हा माझ्या जीवनातील निश्चितच एक चित्तवेधक महत्त्वाचा भाग आहे, की ह्या सकाळी पुन्हा ह्या भवनात असणे, त्यांची सुंदर रचना, आणि देवाची लेकरे आज त्याच्या भवनात योग्य स्थितीत बसलेली पाहणे.

2 जेव्हा काल येथे मी आलो, मी इतका अचंभीत झालो आणि ह्या इमारतीचे दर्शन पाहीले मी ते कधीच स्वप्नात देखील पाहीले नव्हते की ही अशाप्रकारे असेल. जेव्हा मी ती विस्तृत रुपरेषा पाहिली, जेव्हा त्यांनी ती विस्तृत रुपरेषा आखली, मी दुसरी लहानशी खोली एका बाजूला असलेली पहिली, परंतु आता मी ती—ती सुंदरशी जागा झालेली पाहत आहे. आणि ह्या सुंदर जागेबद्दल आम्ही सामर्थ्यवान देवाचे आभारी आहोत. आणि...

3 मी ह्या सकाळी, माझी पत्नी आणि माझ्या मुलांकडून तुम्हाला शुभेच्छा आणीत आहे, ज्यांचा ह्या समर्पणाच्या विधीसाठी आणि ख्रिस्ताला समर्पण च्या ह्या आठवड्यामध्ये ह्या वेळेस येथे असण्याची फार इच्छा होती. परंतु लेकरांची शाळा आहे, तेथून येथे येणे अवघड आहे. आणि ते जवळ–जवळ घराकडे ओढ लागल्यामुळे थकलेले आहेत, परंतु कधीही त्या भावनेने तुम्हा लोकांपासून दूर होणार नाहीत. तुम्ही दूर होऊ नका. मित्र असल्याप्रमाणे तेथे राहा. आणि मी—मी मित्रांची प्रशंसा करतो, सगळीकडे, परंतु जुन्या मित्रांबद्दल काहीतरी विशेष आहे. तुम्ही कितीही नवीन मित्र करा ते जुन्यासारखे नसतात.

4 मी कितीही ठिकाणी आजपर्यंत फिरलो, हे स्थळ नेहमीच पवित्र असेल, कारण तीस वर्षांमागे, एका चिखलाच्या तलावात, मी ह्या जागेचा तुकडा येशू खिस्ताला समर्पित केला जेव्हा तेथे काहीच नव्हते परंतु एका काए —चिखलाचे तळे. हा संपूर्ण, तलाव होता. म्हणूनच तेथे रस्ता पूर्ण बाहेर आहे, रस्ता सभोवताली गेला आहे, तलावातून बाहेर येण्यासाठी तो येथून आहे. आणि येथे मध्ये फूले असत, तलावांतून फूले वर आलेली.

5 आणि लीली हे एक विचित्र फूल आहे. जरी ते चिखलात जन्म घेते, तिला चिखलातून मार्ग, काढावा लागतो, आणि मग पाण्यातून आणि चिखलांतून, तिची सुंदरता दाखविण्यासाठी ती वर येते.

6 आणि मला—मला वाटते, ह्या सकाळी, तोच सर्व समुदाय येथे गोळा झाला आहे. त्या वेळेपासून, तो लहान तलावाने फूले वर उमलली आहेत; आणि ती जेव्हा पाण्याच्या वर आली आहेत तिने आपले पंख पुढे पसरविले आहेत, तिच्या लहान पाकळ्या बाहेर आल्या आहेत, आणि ते दरीतले कमळ म्हणून प्रतिबिंबित झाले आहे. ते खूप काळ उभे राहो! ते देवाला पूर्णपणे समर्पित केलेले घर होओ!

7 हे प्रार्थना मंदिर 1933 मध्येच समर्पित केलेले आहे. परंतु, ह्या सकाळी ते पुन्हा ह्या छोट्याश्या प्रार्थनेद्वारे समर्पित व्हावे ही एक—एक चांगली गोष्ट आहे, आणि विशेषतः ह्या लोकांना, ज्यांनी त्यांच्या ख्रिस्तावरील प्रेम आणि एक निष्ठतेद्वारे, हे सगळे शक्य केले आहे. आणि मी तुम्हा प्रत्येक जणांचा तुमच्या अर्पणाबद्दल धन्यवाद देऊ इच्छितो आणि सर्वांबद्दल, जे तुम्ही हे प्रार्थनागृह ख्रिस्ताला समर्पित करण्यासाठी केले.

8 आणि मी अत्यंत कौतुक करतो, आणि मंडळीचे आभार मानतो की हे शब्द आमच्या प्रिय बंधूजनांतर्फे येथे मंडळीत बोलण्यासाठी, ज्यांनी ह्यासाठी श्रम घेतले आहेत. भाऊ बॅक्स वूड, आपला थोर भाऊ; भाऊ रॅाय रॅाबर्सन, आपले थोर भाऊ आणि अनेक इतर ज्यांनी, निस्थार्थीपणे आणि अंतःकरणाच्या एकाग्रतेने, हे ठिकाण त्या पध्दतीने बांधण्यासाठी किती महिने श्रम घेतले, येथे राहीले ह्यासाठी की हे बरोबर बांधले जावे.

9 आणि जेव्हा मी आत आलो, येथील मंच पाहण्यासाठी, ते अगदी असे होते ज्या प्रकारे मी माझ्या संपूर्ण जीवनात तसे असण्याची इच्छा केली होती! मला…भाऊ वूडना माहीत होते की मला काय आवडते. त्यांनी कधीही सांगितले नाही की तो ते बांधील, परंतु त्यांनी ते बांधले आहे.

10 आणि मी इमारत पाहिली आणि कशा प्रकारे बांधकाम आहे, ते खरेच, आहे, ते अप्रतिम आहे. आणि आता माझ्या भावना प्रगट करण्यासाठी तेथे शब्द उरले नाहीत. पाहा, तेथे करण्यास मार्गच नाही. आणि, परंतु, देव जाणतो. आणि तुम्हा प्रत्येक जणास ह्या सहाय्याबद्दल आणि जे, सर्व हे स्थळ बनण्यासाठी तुम्ही जे योगदान केले, ही इमारत प्रभूचे घर ज्याप्रकारे बनण्यासाठी, तुम्हास प्रतिफळ मिळो. आणि आता मला—मला हे शब्द बोलण्यास आवडेल. आता, ही इमारत जशी आतून तशी बाहेरुन ही फार सुंदर आहे…

11 माझे, मेहूणे, ज्युनिअर वेबर, ह्यांनी वीटेचे दगडी बांधकाम केले. मला वाटत नाही की जे आता आहे त्यापेक्षा अधिक चांगले कुठले काम असू शकेल, परिपूर्ण काम.

12 दूसरे भाऊ जे येथे होते, मी त्या मनुष्याला कधी भेटलो नाही, त्यांनी येथील आवाज प्रणाली केली आहे. परंतु अवलोकन केले की ह्यासारख्या सपाट इमारतीतही तेथे आवाजाविषयी असे वैशिष्ट्य आहे की तो आवाज परत येत नाही. ते येथे छतामध्ये वेगळवेगळ्या प्रकारे लावले आहेत. मी कुठेही उभा राहिलो, तरी ते तसेच आहे, पाहा आणि प्रत्येक खोली अशी बांधलेली आहे—आहे, की त्यात ध्वनिप्रक्षेपक यंत्र आहेत, आणि तुम्ही जसे पाहिजे तसे ऐकू शकता. मी विश्वास करतो ज्यांनी ह्या गोष्टी केल्या त्यांच्यावर सर्वसमर्थ देवाचा हात होता. आता जर…

13 आपल्या प्रभूने ही इमारत ह्यासाठी आपल्याला दिली की आपण त्याची भक्ती अधिक चांगल्या प्रकारे करु शकू, जी तीस वर्षांअगोदर होती. आम्ही सुरुवातीला मातीच्या जमिनीवर, भूमिवर, आणि येथे कोळशाच्या विस्तवा बाजूस बसत होतो. आणि कंत्राटदार भाऊ वूड, त्यांतील एक आणि भाऊ राबर्सन, मला सांगत होते की जेथे ते स्तंभ होते, आणि ते जुने स्टोव्हस तेथे लाकडांध्ये लावलेले असत, त्यांना आग लागली आणि जळले, दोन–तीन फूटावर आग लागली ते खाली का जळले नाही, फक्त देवानेच ते तसे ठेवले. आणि जळल्यानंतरही, त्या आराधनालयाचे पूर्ण वजन त्यावर होते, ते का आत पडले नाही; कारण फक्त परमेश्वराचा हात. आता ते खाली स्टीलने बांधले आहे आणि जमिनीवर मजबूतीने बांधले आहे.

14 आता मला वाटते हे आपले कर्तव्य आहे की आतील गोष्टी देवाच्या कृपेने ठीक कराव्या, देवाचे आभार मानावे की…ही केवळ एक सुंदर इमारत होणार नाही की ज्यात आम्ही यावे, परंतु प्रत्येक व्यक्ती जो आत येईल तो प्रत्येकामध्ये येशू ख्रिस्ताचे सुंदर चारित्र्य पाहील. ही जागा आपल्या प्रभूला समर्पित होवो. समर्पित लोक. कारण, हे बांधकाम कितीही सुंदर का असेना. त्याची आपण निश्चितच वाखाणणी करु, मंडळीचे सौंदर्य हे तेथील लोकांचे चारित्र्य आहे. मी विश्वास करतो ते नेहमीच देवाचे घर, सुंदरतेचे घर होईल.

15 आता, मूळचा कोनशीला, लावण्याच्या समर्पणाच्या कार्यक्रमाच्या वेळेस, एक महान दृष्टांत आला आणि तो कोनशीलेवर लिहीला आहे, त्या सकाळी मी त्याचे समर्पण केले.

16 आणि तुम्हाला आश्चर्य वाटले असेल, काही मिनिटांअगोदर, मी का एवढ्या लांब आलो आहे. माझे प्रथम कर्तव्य. जेव्हा मी ह्या नविन आराधनालयात आलो, मी एका तरुण पुरुषाचा आणि स्त्रीचा ह्या कार्यालयात विवाह केला, ते कदाचित दर्शक असेल की मी ख्रिस्ताचा विश्वासयुक्त सेवक होईन जो वधूला त्या दिवसाच्या समारंभासाठी तयार करील.

17 आणि आता आपण असे करु जसे आपण प्रारंभी केले होते. जेव्हा आम्ही ह्या आराधनालयाचे पहिले समर्पण करण्यास सुरुवात केली, मी एक तरुण पुरुष होतो आणि, मी एकवीस बावीस वर्षांचा असेन जेव्हा आम्ही हा कोनशिला बसविला. ते माझ्या लग्नाअगोदर झाले. आणि मला नेहमीच वाटत होते की ही जागा योग्य चांगल्या स्थितीत पहावी. ह्यासाठी देवाने...त्याच्या लोकांबरोबर भक्ती करताना पहावे. आणि आपण हे फक्त करु शकतो, सुंदर इमारतीद्वारे नाही. परंतु केवळ समर्पित जीवनाद्वारेच आपण हे करु शकतो.

18 आणि आता, आम्ही हे समर्पित करण्याआधी, समर्पणाची प्रार्थना, काही पवित्र शास्त्रातील वचने वाचू या, आणि देवाला हे आराधनालय पुन्हा समर्पित करु या. ह्या... सकाळी माझ्याकडे सुवार्तेवरचा संदेश आहे, माझा येणारा संदेश बनविण्यासाठी.

19 आणि, आज रात्री, मी प्रकटीकरणाचा 5 वा अध्याय घेऊ इच्छितो, जो सात मंडळीच्या युगापासून सात शिक्क्यापर्यंत—पर्यंत मिश्रीत आहे...

20 सोमवारी रात्री पांढऱ्या घोडेस्वाराविषयी पाहत आहोत. मंगळवारी रात्री...काळा घोडेस्वार, आणि अशाप्रकारे चारही घोडेस्वार. आणि नंतर सहावा शिक्का फोडला जाईल.

21 आणि नंतर रविवारी सकाळी, पुढच्या रविवारी सकाळी, जर प्रभूची इच्छा असेल... आपण दूसरे पाहू, त्याविषयी नंतर घोषणा होईल पुढच्या रविवारी सकाळी कदाचित, आजाऱ्यांसाठी प्रार्थना सभा ह्या इमारतीत होईल.

22 आणि नंतर रविवारी रात्री, समाप्ती...होईल प्रभू आपल्याला सातवा शिक्का उघडण्यासाठी सहाय्य करो, तेथे जे लहानसे वचन आहे. आणि ते असे म्हणते, “स्वर्गात सुमारे अर्धा तास पर्यंत निवांत झाले,” त्या शांततेद्वारे.

23 आता मला माहीत नाही ह्या शिक्क्याचा अर्थ काय आहे. माझ्या समजण्यापलीकडे आहे. कारण कदाचित तुमच्यातील काही ह्या सकाळी तसेच आहेत. आपल्याकडे उपदेशकाच्या कल्पना असतात ज्या माणसांनी सादर केलेल्या असत, परंतु त्या कधीच त्यास स्पर्श करु शकत नाही. आणि जर तुम्ही पाहीले, त्या प्रेरणेद्वारे याव्या लागतात. तो देव स्वतःच असला पाहीजे, तोच एक आहे जो ते करु शकतो, कोकरा.

आणि ह्या रात्री ते मुक्तीचे पुस्तक आहे.

24 आता, ह्याच कारणासाठी मी आजाऱ्यांसाठी प्रार्थना सभांची घोषणा करीत नाही, किंवा असेच काही, मी...मी काही मित्रांसोबत राहत आहे, आणि मी माझ्या वेळेची प्रत्येक मिनीट अभ्यास आणि प्रार्थनेसाठी देत आहे. आणि तुम्हाला ठाऊक आहे की येथून जाण्यापूर्वी आणि पश्चिमेकडे जात असता मला दृष्टांत झाला जो ते सात देवदूत उडत आले. तुम्ही ते थोडे नंतर समजाल.

25 म्हणून आता, ह्या इमारतीत, मला वाटते की आपल्याकडे ह्या गोष्टी हव्या, जर तिचे समर्पण झालेले आहे, किंवा काही मिनीटातच समर्पण होणार आहे, देवाच्या भक्तिसाठी, आपण ती त्या प्रकारे ठेवली पाहीजे. आपण ह्या इमारतीत कधीच विक्री किंवा खरेदी करु नये. आपण—आपण ह्या सभागृहात कोणताही व्यवसाय कधीच करु नये. ते येथे कदापि करता कामा नये, जसे सेवकांना येथे येण्याची व पुस्तके विकण्याची परवानगी देणे किंवा सर्व काही. ते काहीही का असेना, तेथे हे करण्यासाठी इतर जागा आहेत. म्हणूनच आपण खरेदी आणि विक्री प्रभूच्या घरात करु नये. ती भक्तीची पवित्र, त्या हेतूसाठीच समर्पित जागा असली पाहीजे. पाहा? आता, त्याने आपल्यासाठी चांगली जागा दिली आहे. आपण ती त्याला समर्पित करु या, आणि तिच्यासोबत स्वतःलाही त्यास समर्पित करु या.

26 आणि आता हे तुम्हाला जरासे उध्दटपणाचे वाटेल, परंतु, ती भेटण्याची जागा नाही. ती आराधनेची जागा आहे. आम्ही कदापि येथे आत एकमेकांशी अगदी एकाही शब्दाची कुरकुर करु नये आराधने व्यतिरिक्त, जर ते अति आवश्यक असले तरच. पाहा? आपण सभोवती कदापि मेळावा भरु नये. आपण त्या इमारतीमधून कधीही धाऊ नये, आपल्या मुलांना इमारतीमध्ये धाऊ देऊ नये. आणि असे केल्याने, आपण ते बांधले आहे ह्यास आपण ह्या सर्वांची काळजी घेऊ शकू. आता, आपण येथे आहोत. अर्थात, कितीतरी लोकं अनोळखी आहेत. प्रार्थना मंदिरातील लोक हे जाणतात की ही इमारत सर्वसमर्थाच्या सेवेसाठी समर्पित केली जाणार आहे. म्हणून स्वतःला समर्पित करा, लक्षात ठेवू या, जेव्हा आपण ह्या पवित्र स्थानात प्रवेश करु, एकमेकांशी शांत राहा, आणि देवाची भक्ती करा.

27 जर आम्ही एकमेकांना भेटू इच्छितो, तेथे अशी जागा आहे जेथे आपण एकमेकांना भेटू शकतो. परंतु, कदापि, सभोवती फिरत राहू नका, जेथे तुम्ही स्वत:विषयी ऐकण्याचा विचारही करु शकत नाही, आणि कोणी व्यक्ती आत आला आणि त्यांना काय करावे हे कळणार नाही, पाहा, तर येथे एवढा आवाज आणि अशा गोष्टी असल्यास. ते मानवरितीने आहे, हे मी मंडळ्यात पाहिले आहे ते पाहून मला अतिशय वाईट वाटले. कारण आपण प्रभूच्या पवित्र स्थानात एकमेकांना भेटण्यास येत नाही. आम्ही येथे देवाची भक्ती करण्यासाठी येतो, नंतर आपल्या घरी जातो. हे पवित्रस्थान भक्ती करण्यासाठी समर्पित केले आहे. जेव्हा...बाहेर उभे राहता, तुम्हाला वाटेल तसे बोलता, जोपर्यंत ते योग्य आणि पवित्र आहे. एकमेकांच्या घरी जा. एकमेकांना एखाद्या ठिकाणी भेट द्या. परंतु जेव्हा तुम्ही त्या दरवाजाच्या आत प्रवेश करता, शांत राहा.

28 तुम्ही येथे त्याच्याशी बोलण्यासाठी येता, पाहा, आणि त्यालाही तुमच्याशी बोलू द्या. येथे समस्या ही आहे, आपण खूप बोलतो, आणि पुरेसे ऐकून घेत नाही. नंतर, जेव्हा आपण येथे आत येतो, त्याच्यावर अवलंबून राहतो.

29 आता, ह्या सकाळी येथे एकही मनुष्य उपस्थित नाही, जो जुने प्रार्थनामंदिर समर्पित केले त्या दिवशी तेथे होता, जेव्हा मेजर अलरिचने वाद्य वाजविले. आणि मी तेथे तीन वधस्तंभाच्या मागे ही जागा समर्पित करण्यासाठी उभा होतो. मी कोणालाही परवानगी देणार नाही...प्रेक्षकगृहात जागा दाखविणारे भाऊ दाराशी उभे राहतील, जे पाहतील की कोणीही बोलणार नाही. जेव्हा, तुम्ही आपले बोलणे बाहेर पूर्ण कराल. तुम्ही आत या. जर तुमची इच्छा असेल तर, शांततेने, तुम्ही वेदीजवळ या आणि शांततेने प्रार्थना करा. तुम्ही तुमच्या जागेवर परत जा, पवित्र शास्त्र उघडा. तुमच्या शेजाऱ्याने काय केले, ते त्याच्यावर आहे. तुम्हाला काही बोलायचे नाही. जर तुम्हाला त्याच्याशी बोलायचे असेल, म्हणा, "मी त्याला बाहेर भेटीन. मी येथे आत प्रभूची आराधना करण्यास आलो आहे." तुम्ही त्याचे वचन वाचा, आणि शांत बसा.

30 आणि नंतर संगीत, बहिण गर्टी, मला माहीत नाही ती ह्या सकाळी येथे आहे, किंवा नाही; बहीण गिब्स् जुना पियानो, मी विश्वास ठेवतो, माझ्या उत्तम आठवणीनुसार, मागे ह्या कोपऱ्यात ठेवला होता. आणि ती तो वाजवीत असे, "वधस्तंभावर जेथे माझा उध्दारकर्ता मरण पावला," खरे, मधुर, सौम्य संगीत, आणि—आणि मग, सभा सुरु होण्याची वेळ येईपर्यंत. आणि गाणी म्हणण्यास पुढाकार घेणारा उठे आणि काही सभा गीते गाई. आणि नंतर जर त्यांच्याकडे कोणी विशेष एकटाच गाणे गाणारा असल्यास, ते तो गात असत. परंतु, काहीही करा असे सतत झुंड बनू नका. आणि नंतर संगीत सतत चालू राहील. आणि मग जेव्हा मी ते ऐके, मला समजत असे की माझी बाहेर येण्याची वेळ आली आहे.

31 जेव्हा सेवक मंडळीतील लोक प्रार्थना करीत असताना आत येतो, आणि आत्म्याचा अभिषेक होत असतो, तू स्वर्गातून ऐकणारच. तेच सर्व आहे. तेथे, त्यापासून दूर ठेवण्याचा मार्गच नाही. परंतु जर तुम्ही गोंधळात येता, तेव्हा तुम्ही—तुम्ही...तुम्ही—तुम्ही इतके गोंधळून जाता, आणि आत्म्याला खिन्न करता; आणि आपल्याला ते नको आहे, नाही. आपण येथे आराधनेसाठी येऊ इच्छितो. आपल्याला सुंदर घरे आहेत, त्याविषयी मी काही क्षणातच बोलणार आहे, आणि तसेच पुढे; घरी, जेथे आपण आपल्या मित्रांना भेटी देतो आणि त्यांना नेतो. हे देवाचे घर आहे.

32 आता, तेथे लहान लेकरे आहेत, आता, लहान बालके. आता, त्यांना फरक कळत नाही. ते, त्यांना काही हवे असल्यास तो मिळविण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे त्यासाठी रडणे. आणि कधी-कधी त्यांना ते पाणी प्यायचे असते, आणि कधी त्यांना आपले लक्ष वेधून घेण्याची गरज असते. आणि म्हणूनच आपण, देवाच्या कृपेने, त्यासाठी एक खोली समर्पित केली आहे. तिला "रडण्याची खोली," असे म्हटले आहे. परंतु ती सरळ माझ्यासमोर आहे. दुसऱ्या शब्दांत, ती अशी आहे की जेथे माता त्यांच्या बालकांना घेऊ शकतात.

33 आता, त्याने, मला येथे मंचावर असताना कधीच त्रास होत नाही. मी त्याकडे पहातही नाही, अभिषेकाखाली असल्यामुळे. परंतु तेथे इतर लोक जवळ बसलेले असतात, आणि त्याचा त्यांना त्रास होतो, पाहा, आणि ते येथे प्रार्थनेसाठी येतात. म्हणून मातांनो...तुमचे लहान बालक हुंदके देण्यास सुरुवात करते, तुम्ही त्यात काही करु शकत नाही. का... तुम्हाला त्यास आणले पाहिजे. जी खरी आई आहे ती तिच्या लेकराला मंडळीत आणू शकते, आणि ती गोष्ट तुम्ही केलीच पाहीजे.

34 आणि आपल्याकडे येथे एक खोली आहे जेथून तुम्ही इमारतीचा प्रत्येक कोपरा पाहू शकता, संपूर्ण सभागृह; आणि वक्ता तेथे, जेथून तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे आवाजावर नियंत्रण ठेवू शकता; एक—एक शेवटी असलेले शौचालय, आणि हात धुण्याचे बॅसिन, आणि सर्वकाही आईच्या सुविधेसाठी. खुर्च्या आणि गोष्टी, तुम्ही बसू शकता; बालकांचे कपडे बदलण्यासाठी जागा, जर ते बदलण्याची गरज असेल, आणि तेथे सर्वकाही आहे: ते सर्व घट्ट बसविलेले आहे.

35 आणि मग, कित्येक वेळा, मंडळीत किशोरवयीन मले आणि कधी युवक...तुम्हाला माहीत आहे, तरुणजन चिठ्ठी पाठवितात किंवा कात्रणे, किंवा असेच काही आता, तुम्हाला समजण्याइतके तुम्ही वयात आलेले आहात. पाहा? तुम्हाला त्यापेक्षा अधिक कळले पाहीजे. पाहा? तुम्ही येथे येता कामा नये...जर तुम्ही एके दिवशी खरा मनुष्य बनू इच्छिता, आणि देवाच्या राज्यासाठी एक कुटूंब वाढवू इच्छिता तर आता पासूनच त्याची सुरुवात करा, तुम्ही पाहा, आणि—आणि योग्य वागा आणि योग्य करा, आणि आता, अर्थात.

36 आता, तेथे इमारतीच्या कोपऱ्यात स्वयंसेवक उभे आहेत, आणि तसेच पुढे. आणि जर कोणी असे करत असल्यास, त्यांची—त्यांची नेमणूक करण्यात आली आहे, त्यांचे काम करण्यासाठी, म्हणून आणि विश्वस्त येथे समोर बसतात, जर कोणी गैरवर्तणुक करताना आढळले, त्यांना, त्या व्यक्तीला गप्प बसविण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

37 मग, जर त्यांना तो आदर नसेल, तर हे योग्य होईल की दुसरे कोणी त्या जागेवर बसावे, कारण तेथे कोणीतरी आहेत जे ऐकू इच्छितात. तेथे असे काही आहेत जे ऐकण्याच्या उद्देशाने येथे आले आहेत. आणि त्यासाठीच आपण येथे आहोत, देवाचे वचन ऐकण्यासाठी. आणि म्हणूनच सर्वजण ते ऐकू इच्छितात, आणि ते होईल तितके शांततेने ऐकू इच्छितात; ते होईल तितके शांततेने; तो, बोलणारा किंवा करणारा समुह नाही.

38 अर्थात, कोणीतरी प्रभूची आराधना करणारे, तेच अपेक्षित आहे. ते तसेच असले पाहीजे. त्यासाठीच तुम्ही येथे आहात, प्रभूची आराधना करण्यासाठी. जर तुम्हाला देवाची स्तूती करण्यास ओरडावे वाटत असेल तर तसे करा, पाहा, कारण त्यासाठीच तुम्ही येथे आहात, पाहा, परंतु, देवाची आराधना तुमच्या स्वतःच्या पध्दतीने करा. परंतु तेथे कोणीही प्रभूची आराधना करु शकत नाही, जेव्हा तुम्ही बोलता आणि चिठ्या फिरविता, आणि तुम्ही कोणालातरी देवाच्या आराधनेपासून दूर नेण्यासाठी मदत करता, पाहा, म्हणून आम्हाला वाटते ते चुकीचे होईल. आणि आम्ही आपल्या कलीसियात आपल्या मंडळीत, ह्या इमारतीत तो नियम करु इच्छितो, हे प्रार्थनामंदिर देवाच्या राज्यासाठी आणि वचनाचा प्रचार करण्यासाठी समर्पित केले जाईल. प्रार्थना! आराधना! तेच कारण आहे ज्यासाठी तुम्ही येथे आले पाहिजे, आराधना करण्यासाठी.

39 आणि दुसरी गोष्ट, जेव्हा सभा संपते, बहुदा मंडळीतील लोक...मला—मला वाटत नाही की येथे तसे आहे, कारण...सभेनंतर मी पूर्णपणे गळून जातो, पाहा, कारण मी निघून जातो.

40 सामान्यत:, इतर सभांमध्ये प्रचार करताना, अभिषेक येतो, आणि दृष्टांत येतात. आणि मी बाहेर जातो, आणि मी रुममध्ये जातो, आणि बीली किंवा तेथील काही जण, मला घरी घेऊन जातात, आणि मला त्या स्थितीतून बाहेर येण्यासाठी थोडा वेळ विश्रांती घेऊ द्या, कारण ते खूपच मानसिक ताणाचे आहे.

41 आणि मग मी अशा मंडळ्या पाहील्या आहेत, जेथे मुलांना संपूर्ण पवित्र स्थानात धावण्याची परवानगी देतात, आणि—आणि प्रौढ खोलीत एकमेकावर ओरडत उभे राहतात. ती सभेची नासाडी करण्याबाबत एक चांगला मार्ग आहे, आणि त्या रात्रि किवां कुठलाही वेळ असो. पाहा?

42 सभा समाप्त, सभागृहातून बाहेर पडा. त्यावेळी तुम्ही सतत आराधनेत असता. नंतर बाहेर जा एकमेकांशी बोला, आणि तुम्हाला हवे ते करा. जर तुम्हाला कोणाशी काही बोलायचे असेल, भेटायचे असेल, तर तुम्ही त्यांच्याबरोबर जा किंवा त्यांच्या घरी जा किंवा जे काही आहे, परंतु ते सभागृहात करु नका, आपण हे देवाला समर्पित करु या. पाहा? ही त्याची भेटण्याची जागा आहे, जेथे आपण त्याला भेटतो. पहा? आणि कायदा पवित्रस्थानातून निघतो, आणि मी—मी विश्वास करतो की हे आपल्या स्वर्गीय पित्याला संतोषदायक आहे.

43 आणि मग जेव्हा तुम्ही येता, आणि तुम्हाला कळते की दानाचा तुमच्यामध्ये वर्षाव होण्यास सुरुवात होते...मी विश्वास करतो की ते येथे कदापि होणार नाही; परंतु, जेव्हा लोकांना नविन प्रार्थनागृह मिळते, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, मंडळी औपचारिक

बनते, तुम्ही तसे होण्याची कदापि इच्छा करु नका. शेवटी ही आराधनेची जागा आहे, हे देवाचे घर आहे. आणि जर आध्यात्मिक दानांची तुमच्यात येण्यास सुरुवात झाली...

44 मला ठाऊक आहे, की मी गेल्यापासून, लोक देशाच्या निरनिराळ्या भागांतून, येथे हे त्यांचे घर बनविण्यासाठी आले आहेत. मी देवाचे आभार मानतो. देवाला धन्यवाद देतो,

45 त्या सकाळी जेव्हा मी समर्पण केले आणि तेथे कोनशीला बसविला, तरुण युवक म्हणून, मी प्रार्थना केली की येशू ख्रिस्ताचे येणे पाहण्यासाठी ते उभे राहावे. आणि जेव्हा मी केले, हजारो डॉलर्सचे कर्ज घेतले. आणि मंडळीच्या अर्पणातून तुम्ही तीस किंवा चाळीस सेंट्स घेऊ शकता, आणि...आम्हाला प्रत्येक महिन्याला जवळपास एकशे पन्नास, दोनशे डॉलर्स देणे होते. मी ते कसे देऊ शकत होतो? आणि मला माहीत होते की मी काम करीत होतो, आणी मी ते परत फेडीन. सतरा वर्षांच्या पाळकीय सेवेत एकही सेंट न घेता, परंतु माझ्याकडे असलेले सर्वकाही, स्वत:ला, माझ्या उपजीविकेशिवाय; आणि जे सर्व मागे ठेवलेल्या लहान पेटीत येत असे, देवाच्या राज्यासाठी देत होतो.

46 आणि लोक भविष्य सांगू लागले आणि अंदाज करु लागले की एका वर्षाच्या आत ह्याचे रुपांतर गॅरेजमध्ये होईल. शैतानानेही एकदा दोष, फसवणुकीच्या खटल्याद्वारे ते आमच्यापासून घेण्याचा प्रयत्न केला. एका मनुष्याने दावा केला की तो ते काम करीत असताना त्याच्या पायाला दुखापत झाली आणि नंतर ते जाऊ दिले, आणि त्याने फिर्याद दाखल केली आणि हे प्रार्थनामंदिर घेऊ पाहत होता. आणि कित्येक आठवडे मी त्या ठिकाणी उभे राहीलो. परंतु सर्व गैरसमज आणि अंदाज, आणि ते, काय काय, बोलले, तरीसुध्दा, ते आज अनेक सुंदर सभागृहातील एक असे उभे आहे आणि अमेरिकेतील अप्रतिम कलिसियामध्ये एक. ते बरोबर आहे.

47 येथूनच जीवंत देवाचे वचन, संपूर्ण जगभर गेले, पाहा, जगभर. आणि त्याचे सलग वर्तुळ पृथ्वीवर, आकाशाखालील प्रत्येक देशात, जेवढे आम्हाला ठाऊक आहे, जगभरात पूर्ण झाले ह्यासाठी आपण उपकार स्तुती करु या. ह्यासाठी आपण धन्यवाद देऊ या.

48 आणि आज आपल्याकडे अशी जागा राहण्यासाठी आहे, आपल्या डोक्यावर एक छप्पर, एक स्वच्छ, सुंदर आराधनालय आत बसण्यासाठी, आपण नव्याने ह्या कार्यासाठी स्वत:ला समर्पित करु या, आणि स्वतःला ख्रिस्तास अर्पण करु या.

49 आणि भाऊ नेविल, आपले थोर भाऊ, खरे पाळक, जीवंत देवाचे सेवक. जोपर्यंत त्या मनुष्याला संदेश समजतो, तो जे सर्व त्याच्याकडे आहे. त्यासह पकडतो. ते खरे आहे. तो सभ्य मनुष्य आहे. तो जरा भिणारा आहे...किंवा भिणारा नाही, मला तसे म्हणायचे नाही. परंतु, तो, इतका भीषण सभ्य आहे, तो बोलत नाही, तुम्हाला ठाऊक आहे. जसे हे बोलणे ते धारधार आणि कापणारे किंवा "खाली बसा" किंवा "शांत बसा!" मी—मी हे पाहिलेले आहे, आणि ध्वनिमुद्रणात ऐकले आहे.

50 परंतु ते असे घडते की मी ते करु शकतो. माझी—माझी...माझी—माझी इच्छा आहे तुम्ही माझे शब्द लक्षात ठेवावे, तुम्ही पाहीले, आणि हे सर्व ध्वनीमुद्रीत केले जात आहे. पाहा. सर्व गोष्टी ध्वनीमुद्रीत केल्या जात आहेत, आणि, कृपया, प्रत्येक डिकन सहकारी त्याला नेमून दिलेल्या कामासाठी उभा राहो, आणि लक्षात ठेवा की तुम्ही देवाने नेमून दिलेली सेवकाईच्या अधिन राहून ती कामगिरी पवित्रतेने पार पाडा. पाहा? प्रत्येक विश्वस्त, त्याच प्रकारे...

51 ते पाळकासाठी योग्य नाही की त्याबाबतीत त्यांनी बोलावे. ते विश्‍वस्त...किंवा डिकन सहकारी, कारण ते मंडळीचे पोलीस आहेत. जर तरुण जोडपे बाहेर येते आणि भोंगा वाजवितो आणि, तुम्हाला ठाऊक आहे, ते नेहमी कसे करतात, किंवा असेच काहीतरी,

सभेच्या ठिकाणी, किंवा तेथे बाहेर येतात. आणि आई तिच्या मुलीला येथे खाली पाठविते, आणि ती कोणा विश्वासघाती मुलासोबत बाहेर जाते, आणि तेथे मोटारीत फिरते, आणि तिच्या आईला वाटते ती मंडळीत आहे, असेच काही. सहकारी डिकन ह्यांनी हे पहावयास हवे. “तुम्ही एकतर येथे आत या आणि खाली बसा, किंवा मी माझ्या मोटारीत नेतो आणि तुझ्या घरी तुझ्या आईजवळ सोडतो.” पाहा? तुम्ही असे केले पाहीजे.

52 लक्षात ठेवा, प्रेम हे नेहमी सुधारणा करणारे असते. खरे प्रेम सुधारणा करणारे असते, म्हणून तुम्ही त्याप्रमाणे सुधारणा केली पाहीजे. आणि मातांनो, तुम्हाला ठाऊक आहे की तेथे तुमच्या बालकांसाठी जागा आहे. तुम्हा तरुण लेकरांना इमारतीत धावण्यापेक्षा निराळे ठाऊक आहे, आणि तुम्ही प्रौढ तुम्हाला सभागृहात बोलणे आणि इतर संभाषण करण्याव्यतिरिक्त दुसऱ्या गोष्टी ठाऊक पाहीजे. पाहा ते तुम्ही करु नका ते चुकीचे आहे. ते देवाला संतोषदायक नाही.

53 येशूने म्हटले, “असे लिहीले आहे, माझ्या घरास प्रार्थनेचे मंदिर. सर्व राष्ट्रे त्यास प्रार्थनेचे मंदिर कसे म्हणतील!” आणि ते तेथे क्रयविक्रय करीत होते, आणि त्याने कबुतरे, विकणाऱ्याच्या बैठकी पालथ्या केल्या आणि लोकांना प्रार्थनागृहाच्या बाहेर काढले. आणि आपली नक्कीच तशी इच्छा नाही की ह्या पवित्रस्थानात येथे तसे व्हावे. म्हणूनच, आपण आपले जीवन, आपली कलीसीया, आपले काम, आपली सेवकाई, आणि आपले सर्वकाही, देवाच्या राज्यासाठी समर्पित करु या.

54 आता आपण समर्पणाची प्रार्थना करण्या आधी मी काही वचने वाचू इच्छितो. आणि—आणि नंतर, तेथे पुर्नसमर्पण होईल, कारण खरे समर्पण तीस वर्षां अगोदर झालेले आहे. आता...आपण—आपण ही पवित्रशास्त्रातील वचने वाचू या आणि त्यावर काही वेळ बोलू या, मी विश्वास करतो की देव त्याचा आशीर्वाद तुम्हावर आणील.

55 आणि तेथे आणखी एक गोष्ट मी सांगणार होतो. हो. जेथे आपण ध्वनिमुद्रण करीत असू आणि, असेच पुढे, आपल्याकडे तेथे तशी खोली आहे, जेथे ज्यांना ध्वनीमुद्रण घ्यावयाचे आहे ते घेऊ शकतात. तेथे खास यासाठी यंत्रणा आहे, आणि तेथे सर्वकाही आहे; ते थेट मुख्य माईकपासून येते.

तेथे खोल्या, वस्त्रे, सर्वकाही बाप्तिस्म्याच्या विधीसाठी आहे.

56 आणि मग एक गोष्ट,कित्येक लोकांना माझ्या विषयी वाईट वाटते. कित्येक लोक ज्यांना खरोखरच पवित्र शास्त्रातील वचने, वधस्तंभ प्रार्थनामंदिरात लावण्याविषयी माहीत नाही. मला लक्षात आहे एकदा ह्याविषयी काही घडले. माझ्याकडे तीन वधस्तंभ होते, आणि आणि भाऊ त्याविषयी अडखळला कारण त्याने ऐकले इतर संप्रदाय म्हणतात की वधस्तंभ म्हणजे कॅथलिक.

57 मला काही विद्यार्थी हवेत किंवा नविन जन्म पावलेले ख्रिस्ती, जे सांगतील की कॅथलिककडे वधस्तंभावर पर्याय आहे. ख्रिस्ताचा वधस्तंभ कॅथलिकवादाला दर्शवित नाही. तो देव, त्याचे राज्य, याला दर्शवितो. आता, संत कॅथलिकवादाला दर्शवितात. आपण विश्वास ठेवतो, “देव आणि मनुष्य ह्यात एकच मध्यस्थ आहे, आणि तो ख्रिस्त आहे.” परंतु कॅथलिक सर्व प्रकारच्या मध्यस्थीमध्ये, हजारो स्त्रीया आणि पुरुष. आणि सर्व गोष्टीत, विश्वास ठेवतात; कुठलाही चांगला कॅथलिक, मेल्यावर, मध्यस्थ बनतो. आता, ख्रिस्ताचा वधस्तंभ येशू ख्रिस्ताला दर्शवितो.

58 तुम्हाला ठाऊक आहे पूर्वीचे ख्रिस्ती, पूर्वीच्या मंडळीच्या इतिहासानुसार, त्यांनी वधस्तंभ त्याच्या पाठीवर नेला जेथे ते गेले तेथे, ते त्यांना ख्रिस्ती म्हणून दर्शविण्यासाठी किंवा ओळख देण्यासाठी? आता कॅथलिक दावा करतात की त्यांच्यात ते होते अर्थात,

ते दावा करतात की तेच पहीले होते, परंतु कॅथलिक मंडळी तोपर्यंत संघटितही झाली नव्हती. पाहा? परंतु ख्रिस्ती लोक क्रुस वाहत…तुम्ही लोकांना बोलताना ऐकले आहे की, "क्रॉसबँक" तुम्ही ते कॅथलिक संदर्भात बोलतात?

59 ते खरे कॅथलिक आहे, जगातील सार्वत्रिक पवित्र आत्म्याची मंडळीच, खरी आहे. आपण कॅथलिक आहोत आपण मूळचे कॅथलिक, पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणारे कॅथलिक. पाहा? ते मंडळी आहे, कॅथलिक, एक संघटना. त्यापासून मुक्त आहोत. आपण प्रेषितांची शिकवण पुढे चालू ठेवणारे आहोत. आपण पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आणि त्या सर्व गोष्टी, ज्यासाठी पहिली मंडळी उभी राहिली, चालू ठेवणारे आहोत. आणि कॅथलिक मंडळीत त्यांच्यातले कोणीही नव्हते. पाहा?

60 म्हणून, येथे वधस्तंभ लावतात, जो आणला होता, तो त्या जैतूनाच्या झाडापासून बनविला होता ज्याखाली येशू प्रार्थना करीत असे. तोच तो वधस्तंभ कित्येक वर्षांपासून आहे, आणि मला तो भाऊ अर्गानबाईट ह्यांनी दिला होता. आणि मी तो ह्या मंडळीस समर्पित करु इच्छितो.

61 आणि किती योग्यरित्या, तो तेथे कोणी टांगला आहे. मला ठाऊक नाही तो कोण होता तो तेथे माझ्या—माझ्या डावीकडे टांगला. त्याने त्याच्या उजवीकडील चोराला क्षमा दिली, तोच मी आहे.

62 आणि दुसऱ्या गोष्टी तो दर्शवितो, की त्याचे डोके झुकलेले आहे, त्यामुळे तुम्ही त्याच्या यातना पाहता. काही…ते वेदीवर पाहते. तो येथे तुमची अपेक्षा करतो, पापी, आणि तो खाली तुमच्यावर बघेल. नंतर त्यांना तेथे बसताना थोडासा प्रकाश मिळेल, जेव्हा वेदीजवळ बोलावले जाते, एक प्रकाश त्याच्यावर पसरेल, तेव्हा लोक येथे येतात…

63 तुम्ही म्हणाल, "तुम्हाला त्याची काय गरज आहे? तुम्ही कशाचीही प्रतिमा करु नये."

64 तर, मग, तोच देव असे बोलला, "तुम्ही तुमच्याकरिता कोणतीही प्रतिमा बनवू नका," तो देव असे बोलला, "दोन करुब बनविन आणि त्या करुबांचे पंख असे पसरेलेले असावे की त्यांने ते दयासन झाकले जावे जेथे लोक प्रार्थना करतात."

तुम्ही पाहीले, ते—ते न कळणारे आहे. पहा?

65 म्हणून, ते प्रेरणेने झाले आहे आणि त्याच्या योग्य जागी टांगलेले आहे. आणि मी इतका आभारी आहे की मी तो उजव्या बाजूकडील एक आहे. मी विश्वास करतो की त्याने मला क्षमा केली आहे, कारण मी, जोपर्यंत अक्षरशः काहीतरी चोरणे, मला माहीत आहे, मी कधीच माझ्या जीवनात केली नाही, मी त्याच्या वेळेचा गैरवापर केला आहे तशा प्रकारे मी चोरी केली आहे. आणि मी अशा कित्येक गोष्टी केल्या आहेत ज्या मी करावयास नको होत्या. आणि ह्या सकाळी मी परमेश्वराचा कृतज्ञ आहे की त्याने माझ्या पापांची क्षमा केली आहे.

66 आणि आता मी एक इतिहासाच्या पुस्तकातून 17वा अध्याय वाचू इच्छितो, आणि समर्पणच्या विधीबद्दल आणखी पाच मिनीटे बोलेन, प्रार्थना करीन आणि नंतर आपण संदेशाकडे जाणार आहोत. आता एक इतिहास, सतरावा अध्याय.

*दाविद आपल्या मंदिरात राहू लागला, तेव्हा त्याने नाथान संदेष्ट्यास म्हटले, पाहा, मी गंधसरुच्या मंदिरात राहत आहे, पण परमेश्वराच्या कराराचा कोश कनाथीरथ आहे.*

*नाथान दाविदास म्हणाला, तुझ्या मनात जे काही असेल ते कर, कारण देव तुझ्याबरोबर आहे.*

*आणि त्याच रात्री देवाचे वचन नाथानाला प्राप्त झाले ते असे.*

*माझा सेवक दाविद यास सांग...माझा सेवक दाविद यास सांग* (माझा अर्थ)*परमेश्वर म्हणतो, माझ्या निवासासाठी तुला मंदिर बांधावयाचे नाही.*

*ज्या दिवशी इस्त्राएल लोकांस मी मिसर देशांतून बाहेर काढिले तेव्हापासून आज दिवसपर्यंत माझा निवास कधी मंदिरात झाला नाही. डेऱ्यांतून व मंडपातून मी भ्रमण करीत आहे.*

*जिकडेजिकडे मी इस्त्राएल लोकांसह भ्रमण करीत आलो. तिकडेतिकडे ज्या कोणा इस्त्राएल शास्त्यांना माझ्या लोकांचे पालन करण्याविषयी मी आज्ञा करीत असे त्यांस तुम्ही मजसाठी गंधसरुचे मंदिर का बांधिले नाही असा एक शब्द तरी कधी मी बोलला आहे काय...?*

*तर आता माझा सेवक...दाविद यांस सांग, सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तू माझ्या प्रजेचा, इस्त्राएलाचा अधिपती व्हावे म्हणून मी तुला मेंढवाड्यातून मेंढरांच्या मागचा आणिले.*

*जिकडे तू गेलास तिकडे मी तुझ्याबरोबर राहीलो आणि...तुझ्या सर्व शत्रूंचा तुजपुढून उच्छेद केला; पृथ्वीवर जे थोर पुरुष आजपर्यंत झाले आहेत त्याच्या नावाप्रमाणे मी तुझे नाव करीन*.

67 येथे मला हे सांगायला आवडेल, की—की दाविदाने तीच गोष्ट पाहिली जी आपण पाहिली. दाविद म्हणाला, “हे बरोबर नाही की तुम्हा लोकांनी माझ्यासाठी गंधसरुचे मंदिर बांधले, आणि माझ्या देवाचा कराराचा कोश कनाथीखाली आहे.” तो मेंढ्या आणि प्राण्यांच्या कातड्याने एकत्र करुन शिवलेला होता. तो म्हणाला, “हे बरोबर नाही की मी चांगल्या घरात राहावे, आणि माझ्या परमेश्वराच्या कराराचा कोश एका तंबूत राहावा.” म्हणून देवाने त्याच्या अंत:करणात मंदिर बांधावे असे घातले.

68 परंतु, दाविद, एक—एक मनुष्य, जो—जो प्रेमळ आणि ईश्वरभक्ती वाहून नेणारा होता, त्याने पुष्कळ रक्त सांडले होते. म्हणून तो म्हणाला...दावीद, हे त्या काळचा संदेष्टा, जो नाथान, त्याच्या उपस्थितीत बोलत होता. आणि नाथान, हे जाणत होता परमेश्वर दाविदावर प्रेम करतो, तो म्हणाला, “दाविद तुझ्या मनात जे काही असेल ते कर, कारण देव तुझ्या बरोबर आहे.” काय विधान आहे! “तुझ्या मनात जे काही असेल ते कर, कारण देव तुझ्या बरोबर आहे.” आणि ह्या रात्री...दाविदाचे हे समर्पण देवावरील प्रेम दाखवीत आहे.

69 आणि नंतर पाहा, त्याच रात्री, तो चुक करीत होता, हे ठाऊक असताना, त्याला ते करण्याची परवानगी नाही, देवाने खाली येण्याची कृपा केली आणि नाथानाशी बोलला. आणि मला नेहमीच ते शब्द आवडतात, “जा माझा सेवक दाविद यास सांग, ‘मी तुला मेंढवाड्यातून मेंढरांच्या मागचा आणिले.’” तो काहीच नव्हता.

70 आणि मला—मला ते येथे लागू करायला आवडेल, थोडा वेळ थांबा. “मी तुला शून्यातून घेतले, आणि मी—मी—मी तुला नाव दिले. पृथ्वीवर जे थोर पुरुष आजपर्यंत झाले त्यांच्या नावाप्रमाणे तुझे नाव केले.” आणि हे गोपनीयरित्या, मला येथे लागू करण्यास आवडेल मुद्दा स्पष्ट करण्यासाठी. मी विचार करीत होतो...

71 काही वर्षांपूर्वी, मी येथे ह्या शहरात उभा होतो, आणि कोणालाच माझी पर्वा नव्हती. कोणीच माझ्यावर प्रेम केले नाही. आणि मी लोकांवर प्रेम केले. परंतु माझ्या कुटुंबाच्या पार्श्वभूमीमुळे माझ्यावर कोणीच प्रेम केले नाही. माझ्या मौल्यवान आईवडिलांची मी उपेक्षा करीत नाही.

72 मला किती वाटते की मम्मा जीवंत असती तर, ह्या सकाळी ह्या पवित्रस्थानात आली असती. कित्येक जून्या काळचे लोक ज्यांनी त्यांचे पैसे हे बांधण्याकरिता मदत म्हणून दिले, परमेश्वर, ह्या सकाळी, त्यांना हे वरुन बघु देत आहे.

73 परंतु ब्रॅन्हम कुटुंबाचे पिण्यामुळे येथे सभोवती चांगले नाव नव्हते. कोणालाही माझ्याबरोबर काही करायचे नव्हते. आणि मला आठवते, खूप वेळ झाला नाही, माझ्या पत्नीला सांगत होतो, आठवते की, मी—मी कुणाबरोबरही बोलू शकत नव्हतो. कोणालाही माझी पर्वा नव्हती. आणि आज मला थोडी विश्रांती घेण्याकरिता लपावे लागते.

74 आणि आता प्रभूने ही महान जागा आपणास दिली आहे, आणि—आणि ह्या महान गोष्टी ज्या त्याने केल्या आहेत. आणि...वाईट नावाखेरीज, त्याने मला काही थोर पुरुषांसारखे नाव दिले. आणि मी जेथे कुठे गेलो त्याने माझ्या शत्रूंना नष्ट केले. जेथे ते गेले, कुठलीही गोष्ट त्यासमोर उभी राहिली नाही, परंतु, आणि त्यासाठी मी किती कृतज्ञ आहे.

75 आणि मला हे कसे कसे कळले असते, येथे एक फाटलेले कपडे परिधान केलेला लहान मुलगा, येथून दोन-तीन गल्ल्या सोडल्यावर इनग्रामविले शाळेकडे, जेव्हा मी ह्या शाळेचा चेष्टेचा विषय होतो, जीर्ण कपडे परिधान करण्यापासून, आणि जुन्या तलावावर जाणारा? मला हे कसे कळले असते की त्या तलावाच्या तळाशी एक लीलीचे बीज टाकलेले होते जे अशाप्रकारे बहरु शकते? आणि मला हे कसे कळणार, की माझ्याशी कोणीही बोलत नव्हते आणि तरीही तो मला असे एक—एक नाव देईल ज्याचा त्याच्या लोकांमध्ये सन्मान होईल?

76 आणि, आता, दाविदाला ते मंदिर बांधण्याची परवानगी नव्हती. तो ते करु शकत नव्हता. परंतु तो म्हणाला, "मी तुझ्या संततीतून उभे करीन आणि तो मजप्रीत्यर्थ मंदिर बांधील. आणि ते मंदिर निरंतरचे मंदिर असेल. आणि तुझ्या संततीवर, दाविदाचा पुत्र, निरंतरचे राज्य असेल, तो ताबा घेईल." शलमोन, दैहिकदृष्ट्या दाविदाचा पुत्र त्यांच्या दैहीकशक्ती पासून परमेश्वरासाठी घर, मंदिर बांधील.

77 परंतु जेव्हा दाविदाचा खरा अंकुर, दाविदाचा पुत्र आला, त्याने त्यांना म्हटले की अशी वेळ येईल की या मंदिराचा चिऱ्यावर असा एकही चिरा राहणार नाही की जो पाडला जाणार नाही. परंतु तो त्यांना दुसऱ्या मंदिराविषयी सांगत होता.

78 योहान, ज्याला प्रकटीकरण झाले होते, त्याने प्रकटीकरणाच्या पुस्तकात हे मंदिर पाहीले. प्रकटीकरण 21, अध्याय त्याने पाहीले, "पवित्र नगरी नवी यरुशलेम, देवापासून स्वर्गातून उतरताना पाहिली ती नवऱ्यासाठी शृंगारलेल्या नवरीप्रमाणे सजवलेली होती. आणि मी राजासनांतून आलेली, मोठी वाणी ऐकली. पाहा, 'देवाचा मंडप मनुष्यांजवळ आहे, आणि त्यांच्याबरोबर देव आपली वस्ती करील, आणि तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील. ह्यापुढे मरण नाही, शोक रडणे व कष्ट ही नाहीत; कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या.'"

79 नंतर दाविदाचा खरा पुत्र, कारण येत्या आठवड्यात आपण ह्या अध्यायातून, पाहणार आहोत, नंतर त्याच्या मंदिरात येईल, देवाचे मंदिर, खरे मंदिर, जे तो बांधण्यासाठी गेला

आहे. कारण, तो योहान 14 मध्ये म्हणाला, “माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत आणि मी...” त्याला ह्याद्वारे काय म्हणायचे आहे? ते अगोदरच नियुक्त केलेले आहे. “आणि मी तुम्हासाठी जागा तयार करावयास जातो, आणि पुन्हा येऊन तुम्हाला आपल्याजवळ घेईन.” आणि, अर्थात, आपल्याला माहीत आहे की ते एक महान युग असेल, आणि दाविदाचा खरा अंकुर ते सिंहासन घेईल. जो येशू ख्रिस्त आहे, आणि तेथे मंडळीवर राज्य करील, कारण त्याची वधु त्याच्याबरोबर राजमहालात असेल आणि इस्त्राएलाच्या बारा घराण्यावर, अनंतकालासाठी असेल.

80 आणि त्या लहान जागा, कारण दाविद, देवाचे खरे मंदिर बांधू शकला नाही, कारण तो ते करण्यासाठी बनविला नव्हता. तो करु शकेल असे तेथे काही नव्हते. तो मर्त्य होता, आणि आणि रक्त सांडले. तर आज हे, आपल्यासाठी, आपण देवाचे खरे मंदिर बांधण्यास तयार नाही. तेथे फक्त एकच आहे जो ते करु शकतो, आणि ते बांधकाम आता चालू आहे.

81 परंतु हे लहान मंदिर, तसेच ते मंदिर जे शलमोनाने त्याच्यासाठी बांधले, आणि इतरांसोबत ती उपासनेची तात्पुरत्या जागा आहेत जोपर्यंत ती वेळ येत नाही जेव्हा खरे मंदिर ह्या पृथ्वीवर उभारले जाईल. “आणि नीतीमत्व आकाशात राज्य करील. आणि तेथे दु:ख असणार नाही.” तेथे त्या मंदिरात मरणावर प्रचार होणार नाही. तेथे आणखी लग्न होणार नाहीत, कारण लग्न म्हणजे एक महान लग्न अनंतकालासाठी. ती काय वेळ असेल.

82 परंतु आज आपण आपल्या हृदयात निश्चय करु या, की त्यांचे स्मरण करीत असता आणि त्या मंदिराची वाट पाहत असता त्याच्या आत्म्याने स्वत:ला आपण असे घडवूया, की आपण ह्या जागेत त्याची उपासना अशी करु या जसे काही आपण त्या जागेत आहोत, ती जागा येण्याची वाट पाहत आहोत.

83 आता आपण आपल्या पायांवर उभे राहू या, आणि मी पवित्र वचन वाचत असता.

> *आणि मी नवे आकाश व नवी पृथ्वी पाहिली. पहिलं आकाश व पहिली पृथ्वी ही निघून गेली होती, आणि समुद्रही राहिला नाही*
>
> *...तेव्हा मी योहानाने पवित्र नगरी, नवी यरुशलेम, देवांपासून स्वर्गातून उतरताना पाहिली. ती नवऱ्यासाठी श्रृंगारलेल्या नवरीप्रमाणे सजविलेली होती.*
>
> *आणि मी राजासनातून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशी, पाहा, देवाचा मंडप मनुष्यांच्या जवळ आहे. त्यांच्याबरोबर देव आपली वस्ती करील. आणि ते त्याचे लोक होतील आणि देव स्वत: त्यांच्याबरोबर राहील.*

आपण आपले मस्तक झुकवू या.

84 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही आदरयुक्त भयाने उभे राहतो. आम्ही आदराने आणि पवित्र आदराने उभे राहतो आणि आम्ही तुजकडे मागतो, प्रभू, आमची भेट स्वीकार कर, की तु आम्हावर कृपा, पैसे, हे भक्तीचे स्थान तुझ्यासाठी बनविण्यासाठी पुरविली. तेथे काही नाही किंवा जागा नाही, जिथे पृथ्वीवर आम्ही तुजसाठी बनवू शकू, की ती योग्य असेल की त्यात देवाचा आत्मा वास करील. परंतु आम्ही ही तुला आमच्या प्रेमाचे आणि भावनांचे प्रतिक म्हणून अर्पण करीत आहोत, प्रभू. आणि आम्ही तुझे ह्या सर्व गोष्टी ज्या तू आम्हासाठी केल्या त्याबद्दल आभार मानतो.

85 आणि, आता ही इमारत आणि जागा जी खूप अगोदर तुझ्या सेवेसाठी समर्पित केली आहे, आणि आम्ही त्या आठवणीबद्दल तुझे आभार मानतो. आणि आज, प्रभू परमेश्वरा,

ज्याप्रमाणे काही वर्षांपूर्वी, एक दृष्टांत दिला हे दर्शविण्यासाठी, की मी पाहीले एक जुनी इमारत ज्यात कधी लोक होते, आणि आणि त्यांना दुरुस्त करण्यात आले आहे आणि नविन केले आहे, आणि मला त्या नदीच्या पैलतीरी पुन्हा पाठविण्यात आले आहे.

86 आता, प्रभू परमेश्वरा, आकाश आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्या, आम्ही तुझ्या कळपातील लोक म्हणून उभे आहोत. आम्ही तुझ्या राज्यातील लोक म्हणून उभे आहोत. आणि माझ्यासह, आणि पाळक, आणि ही कलीसिया हे लोक, आम्ही ही इमारत सर्व समर्थ देवाच्या सेवेसाठी त्याचा पुत्र, येशू ख्रिस्ताच्या नावाने परमेश्वराच्या सेवेसाठी आणि देवाच्या सन्मानासाठी आणि आदरासाठी समर्पित करतो. आणि ह्या जागेतून सुवार्तेचा प्रसार अशाप्रकारे होवो की जगाला पृथ्वीच्या चारी कोपऱ्यांतून ती येथे देवाचे गौरव पाहण्यासाठी येवो. हे तू भूतकाळात केले आहे, भविष्यकाळात अधिक पटीने मोठे होवो.

87 पित्या, आम्ही आता स्वतःला, वचनाद्वारे, जे सर्व आमच्यात आहे त्यासह, सेवेसाठी समर्पित करतो प्रभू, ही कलीसिया आणि हे लोक, ते ह्या सकाळी, त्याना वचन ऐकण्यासाठी समर्पित करतात. आणि, आम्ही सेवक म्हणून, आम्हाला “वचनाची घोषणा करण्यासाठी” समर्पित करतो; सुवेळी व अवेळी तयार रहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखीव, निषेध कर व बोध कर. ज्याप्रमाणे तेथे तीस वर्षांअगोदर, कोनशीलेवर लिहीले आहे. तू म्हणाला, “अशी वेळ येईल जेव्हा, ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर आपल्या कानाची खाज जिरावी म्हणून ते स्वेच्छाचाराने आपणासाठी शिक्षकांची गर्दी जमवितील, आणि ते सत्य ऐकण्यापासून फिरतील व कल्पित कहाण्यांकडे वळतील.” प्रभू, आम्ही लोकांना वचन देण्यासाठी प्रयत्न करतो, आम्हाला दुपट्टीने प्रेरित कर आणि शक्तीमान कर. प्रभू, दुप्पट आत्मा ह्या स्थळावर येऊ दे…

88 ज्याप्रकारे मंदिराच्या समर्पणाच्या दिवशी होते, जेव्हा, शलमोनाने प्रार्थना केली, पवित्र आत्मा अग्निस्तंभ व मेघस्तंभाच्या रुपात मंदिराच्या द्वाराशी आला, करुबीमावर स्थिर होऊन, व पवित्रस्थानापर्यंत गेला आणि तेथे त्याने विसावा घेतला. हे परमेश्वरा! शलमोन म्हणाला, “जर तुझे लोक कुठेही संकटात असतील, ह्या पवित्र स्थलाकडे दृष्टी लावून प्रार्थना करतील, तर स्वर्गातून तू ती श्रवण कर.”

89 प्रभू, ह्या सकाळी, पवित्र आत्मा प्रत्येकाच्या हृदयात, प्रत्येक समर्पित जीवात येवो, जे येथे आहेत. आणि पवित्र शास्त्र सांगते की, “देवाची महिमा इतकी महान होती की सेवक त्याची सेवकाईही करु शकली नाही, देवाच्या महिमेसाठी.” हे प्रभू परमेश्वरा आम्ही स्वतःला, ह्या मंडळी सहीत, सेवेसाठी समर्पित करीत असता, त्याची पुनरावृत्ती होवो, आणि असे लिहीले आहे, “मागा, आणि तुम्हाला मिळेल.”

90 आणि आम्ही स्वत:ला, मंडळीतील आमच्या अर्पणासह ह्या सकाळी, सेवेसाठी तुला सोपवितो, कारण नंतरच्या दिवसाचा प्रकाश, संध्याकाळच्या वेळचा प्रकाश ह्यासाठी की आम्ही त्या वाट पाहणाऱ्या लोकांमध्ये जे वराच्या येण्याची वाट पाहत आहे, सांत्वन व विश्वास आणू शकू, वधूला ख्रिस्ताच्या सुवार्तेचे वस्त्र द्यावे, ह्यासाठी की प्रभू येशूला स्विकारावे हे आम्ही समर्पित करतो, स्वत:ला, भाऊ नेव्हिल, आणि ही कलीसीया देवाच्या सेवेसाठी, येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो. आमेन.

तुम्ही बसू शकता.

91 दाविद म्हणतो, “मला आनंद झाला, जेव्हा ते मला म्हणाले, आपण देवाच्या मंदिरी जाऊ.” आणि आमच्या बरोबरही हे सर्वदा असेच असो, की, जेव्हा असे म्हटले आहे, आम्हीही देवाच्या घरात एकत्र होण्यास, आनंदीत होऊ. [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

92 आता ह्या लहानशा समर्पणाच्या सभेनंतर आता माझ्याकडे एक तास आहे.

93 आणि, आता, फक्त आठवा. आता, आपण कशासाठी समर्पित केली. आदरासाठी, पवित्रतेसाठी, प्रभूसमोर शांत बसणे, देवासमोर भक्ती करणे आणि प्रभूच्या घरात तुम्हाला जितके आदराने राहता येईल तितके राहा. आणि, आता, आणि जेव्हा सभा संपेल, सभा संपल्यावर लगेच इमारतीच्या बाहेर जा. पाहा? आणि स्वच्छता करण्यास येथे वेळ मिळतो. आणि ते पुढच्या वेळेसाठी स्वच्छता करतात, आणि तयार होतात. आणि तेथे प्रभूच्या मंदिरी गोंधळ होत नाही. मला वाटते, ही जागा अंदाजे पंधरा मिनीटात सभा संपल्यावर स्वच्छ होईल. मित्रत्वाने राहण्याची खात्री घ्या. प्रत्येकाशी हस्तांदोलन करा, आणि प्रत्येकाला पुन्हा आमंत्रण करा.

94 आणि—आणि आम्ही, येणाऱ्या आठवड्यात, आजपर्यंत ह्या मंदिरात आयोजीत करण्यात आलेल्या सर्व सभांपेक्षा, मोठी सभा करण्याची अपेक्षा करीत आहोत. आम्ही त्याची वाट पाहत आहोत. आता—आता…मला सुचेपर्यंत…उशीरापर्यंत, काही तास काल रात्री, प्रार्थनेत, मी काहीतरी बघण्यास सुरुवात केली. म्हणून, मी विश्वास करतो की ही खूप महान वेळ असेल, जी मी विश्वास करतो ती असेल, जर प्रभू आम्हाला सहाय्य करील. आता, जेव्हा मी म्हणालो, “महान वेळ,” आता. मी त्याचविषयावर, ह्या सकाळी, बोलणार आहे. तुम्हाला ठाऊक आहे, की मनुष्य ज्यास “महान” म्हणतो, ते काही वेळा महान नसते. परंतु देव ज्यास “महान” संबोधतो, मनुष्य ते मुर्खपणाचे म्हणतो, आणि देव ज्यास “मुर्खपणाचे” म्हणतो, मनुष्य त्यास महान म्हणतो. म्हणून हे आपण लक्षात ठेऊ या, प्रत्येक शब्द तोलून पाहा.

95 आता, सभा मोठ्या आहेत. ते बाहेर का जातील, कारण ती कठीण सभा, जास्त शिकवणुक, समर्पित जीवन. आणि…

96 ती जागा जेथे मी राहत आहे. लोक फक्त प्रयत्न करतात, मी त्यांना सगळं भरवावे अशी इच्छा करतात, परंतु…“ठीक आहे, तुमचे एवढे वजन कमी झाले आहे, भाऊ ब्रॅन्हम, सगळे काही.” परंतु मी सतत सभेत आहे. मला येथून पुढच्या रविवारी रात्री दुसऱ्या ठिकाणी, मेक्सिकोत निघावे लागेल. म्हणून हे जरा कठीण गोष्ट आहे. परंतु मी जास्त खाणे, हे टाळण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि स्वत:ला तयार करीत आहे.

97 आणि ह्या सकाळी, भाऊ ज्युनियर जॅक्सनना पाहून मी आनंदी आहे. आणि—आणि भाऊ रुडेल, आणि—आणि इतर सेवक आणि इतर सर्व. देव तुम्हा सर्वांना आशीर्वादीत करो.

98 आता ह्या सकाळी मी—मी ह्या विषयावर बोलू इच्छितो ज्याविषयी मी काही टिप्पणी केली आहे. आणि मी प्रथम यशयाचे पुस्तक 53 व्या अध्यायातून वाचू इच्छितो. आता, तुम्ही ते काढत असता, मी काही जाहीर निवेदन करु इच्छितो, किंवा दोन.

99 आज रात्री, मी *ह्या* पुस्तकावर बोलू इच्छितो, शेवटचे मंडळीचे युग ते शिक्के उघडले जाणे याच्यात समन्वय साधू इच्छितो. आता, तेथे त्यांच्यात भरपूर अंतर आहे.

100 आणि, जेव्हा मी मंडळीचे युगे संपविण्या अगोदर, मी तेथे दानिएलाची सत्तर सप्तके ह्यावरही बोललो, कारण ते त्यास संबंधित आहे. आणि मी म्हणालो, “आता, जर मी कधी सात शिक्क्याविषयी घेतले, मला ह्या दानीएलाच्या सत्तर सप्तकांतूनही घ्यावे लागेल. त्यांना शिक्क्यांतून बांधण्यासाठी.” एक गोष्ट खूली सोडून, आणि तो म्हणजे, सातव्या शिक्क्याच्या पुस्तकाचा, पाचवा अध्याय. आणि आपण ते आज रात्री घेऊ.

101 आज रात्री आपण लवकर सुरुवात करण्याचा प्रयत्न करु या. कसा...ते तुम्ही अगोदरच सांगितले आहेस, तुम्ही लवकर सुरुवात करण्याविषयी सांगितले आहे काय? [भाऊ नेव्हील म्हणतात, "होय."—सम्पा.] प्रत्येक जण येथे सातच्या सुमारास जमु शकतील का? [मंडळी म्हणते, "आमेन."] ठीक आहे. आपण रोजची सभा साडे सहा वाजता सुरु करु या, गाण्याची सभा, आणि मी सात वाजता येथे असेन. आणि नंतर ह्या आठवड्यात आपण लवकर सुरुवात करु या. आणि आम्ही, आता, आम्ही...

102 तेथे कोणीही गाण्यावर प्रेम करीत नाही ज्याप्रमाणे ख्रिस्ती करतात. आम्हाला गाणे आवडते. आपण त्या गोष्टींवर प्रेम करतो.

103 परंतु आता आपण—आपण वेगळ्या गोष्टीत आहो. आपण वचनात आहो, पाहा, आपण—आपण त्याकडे सरळ पाहू या. आपण त्याकडे जात आहोत. आपण—आपण शिक्षण घेत आहोत. आणि तुम्ही समजू शकता किती ताण मजवर आहे, पाहा, कारण जर काही चुकीचे शिकविले, तर त्यांविषयी मला जवाब द्यावा लागेल. पाहा? आणि म्हणून मी कोणी काहीही सांगतो ते घेऊ शकत नाही. मला...मला प्रेरणा झाली पाहीजे. आणि मी विश्वास करितो की सात दूत, ज्यांच्याकडे ह्या सात गर्जना आहेत, ते सहाय्य करतील. पाहा?

104 आणि आता यशयात, यशयाचा 53 अध्याय, पहिले वचन, किंवा दुसरे. मी हा प्रश्न विचारु इच्छितो.

105 आता, हे सात शिक्क्यांशी बिलकुल निगडीत नाही. हा फक्त संदेश आहे. कारण, मला माहीत आहे, मला समर्पणाची आवश्यकता आहे, आणि मी त्यात जाऊ शकत नाही कारण मला वेळ मिळणार नाही. परंतु मला वाटते, एका लहान समर्पणाच्या सेवेसाठी, ह्या मंडळीच्या लहानशा स्मरणार्थ सभेच्या, किंवा समर्पणाच्या सभेसाठी, तर...एवढा वेळ नसणार की त्या विषयात जावे जे मला सांगायचे आहे, पाहा, ह्या पुस्तकाच्या सुरुवातीला, म्हणून मी रात्री. आणि ही एक लहानशी सभा आहे, ती—ती त्याबरोबर योग्य रितीने जुळेल.

106 म्हणून, आता, प्रत्येक वचन ऐका...ते पकडा. आणि—आणि जर तुम्ही ते टेपवर घेत आहात किंवा इतर गोष्टींवर, तर तुम्ही त्या टेपच्या शिकवणी बरोबर, राहा. दुसरे काही सांगू नका. परंतु ते जे टेप सांगत आहे. तेच तंतोतंत सांगा जे टेप सांगत आहे. पाहा? आता, कारण, काही त्या गोष्टी, आपण आता त्याविषयी संपुर्णपणे समजण्यास जात आहोत, तेथे गैरसमज का होतो. पाहा? आणि तुम्ही खात्री करा, फक्त तेच बोला जे टेप सांगते. दुसरे काही सांगू नका. पाहा? कारण, मी ते माझ्या मनचे सांगत नाही. तो ते सांगत आहे, तुम्हाला कळले? आणि कित्येक वेळा लोक गोंधळ उठवतात आणि सांगतात, "ठीक *असे-असे* म्हटले, त्याचा अर्थ *असा व असा* आहे." ते जसे—जसे आहे तसेच राहू द्या.

107 पाहा, त्याचप्रकारे आम्हाला पवित्रशास्त्र पाहीजे. ज्याप्रकारे पवित्रशास्त्र ते सांगते, ज्याप्रकारे आम्हाला ते पाहीजे. ते तसेच—तसेच आहे त्यात तुमचे स्वत:चे प्रकटीकरण घालू नका. ते पूर्णपणे प्रगट केलेले आहे, तुम्हाला समजले. आता:

> *आमच्या वार्तेवर कोणी विश्वास केला आहे? आणि कोणाला प्रभूचा भूज प्रगट झाला आहे?*

108 मला ते जवळून पुन्हा वाचू द्या.

*आमच्या वार्तेवर कोणी विश्वास केला आहे?* (प्रश्न!) *आणि कोणाला प्रभूचा भुज प्रगट झाला आहे?*

109 दुसऱ्या शब्दांत, “जर तुम्ही आमच्या वार्तेवर विश्वास ठेवला असता, तर देवाचा भूज तुम्हाला प्रगट झाला असता.” पाहा?

*आमच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला? आणि कुणास देवाचा भूज प्रगट झाला आहे?*

110 आता मी संत मत्तयरचित शुभवर्तमानाच्या पुस्तकातून वाचू इच्छितो, संत मत्तयचा 11वा अध्याय. आणि आता, तुम्ही तुमच्या वह्या आणि गोष्टी, आणा जर तुमच्याकडे ध्वनीमुद्रण यंत्र नसेल तर, तुम्ही—तुम्ही कागदे आणा…म्हणजे आम्हाला ते मिळू शकेल. संत मत्तयचा 11 वा अध्याय, 25 व 26 वे वचन, 11 अध्याय 26 आणि 27. ठीक आहे, येशू, प्रार्थनेत बोलत आहे. मी त्याच्या थोडेसे मागून सुरुवात करु इच्छीतो. आपण ते 25 वे आणि 26 वे वचन पाहू या. मी विश्वास ठेवतो की त्याविषयीच मी घोषणा केली, जरी, कारण माझ्या पवित्रशास्त्रात मी तेथे खूण केली होती.

*त्यावेळी येशू असे बोलू लागला, हे पित्या, स्वर्गाच्या व पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करितो, कारण ज्ञानी व विचारवंत ह्याच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या बाळकांस प्रगट केल्या.*

*खरेच, हे पित्या, कारण हेच तुला योग्य दिसले.*

111 ही दोन वचने पकडा “आमच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला? आणि देवाचा भुज कोणास प्रगट झाला?” तरी नंतर येशूने देवाचे आभार मानले, की “ज्ञानी आणि विचारवंत ह्यांच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकास प्रगट केल्या, हे पित्याला योग्य वाटले.” आता या लेखांतून…

112 ह्या वचनांच्या वाचनांतून, मी या लेखाला शिर्षक दिले: *देव त्याला साधेपणात लपवितो, नंतर त्याप्रकारे त्यास प्रगट करितो*. या वचनांच्या वाचनांतून मी हे शीर्षक दिले *देव स्वत:ला साधेपणात लपवितो, मग त्याचप्रकारे त्यास प्रगट करितो*.आता टेपकरिता, मी वारंवार हे सांगतो, टेपकरिता तुम्हाला कळले, कारण ते—ते हे टेप करित आहे. पाहा? *देव स्वत:ला साधेपणात लपवितो, मग त्याचप्रकारे त्यास प्रगट करितो*.

113 देव अशा गोष्टी करितो ह्याचा विचार करणे अद्भूत आहे. देव त्यास कश्यातही इतक्या साधेपणात गुप्त ठेवतो की त्यामुळे ज्ञानी ते लाखो मैलाने गमावतील. आणि नंतर सभोवती मागे वळतील, त्यामध्ये, काही साध्या गोष्टी साधेपणाने, त्याच्या कामाच्या पध्दतीने, आणि त्यास योग्यरितीने पुन्हा प्रगट करितो. मला वाटले, ह्या एक—एक धर्मग्रंथातील वचनाचा, आपण सात शिक्क्यांच्या महान गोष्टी शिकण्या अगोदर, याचा अभ्यास करु या. कित्येक जण त्यास गमावतील त्याच्या ह्याप्रकारे त्यास प्रगट करण्यामुळे.

114 मनुष्यांकडे त्यांच्या स्वतःच्या कल्पना आहेत की देव कसा असला पाहीजे आणि देव काय करणार आहे. आणि मी कित्येक वेळा जुने वाक्य बोलतो, मनुष्य हा मनुष्यच राहतो. मनुष्य नेहमीच देवाची जे त्याने केले आहे त्यास स्तुती करीतो. आणि नेहमी पुढे पाहतो की तो काय करणार आहे, आणि तो काय करीत आहे. त्याकडे दुर्लक्ष करतो. पाहा? पाहा? त्याचप्रकारे ते हे गमावतात आणि ते मागे पाहतात, परंतु ते हे पाहण्यास अयशस्वी ठरतात की किती साध्या गोष्टी तो करीत आहे. पाहिले? आणि मग ते पुढे पाहतात आणि पुढे होणाऱ्या महान गोष्टी पाहतात, ज्या घडणार आहेत, आणि, दहा मधील नऊ गोष्टी

त्यांच्याभोवती अगोदरच घडत असतात. आणि ते इतके साधे असते ते त्यांना कळतही नाही. पाहीले?

115 एके दिवशी, येथे वर उतीका येथे...एक—एक मनुष्य आणि जर काही त्यांची लोक येथे असतील, मी हे त्या मनुष्याची संपूर्ण उघड करण्यासाठी नाही करीत. तो युध्दातील अनुभवी सैनिक होता. आणि मी विश्वास करीतो तो होता. मला ठाऊक नाही की तो कुठल्या बाजूस होता, परंतु मी विश्वास करीतो तो—तो बंडखोर होता. परंतु तो एक नास्तिक होता. आणि तो दावा करीत होता की तेथे देव अशी काही गोष्टच नाही. तो उतीका येथे राहत होता. त्याचे नाव जीम डोर्से होते. तुमच्यातील कित्येक लोक त्याला ओळखत असतील.

116 जेव्हा मी लहान होतो, त्याने मला खूप कलिंगड दिले. तो खाली नदीवर कलिंगड वाढवित असे, तेथे तळाशी. आणि तो माझ्या वडिलांचा मित्र होता. परंतु तो, एके दिवशी, म्हणाला, सर्वात महान सहज लक्षात येणारी गोष्ट जी आजपर्यंत, विरुध्द त्याला सांगण्यात आली. आता, मी त्या दिवसात लहान मुलगा होतो. परंतु त्याच्या विश्वासा विरुध्द, त्याला निघून जाण्यास आणि त्याचे मस्तक लवण्यास आणि रडण्यास भाग पाडले. आणि मला समजले की, ह्या द्वारे तो मनुष्य अद्भूतरितीने ख्रिस्तामध्ये वयाच्या पंच्याऐंशी वर्षात बदलला गेला.

117 एके दिवशी, त्याने लहान मुलीला विचारले, जी संडे स्कूल मधून येत होती, कि ती अशा गोष्टीत तिचा वेळ अशा प्रकारे का फुकट घालवित आहे? ती म्हणाली, कारण ती विश्वास ठेवते की तेथे देव आहे, आणि श्रीमान डोर्से म्हणाला, तो म्हणाला, "मुली, तू अशा गोष्टीत विश्वास ठेवण्याची चूक करीत आहेस."

118 आणि म्हणाला ती मुलगी खाली गेली आणि एक—एक लहानसे फुल...जमिनीतून तोडले, त्यातून त्याच्या पाकळ्या काढल्या, आणि म्हणाली, "श्रीमान डोर्से, तुम्ही मला सांगू शकता का की हे कसे जगते?"

119 तेथेच ते होते. जेव्हा त्याने शोध करण्यास सुरुवात केली, तो त्या मुलीस म्हणू शकला असता, "ठीक, ते जमिनीतून वाढत आहे." आणि मग असा प्रश्न पुन्हा आला असता, "पृथ्वी कोठून आली? ते बीज येथे कसे पडले?" ते कसे घडले? पुन्हा आणि पुन्हा, आणि पुन्हा, आणि मागे जात राहिला जोपर्यंत त्याने पाहिले. कळले?

120 मोठ्या आकर्षक गोष्टी नाहीत ज्या विषयी आपण विचार करीतो, परंतु त्या साध्या गोष्टी आहेत ज्यातून देव खरा आहे, साधे पणात आहे हे कळते. म्हणून, हे देवाला संतुष्ट करते की त्याला प्रगट करणे, आणि नंतर त्याला लपविणे; नंतर त्याला लपविणे, आणि त्याला स्वतःला साधेपणात, लहान गोष्टीत, प्रगट करणे. ते—ते मनुष्याच्या डोक्यावर ठेवले.

कारण, जर तू म्हणशील, "नीतीमान देव असे का करील?"

121 म्हणून उत्पत्तीत, मनुष्य बनविला गेला, स्वत: ला बदलण्याच्या प्रयत्नात नाही. मनुष्याला या साठी निर्माण केले ह्यासाठी की त्याने पूर्णपणे देवावर अवलंबून राहावे. तेच कारण आहे की आहे की आपल्याला कोकरा सारखे किंवा मेंढरा सारखे बनविले. मेंढरु स्वतःला चालवू शकत नाही, त्याला एका पुढाऱ्याची गरज असते. आणि पवित्र आत्मा आपल्याला चालवितो. म्हणून, मनुष्य त्या प्रकारे बनविला गेला.

122 आणि देवाने त्याची सर्व कामे इतकी साधेपणात केली, की साधे पणातच ते समजू शकते. आणि देव स्वत:ला साधेपणात बनवितो, साधेपणात, ह्यासाठी की साधे त्याला

समजू शकतील. दुसऱ्या शब्दांत, तो म्हणतो, यशया 35 मध्ये, मला वाटते. तो म्हणाला, “त्या मार्गाने जाणारे मूढ असले, तरी मार्ग चुकणार नाहीच.” ते इतके साधेपणात आहे!

123 आणि आपल्याला माहीत आहे की देव इतका महान आहे, आपण काही तरी महान गोष्टी होण्याची अपेक्षा करितो, आणि आपण साध्या गोष्टी चुकवितो. आपण साधेपणा मध्ये अडखळतो. त्याचप्रकारे आपण देवाला चुकवितो, साधेपणावर अडखळण्या मुळे. देव इतका साधेपणात आहे की त्या दिवसांतील ज्ञानी, आणि सर्वच दिवसात, त्याला लाखो मैलाने हरवून बसले. कारण, त्यांच्या ज्ञानांत, त्यांना माहीत आहे की त्याच्यासारखा महान कोणी नाही; परंतु, त्याच्या प्रकटीकरणात, तो ते साधेपणात करीतो की ते त्यांच्या डोक्यावरुन जात आणि ते हरवून बसतात.

124 आता, त्याचा अभ्यास करा संपूर्ण अभ्यास करा आणि तुम्ही लोक जे येथे भेट देण्यास आले आहेत, जेव्हा तुम्ही तुमच्या मोटेलच्या खोलीवर जाल, ह्या गोष्टी घ्या आणि त्यावर विचार करा. आपल्याकडे ते फोड करुन सांगण्यास वेळ नाही कारण त्याची फोड केली पाहीजे, परंतु माझी इच्छा आहे, की तुम्ही ते करावे, जेव्हा तुम्ही मोटेल, किंवा हॉटेलमध्ये जाल किंवा जेथे कुठे तुम्ही राहत आहात, किंवा तुमच्या घरी एकत्र व्हा आणि त्यावर अभ्यास करा.

125 त्याला चुकवितात त्याच्या स्वतःला प्रगट करण्याच्या पध्दतीमुळे; कारण तो इतका महान आहे, तरी, स्वतःला साधेपणात लपवितो, ह्यासाठी की त्याला लहानांना प्रगट करावे, पाहिले महान होण्याचा प्रयत्न करु नका, कारण तो त्यांच्या वरुन जातो. परंतु देवाचा साधेपणा लक्षपूर्ण ऐका, आणि तरच तुम्हाला देव तेथेच साधेपणात सापडेल.

126 उच्च, तकाकी असणारे, जगातील ज्ञान, शिकलेले नेहमीच त्याला चुकवितात. आता, मी येथे...नाही आणि मला ठाऊक आहे तेथे शाळेतील शिक्षीका दोन किंवा तीन आहेत, त्यांना मी ओळखतो येथे बसलेल्या आहेत. आणि मी येथे शाळा आणि शिक्षण यांच्या विरुध्द नाही, आणि अशिक्षीतांना आधार देण्याचा प्रयत्न करीत नाही. मी येथे त्यासाठी नाही. परंतु, ते काय आहे, लोक त्यावर इतके विसंबून असतात, की ते सेमेनरी आणि त्यामुळे पुढे ते त्याच गोष्टी हरवून बसतात ज्या देव त्यांच्या पुढे ठेवतो.

127 म्हणूनच मी त्या भावांच्या विरुध्द नाही जे संप्रदायात आहेत, परंतु मी त्या संप्रदाच्या प्रणाली विरुध्द आहे, कारण ती स्वतःला उंचावू पाहते, आणि—आणि—आणि त्यांच्या सेवकांना *अशा-अशा* ठिकाणी शिक्षण देतात, जर त्यांच्याकडे योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण नसेल तर त्यांना काढण्यात येते. आणि—आणि त्यांना मानसशास्त्र परिक्षेपुढे उभे राहावे लागतील आणि असेच पुढे. मला कधीच वाटले नाही की ही देवाची इच्छा होती की सेवकाची परीक्षा मानसशास्त्रा द्वारे व्हावी, परंतु त्याची पारख वचनाद्वारे व्हावी. पाहीले? हा—हा—हा देवाचा मार्ग त्याच्या मनुष्याला पारखण्यासाठी असतो, ज्यास त्याने वचनासाठी पाठविले आहे.

128 “वचन प्रचार करा!” आता, आज आपण तत्वज्ञान शिकवितो, आपण पंथ आणि संप्रदायाचा प्रचार करितो, आणि कित्येक अशा गोष्टी, आणि वचनाला सोडून देतो, कारण ते म्हणतात ते समजू शकत नाही. ते समजू शकते. त्याने ते करण्याचे वचन दिले आहे. आता आपण ते करण्यासाठी त्याच्याकडे मागत आहोत.

129 आता आपण काही चरित्र्य घेणार आहोत थोड्या मिनीटांसाठी.

130 आपण नोहाच्या दिवसात पाहू. नोहाच्या दिवसात, देवाने जगीक ज्ञानावर मोठा मान आणि आदर असलेले पाहिले, त्याने एका साध्या मनुष्याद्वारे साधा संदेश पाठविला की त्याची महानता दाखवावी.

131 आता, आपल्याला ठाऊक आहे की नोहाच्या—च्या दिवसात, ते दावा करितात की संस्कृती इतकी प्रबळ होती, आपण अजूनही त्या ठिकाणी, आपल्या आधुनिक संस्कृतित पोहोचलो नाही. आणि मी विश्‍वास करितो की शेवटी तेथे पोहोचू, कारण आपल्या प्रभूने म्हटले आहे, “जसे नोहाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेस असेल.” त्याने काही उदाहरणे दिली.

132 आणि त्यांनी पिऱ्यामिड आणि स्पिंक्स तेथे इजिप्तमध्ये बांधले, आणि त्यांनी भव्य, गोष्टी बांधल्या की आपल्याकडे ते त्या बांधण्याचे सामर्थ्य आजही नाही. त्यांच्याकडे दफन करण्याची पध्दती आहे, की ते देहाला मसाला भरुन टिकवू शकतात, ते असा बनवितात की तो इतका खरा वाटतो की तो आजपर्यंत राहू शकतो. आपण करु शकत नाही. आपण आजही न कुजणारे विशिष्ट रसायने भरलेले प्रेत (ममी) करु शकत नाही. आपल्याला ते बनविण्यासाठी तो मसाला नाही त्यांच्याकडे असे रंग आहेत जे—जे जलद पकडतात, चार किवां पाच हजार वर्षांअगोदर, ते अजूनही तसेच रंग आहेत जसे ते होते. पाहिले? आपल्याकडे तसे आजही नाही.

133 आणि कित्येक महान गोष्टी त्या संस्कृत आपल्या आधुनिक संस्कृतिपेक्षा वरचढ आहेत. आणि म्हणून तुम्ही कल्पना करु शकतात, की कसे शिक्षक आणि विज्ञान अशा उत्कृष्ट प्रतिक जे आपण सोडून दिले, की तेथे तशी संस्कृती होती. किती—किती महान संस्कृती ती होती, ठीक ती स्मारके, कसे ते विज्ञान आणि—आणि आधुनिक संस्कृती आणि शिक्षण त्या लोकांकडे होते. “ते असले पाहिजे. ते असायला पाहीजे.” तेथे एखादी, मला वाटते, त्यांच्यात अशिक्षीतपणा मूळीच नव्हते.

134 आणि म्हणूनच, देव त्या दिवसाच्या महान अर्थव्यवस्थेत, त्यांच्या प्रणालीत, शोधीत होता, परंतु योग्य प्रकारचा मनुष्य त्याला मिळू शकला नाही, तर त्याला एक अशिक्षीत, एक शेतकरी नोहा नावाचा, एक मेंढपाळ सापडला. आणि त्याने आपला संदेश लोकांना प्रचार करण्यासाठी त्याच्याकडे दिला, तो इतका साधा होता की त्या—त्या काळच्या विद्वानांकरिता, लोक त्या संदेशाच्या साधेपणात अडखळले. आणि, तरी तो संदेश, विज्ञानाच्या दृष्टीने, वेगळा होता. तेथे आकाशांतून पाऊस कसा पडू शकतो, जेव्हा तेथे कधीच पाऊस पडला नव्हता? पाहा? आणि साधा संदेश एक तारु बांधण्याचा, असे काही बांधण्याचा ज्यात जाऊ शकतो, तेथे तरंगण्यासाठी पाणी नव्हते. का, तो वेडा झाला आहे. आपण त्याला काय बोलू शकतो, जर तुम्ही मला क्षमा कराल ह्या आजच्या भाषेत त्यास “विक्षिप्त” म्हणतात.

135 आणि जवळ जवळ देवाचे सर्वच लोक हे “विक्षिप्त” आहेत, पाहा. ते आहेत. मी त्यांच्यातलाच एक आहे म्हणून आनंदीत आहे. म्हणून तुम्हाला माहीत आहे, ते—ते ह्या आधुनिक पध्दतीच्या संस्कृतीपेक्षा वेगळे आहेत, म्हणून ते वेगळे, विचित्र होतात, तो म्हणाला, त्याचे लोक, खास लोक होते, वेगळे, विचित्र, परंतु आध्यात्मिक याजकपद, राजकीय राष्ट्र, देवाला आत्मिक अर्पण देणारे, त्यांच्या ओठाचे फळ, त्याच्या नावाला स्तुती देणारे. काय—काय लोक आहेत! ते त्याचे आहेत.

136 आणि नीट पाहा, आता, त्या दिवसात किती मोठी गोष्ट असेल, काही धर्मवेड्यांसाठी मंडळीत येणे, एक धर्मवेडा, आणि असा प्रचार करणे जो त्यांच्या विश्वासाच्या मार्गाच्या पूर्णपणे चाकोरी बाहेरचा वाटणारा होता. आणि वैज्ञानिकांसाठी, “ते का ते—ते सरळ वेडपण होते.” ते वैज्ञानिकदृष्ट्या कसे सिध्द करु शकत होते की तेथे पाऊस नव्हता!

137 परंतु ह्या साध्या मेंढपाळाने विश्‍वास ठेवला, “जर देव बोलला आहे पाऊस पडेल, पाऊस पडेल.” पाहिले?

138 आणि म्हणून त्याची आजच्या दिवसाशी तुलना करा, जर कोणाला आरोग्य मिळाले. ते म्हणतात, “ती फक्त भावना आहे. मी विज्ञानाद्वारे तुम्हाला सिध्द करु शकतो, की कर्करोग, किंवा ते पदार्थ किंवा—किंवा—किंवा तो पदार्थ तेथे आहे.” परंतू, साध्या विश्वासणाऱ्यासाठी, तो गेलेला आहे. पाहिले? कारण, तो त्या पदार्थाकडे पाहात नाही, तो अभिवचनाकडे पाहात आहे, तसेच जसे नोहाने केले.

139 म्हणून तुम्ही पाहात नाही का, “जसे नोहाच्या दिवसात, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळे होईल.”

140 वैज्ञानिक दृष्टीने...डॉक्टर म्हणू शकतो, “येथे बघ, तुझे टेंगूळ अजूनही तेथे आहे, तुझा कर्करोग तसाच आहे. तुझा हात जसा होता तसा पांगळा आहे. तू वेडा आहेस.”

141 आणि, लक्षात घ्या, तो तोच आत्मा आहे, जो नोहाच्या दिवसांपासून आहे, तो म्हणतो, “तोपर्यंत तेथे पाऊस नव्हता. आपण चंद्रावर साधने फेकू शकतो, आणि तेथे पाऊस नव्हता.” परंतु जर देव बोलत आहे, तर तेथे पाऊस पडेल!

142 “विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टीं विषयीचा भरवसा, आणि न दिसणाऱ्या गोष्टीबद्दल खातरी आहे.” आणि विश्वासाचे अंतिम विसाव्याचे ठिकाण म्हणजे देवाचे वचन आहे. तेथेच जेथे त्याला विसाव्याचे स्थान मिळते. तुम्हाला समजले? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] त्याचे विसाव्याचे स्थान देवाच्या वचनावर आहे.

143 तेथेच जेथे नोहा विसावा पावला, “देव असे बोलला.” म्हणजे ते कायम झाले. आता जर तुम्ही पुन्हा अवलोकन केले, तर, आता, नोहा असा विश्वास ठेवणारा, धर्मवेडा होता.

144 आणि आजचे लोक जे पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यात विश्वास ठेवतात. आता, मंडळी म्हणते, “ही लोकं धर्मवेडी आहेत. ते कोणीच नाही परंतु एक भावनेने कार्यरत, भावनाप्रधान, घाबरट लोकांचा समुह आहे.” परंतु थोडके जे त्यांना माहीत आहे ते देवाचे वचन त्यांना शिकवते. ते अभिवचन आहे.

145 आणि नोहाला, त्यांनी कितीही सांगितले तरी, “हा म्हातारा मनुष्य वेडा झाला आहे, की तो वैज्ञानिकदृष्ट्या चुकीचा आहे; आणि—आणि—आणि मानसिकरित्या, तो चुकीचा आहे.” परंतु, नोहासाठी, तो देवाचा शब्द होता, आणि नोहा त्या बरोबर राहिला. आणि ज्ञानी आणि विचारवंत त्या साधेपणावर अडखळले, आणि त्यांचे अस्तित्व गमावून बसले. कसला आता एक—एक—एक निषेध आहे, त्या पिढीमध्ये!

146 कित्येक लोक म्हणतात, “जर मी तेथे मागे जीवंत असतो!” नाही, तुम्ही ही तसेच केले असते. कारण, आज, त्याच गोष्टीची पुनरावृत्ती होत आहे, फक्त ती वेगळ्या स्वरुपात, ते आजही त्यावर अडखळतात जसे त्यांनी त्यावेळी केले.

147 ह्यात संशय नाही, त्यांच्या दिवसांतही, त्यांच्याकडे खूप प्रचारक होते, परंतु नोहा देवाच्या प्रेरणेने चालत होता आणि नोहा बाहेर पाहू शकत होता आणि समजत होता की काय घडण्याचे ठरले आहे, आणि जाणून होता की ह्यासारखी व्यभिचारी व दुष्ट पिढी, परमेश्वर उभी राहू देणार नाही. म्हणून आपण आज काय करु शकतो, परंतु तीच गोष्ट पाहात आहोत! आधुनिक सदोम आणि गमोरा, पाहा, दुष्ट व्यभिचारी लोक, विद्वत्तेमध्ये एवढे तरबेज की ते त्याचे वचन दाखविणाऱ्या त्याच्या अस्तित्वाचे आणि त्याच्या वचनाचे देवाच्या प्रकटीकरणाच्या साधेपणावर ते अडखळतात.

148 ह्या जगात तेथे एकही मनुष्य नाही, रोजेला...कि किंवा आणि—आणि म्हणून शकेल की काय आम्हाला देवाचे वचन प्रगट झालेले दिसत नाही. शेवटच्या दिवसासाठी असलेले अभिवचन, संध्याकाळचा तो प्रकाश जो चमकणार होता, आम्ही भाग्यवान लोक आहोत,

की तो पाहत आहोत. आणि, उच्च तकाकी असलेले जग त्यांच्यापासून ते लपलेले आहे. येशूने ते देवाला, पित्याला सांगितले, तो म्हणाला, “हे तुला बरे वाटले की, त्यांच्यापासून तू ते लपवावे. म्हणूनच, पित्या, तू ते गुप्त ठेवले आहे.” त्यांना त्यांच्या ज्ञानाबरोबर राहू दे...

149 तुम्हाला ठाऊक आहे, उत्पत्तीत, ते ज्ञानच होते की ज्याने पापाच्या घाणीत चेंडू फिरविण्यास सुरुवात केली; कारण हव्वा ज्ञानाचा शोध करीत होती जेव्हा ती सैतानाला भेटली, आणि सैतानाने ते तिला दिले, पाहा. आणि ज्ञान देवाच्या वचनाच्या विरुध्द आहे. आपल्याला ज्ञान मिळविण्यासाठी सांगितले नाही. आपल्याला, जे अगोदरच सांगितलेले आहे त्यावर विश्वास ठेवण्यास सांगितले आहे. म्हणून, पाहा? परंतु, आज, विद्वान ते अशाप्रकारे सफाईने सांगतात, आणि त्यावर ते मांडतात, त्यांचा स्वतःचा त्यास अर्थ लावतात, नेहमीच ते तीच गोष्ट आजही करतात; ती त्याच प्रकारे करतात. आणि, लोकं,...

150 आता लोक मग ते गमावतात, त्याचप्रकारे ते ते गमावतात आणि ते आजही तसेच करतात. तीच गोष्ट. ते तीच गोष्ट करतात. ह्याचे कारण हे आहे की ते ते गमावतात. कारण...कारण ते त्यावर विश्वास ठेवण्यास फार चलाख होते. पाहिले? आता, संदेश इतका साधा होता, की हुशार त्या संदेशाच्या साधेपणावर विश्वास ठेवण्यासाठी खूप चलाख होते, पाहीले? आता संदेश इतका साधा होता, की हुशार संदेशाच्या साधेपणावर विश्वास ठेवण्यासाठी खूप चलाख होते. अरे बापरे! देवाने ते इतके साधेपणात केले, सत्यात, की चलाख आणि विद्वान ते बघूनही गमावून बसले, कारण तो खूप साधा होता. ठीक, त्याचमुळे देवाची महानता इतकी महान बनविते; कारण ती अति महान आहे, त्याला स्वत:ला साधे बनविते.

151 आज माणसे, दाखवित आहेत की ते देवाचे नाहीत, ते महान आहेत आणि अधिक महान बनण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्यांना महानतेने व्यक्त करीत आहेत, आणि “मोठे बिशप डॉक्टर पवित्र पोप,” सर्वगोष्टी, त्यांना काहीतरी बनवित आहेत जे ते वास्तविकपणे नाहीत. आणि देव, इतका महान असताना त्याला साधेपणाने खाली आणित आहे. साधेपणात महानता आहे.

152 आपण जेट विमान बनवू शकतो, आपण रॉकेट सोडू शकतो किंवा अंतराळात मिसाईल सोडू शकतो. आणि आपण ह्या सर्व गोष्टी करु शकतो, तरी, परंतु आपण गवताचे एक पाते बनवू शकत नाही. ओह, आमेन. त्याविषयी काय? परंतु मागे येण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आणि पाहा गवताला कोणी बनविले, आणि त्या देवाला स्विकारावे ज्याने ते गवत निर्माण केले, आपण मिसाईल बनविण्याचा प्रयत्न करीतो की कोणी इतर बनविण्याच्या अगोदर आपला लवकर झाला पाहीजे. पाहा?

153 आपण इतके चलाख आणि बौद्धिक, आहोत आपल्या मंडळीत, आपण लाखो, डॉलर्स इमारत, किंवा दहा लाख डॉलरची इमारत बांधू शकतो, परंतु, तरी, आणि अशी बांधण्याचा प्रयत्न करीतो जी मेथडिस्टपेक्षा, किंवा बाप्टिस्ट पेक्षा, किंवा प्रेसबेटेरियनपेक्षा, अधिक चांगली आहे, आणि पेंटेकॉस्टल उंदराच्या शर्यतीत लागले आहेत. परंतु गोष्ट अशी आहे की, आपण अजुनही, आपण इतके चतूर आहोत आणि म्हणून आपल्याच मार्गावर चालतो जोपर्यंत आपण स्वत:ला नम्र करण्यात अपयशी ठरतो, देवाला ओळखण्यासाठी ज्याला एका कोपऱ्यातल्या लहान ध्येयात ठेवतो. पाहा? ते बरोबर आहे. हे, सत्य आहे बरे, आपण साधेपणात अडखळतो ते त्यांनी नेहमीच केलेले आहे.

154 आता, ते, ते—ते अशा साध्या संदेशावर विश्वास ठेवण्यास खूपच विवेकी होते. तो त्यांच्या वैज्ञानिक संशोधनाच्या मानाने इतका चांगला नव्हता. तो नव्हता—तो बुध्दिमान नव्हता, तो संदेश त्या दिवसातल्या शैक्षणिक कार्यक्रमानुसार पुरेसा नव्हता. पाहा? त्यांना अभ्यास करण्याची गरज होती, जाणून घेण्यासाठी की तेथे देव होता, आणि त्यांना समजण्यासाठी अभ्यास करणे होते की तो महान होता, आणि ते स्वतःला त्याच्या बरोबर महान बनविण्याचा प्रयत्न करीत होते. जेव्हा मार्ग वर नेतो तो खाली ही आणतो.

155 आता, ज्याला माहीत आहे की उत्तर ध्रुव उत्तरेस आहे, किंवा दक्षिण ध्रुव उत्तरेस आहे किंवा उत्तर ध्रुव दक्षिणेस आहे, दक्षिण ध्रुव उत्तरेस आहे? कुठले वर आहे आणि कुठले खाली आहे? आम्ही अवकाशात टांगले आहोत, आपण म्हणतो "उत्तर ध्रुव वर आहे." तुम्हाला कसे कळेल? दक्षिण ध्रुव उत्तर असू शकेल. पाहा, तुम्हाला ठाऊक नाही. म्हणून आपण लक्षात ठेवू या, आणि हे वचन...

156 म्हणालो, "तर भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही, कसे सांगू शकता, की 'वर जाणे म्हणजे खाली जाणे आहे'?"

157 येशू ख्रिस्ताच्या वचनाच्या आधाराने त्याने म्हटले, "तो जो स्वतःला नम्र करितो तो उंचाविला जाईल, परंतु जो स्वतःला उंचावितो तो नमविला जाईल." म्हणून तर, खरे पाहता, वर खाली आहे, आणि खाली वर आहे.

158 जसे जुने संत शिकागो मध्ये बोलले, की...एक मनुष्य कोणी एक सेवक कोणी एका संघटनेचा, पेंटीकोस्टल समोर उभा राहीला. त्यांच्या सर्व बौध्दिक गोष्टी एकत्र होत्या. तो तेथे उभा राहिला आणि शब्द वापरले की पेंटेकॉस्टल ह्याविषयी काहीच जाणत नाहीत, आणि तो तेथे उभा राहिला, आणि त्याने पाहीले की ते पेंटेकॉस्टल लोकांबरोबर जुळत नव्हते. आणि तो वर गेला, त्याची छाती बाहेर काढुन, आणि तो पवित्र डॉक्टर *अमुक–आणि–अमुक*; तुम्हाला माहीत आहे. शिकागो मधील *कोणी एका* मोठ्या शाळेचा होता. आणि त्याने सभोवती पाहीले, आणि ते पेंटेकॉस्टलस एकमेकांकडे पाहात होते. त्यांना कळले देखिल नाही की तो कशा विषयी बोलत होता, तो इतका सुशिक्षीत, इतका हुशार, तल्लख होता. त्यांना कळले नाही.

159 ते काही तरी कोणा एका सिनेटच्या सदस्या सारखे होते, किंवा एक मनुष्य जो नुकताच अध्यक्षा साठी लढला होता आणि पराभूत झाला होता. टक कूट्स मला म्हणाले. जेव्हा मी आई फोर्डच्या अंत्य विधीच्या वेळी प्रचार करीत होतो, आणि पुनरुत्थाना विषयी, पुनरुत्थानाच्या हमी विषयी सांगत होतो. इतके निश्चित ज्याप्रमाणे सूर्य उगवतो, त्याप्रमाणे मी पुनरुत्थीत होईन. ज्याप्रमाणे गवत मरते पडते मोसमात, आणि पाने झाडतात पडतात, ते पुन्हा येतात.जेव्हा पृथ्वी कक्षेच्या भोवती फिरते तिला पुन्हा उठावे लागतेच

160 टक म्हणाला, "मी त्या संदेशाचे कौतुक करतो, बीली." भाऊ नेविल आणि मी एकत्र मोटारीत बसलो होतो. आणि मी म्हणालो, "टक..." तो म्हणाला, "मी तुझ्या संदेशांचे कौतुक करतो."

मी म्हणालो, "टक, माझ्याकडे शिक्षण नाही,"

तो म्हणाला, "तो तर त्याविषयी चांगला भाग आहे," पाहिले?

161 आणि, आता, तो म्हणाला तो पाहण्यासाठी गेला...ठीक आहे, मला वाटले त्या मनुष्याने मला क्षमा केली, मला असे म्हणायचे नाही...ॲडलय स्टिव्हनसन, तुला माहीत आहे. आणि तो म्हणाला त्याने त्याला पंधरा मिनीटे ऐकले. आणि श्रीमान स्टिव्हनसन हा एक बुध्दिमान प्रचारक आहे, असायला हवा, तुम्हाला माहीत आहे, जोपर्यंत टक

म्हणाला..."मी अंदाज केला की त्याच्याकडे विद्यालयीन शिक्षण आहे. तो तेथे स्थिर असता झोपी गेला आणि म्हणाला तो झोपी गेला आहे पंधरा मिनिटे त्याचे ऐकताच परन्तु म्हणाला कॉलेज शिक्षण घेतलेला मला समजले नाही पण खूप थोडके शब्द तो म्हणाला, ते इतके उच्च दर्जाचे होते." तो म्हणाला, "तू मला तुझ्या एकाही सभेत कधीच झोपलेले पाहिले नाही, तू पाहिलेस का, भाऊ ब्रॅन्हम?"

162 म्हणून, पाहा, तो तर त्याचा साधेपणा आहे, अगदी साधा, तेथेच जेथे देव राहतो.

163 आता, ते खूप हुशार होते, त्या दिवसात, देवाच्या कार्य करण्याच्या गोष्टीचा साध्या मार्गाचा अर्थ समजण्यासाठी ते खूप चलाख होते. ते त्यांच्यासाठी उच्च दर्जाचे नव्हते. ते दर्जाचे असले पाहीजे, ते उच्च तकाकी असलेले आवश्यक होते, किवां ते त्याला गमावतील. आता, परंतु, तो महान यहोवा त्याच्या वचनात लपला होता. आणि तो स्वत:स त्या लोकांना प्रगट करतो जे त्याच्या वचनावर विश्वास ठेवतात, त्यांना वाचविण्या द्वारे आणि त्याचा साधा संदेश प्रचार करण्यासाठी आणतो. नोहाचा साधा संदेश, देवाने तो आणला, आता तेथे लक्ष द्या.

164 आता, नंतर, पुन्हा मोशेच्या दिवसात, दुसऱ्या मुक्तीच्या वेळेकडे लक्ष द्या.

165 जेव्हा देव त्याच्या लोकांना मुक्त करण्यासाठी काही करणार असतो, देव त्याच्या लोकांकडे संदेश पाठवितो. आणि, तो इतका साधा असतो, जसे आपण ते हे शिक्के फोडताना पाहणार आहोत. तोच माझा ह्या गोष्टी अगोदर सांगण्याचा हेतू होता. आपण पाहतो की ते शिक्के फोडणे इतके साधे आहे की, हुशार ते लाखो मैलाने, गमावतील. पाहिले? माझी आशा आहे की देव त्यासाठी मला अभिषेक करील पहा? पहा ते अगदी वरुन जाते. तेच कारण आहे, मला वाटले की ह्या सकाळी, हाच संदेश पायाभरणी करण्यासाठी योग्य होईल, देवाचा साधेपणा, पहा देव कसे त्याला साधेपणात लपवितो.

166 जरा विचार करा, ते अणू बॉम्ब फोडू शकतात आणि इतर प्रत्येक गोष्ट करु शकतात; परंतु जेव्हा ते जीवनाला स्पर्श करण्यास येतात, ते सांगूही शकत नाही ते कोठून येते. एक साधे गवताचे पाते, आणि देव त्यात लपलेला आहे. ते चंद्रावर यान सोडू शकतात, आणि—आणि तेथे रडार झाडू शकतात, किंवा किती तरी अनेक, आणि तरीही गवताच्या पात्यातले जीवन ते समजवू शकत नाहीत ते बरोबर आहे. पाहा? ते अशासाठी की ते समजवू शकत नाही. ते इतके साधे आहे, ते त्याकडे दुर्लक्ष करतात.

167 आता मोशेकडे लक्ष देऊ या, त्या दिवसात जेव्हा देव, त्याच्या वचनानुसार, इस्त्राएलाच्या संततीस सोडविणार होता. त्याने, त्याने काय केले? त्याने एक साधे कुटूंब निवडले. आपल्याकडे त्यांची काही नोंद नाही. पाहा, फक्त, "एक लेवीचा पुत्र," हेच सर्व काही आम्हाला माहीत आहे. पाहीले? आणि म्हणून आम्ही...आणि त्याची पत्नी. कदाचित, एक—एक साधारण चिखल मळणारे, जसे जग विचार करील, तेथे बाहेर शत्रूंसाठी विटा बनविणारे. तो इस्त्राएलामध्ये फक्त एक साधारण गुलाम होता, परंतु देवाने ते कुटूंब सोडवणूक करण्यासाठी निवडले; फक्त एक साधारण यहुदी कुटूंब. तो कधीच गेला नाही आणि राजकीय आणि प्रसिध्द असलेल्यांकडे गेला नाही, किंवा काहीतरी किंवा काही याजक त्याच्या कडे नव्हते. त्याने एक सामान्य, साधारण कुटूंब घेतले. पाहीले? साधेपणा! लक्ष द्या, त्याने काय केले, तर त्याने एका मुलाला पुढे आणले, एक साधा मनुष्य. तो...

168 तो करु शकला—तो करु शकला असता, तो सुर्याला नियुक्त करु शकला असता, जर त्याची इच्छा असती तर, त्यांना सोडविण्याकरिता. तो त्यांना सोडविण्याकरिता

वाऱ्याला नियुक्त करु शकला असता. तो त्यांना सोडविण्याकरिता एका देवदूताला नियुक्त करु शकला असता. ओह, हालेलुयाह! देव त्याला जे पाहिजे ते करु शकतो.

“तर, ते तुला कसे ठाऊक आहे, भाऊ, ब्रॅन्हम?”

169 देव त्याचा कार्यक्रम सोडणार नाही. ते कारण आहे आपल्याला माहित आहे, ह्या दिवशी, ते साधे असणे आवश्यक आहे. पाहा? आता, तो सदैव साधेपणात काम करतो. परंतु देव, प्रारंभीच, सुर्याला सुवार्ता प्रचार करण्यासाठी बनवू शकला असता, किंवा वाऱ्याला सुवार्ता प्रचार करण्यासाठी, किंवा देवदूताने सुवार्ता प्रचार केली असती, परंतु त्या–त्या उद्देशांसाठी मनुष्यांना नियुक्त केले, आणि तो ते कधीही बदलत नाही. त्याने कधीच नियुक्त मध्ये...त्याने कधीच संप्रदायांना नियुक्त केले नाही. त्याने कधीही मनुष्यांच्या समुहांना नियुक्त केले नाही. त्याने मनुष्यांना त्याची सुवार्ता प्रचार करण्यासाठी नियुक्त केले; यंत्रांना घेतले नाही, यांत्रिक उपकरणांना किंवा कोणत्या देवदूतांना केले नाही. तो मनुष्य होता!

170 आणि जेव्हा त्याने तेथील लोकांची सोडवणूक केली, त्याने साध्या मनुष्याला, गुलामांच्या समुहातील साध्या कुटूंबात पाठवले. ओह, बाप रे! काय तो देव आहे, स्वतःला साधेपणात प्रगट करतो!

171 आता लक्ष द्या. आणि त्याने त्याला जगिक ज्ञानाचे प्रशिक्षण दिले, ह्यासाठी की तो अपयशी होऊ शकेल, आणि त्याला दाखविले की हे ते ज्ञान नाही ज्याद्वारे आपली सुटका होऊ शकेल. तो विश्वास आहे ज्याद्वारे आपली मुक्ती (सोडवणूक) झाली आहे. त्याने त्याला त्यात जाऊ दिले आणि तसे शिक्षण घेऊ दिले तोपर्यंत की तो मिसरी ज्ञान शिकवू शकला, तो इतका हुशार होता. परमेश्वर त्या सामान्य कुटूंबासमवेत होता, कदाचित, त्याचे नावही लिहू शकत नव्हते. आणि मोशेला अतिउच्च शिक्षण, महान शिक्षण देण्यात आले होते, की तो शिक्षकांना ते ज्ञान शिकवू शकत होता. तो बुध्दीमानाला शिकवू शकत होता. होय. आणि देवाने त्याला अशा मार्गाने घेऊ दिले, ह्यासाठी की तो स्वत:ला लीनतेत प्रगट करु शकला, हे दाखवावे की ज्ञानाला त्याच्याशी काही करणे नाही. आणि मोशे त्याच्या अलौकीक बुध्दीमत्तेत दुःख कारकरित्या अपयशी ठरला. त्याने त्याला त्याप्रकारे त्याच्या उद्देशासाठी जाऊ दिले, की तो अपयशी ठरेल. आणि तो अपयशी झाला, आणि तो पडला.

172 ह्यासाठी, की दाखवावे, “बलाने नव्हे, सामर्थ्याने नव्हे,” परंतु मिसरातील ज्ञानाने नव्हे, आपल्या शाळेतील ज्ञानाद्वारे नाही, आपल्या सेमिनरीच्या सामर्थ्याने नाही, परंतु आपल्या संघटनेच्या पैशाने नाही, आपल्या विद्वत्तेच्या शिक्षेच्या सामर्थ्याने नव्हे, “परंतु माझ्या आत्म्याद्वारे, परमेश्वर म्हणतो.” त्याचे ज्ञान नाश पावले आणि त्याचा अंत झाला, जेव्हा तो तेथे जळत्या झुडूपात देवाला भेटला. त्याने त्याचे जोडे काढले आणि स्वतःला लीनतेने नम्र केले, आणि त्याच्या सर्व ज्ञानाविषयी विसरला.

173 देव, सोडवणूक करणारा, त्याला ज्ञानात प्रशिक्षण द्यावे लागले, ह्यासाठी की त्याने अपयशी व्हावे, हे दाखवण्यासाठी की तुम्ही तुमच्या स्वतःच्या समजण्यावर इतर कोणाच्या समजेवर अवलंबून राहू शकत नाही. त्याला पडू द्या की, त्याचा हात दाखवावा. तुम्ही ते पाहू शकता? [मंडळी म्हणते, “आमेन,”—सम्पा.] असे करण्यात देवाचा उद्देश हा आहे की स्वतःला लीनतेत प्रगट करावे. आणि त्याने मोशेला इतके होऊ दिले की तो झाला—तो नंतरचा फारो होऊ शकेल. तो एक सामर्थ्यशाली योध्दा होता. इतिहासाप्रमाणे, मोशे एकट्याने, सभोवतालचे देश त्याने स्वतः जिंकले. आणि नंतर जेव्हा तो देवाच्या कामाकडे वळला, त्या सर्व कौशल्यासह, देवाने त्याला अविचाराने कोसळू दिले, ह्यासाठी त्याने

त्याला तेथे वाळवंटातात न्यावे आणि त्याच्यातून ते सर्व बाहेर काढावे. नंतर त्याला लीनतेत, प्रगट व्हावे, आणि त्याला खाली त्याच्या हातात एक काठी देऊन, त्याच्या लोकांना सोडविण्यासाठी पाठविले.

174 जेव्हा, तो ते लष्करी प्रशिक्षणाद्वारे, शिक्षणाद्वारे, वैज्ञानिक शिक्षणाद्वारे करु शकला नाही. आणि एका लष्करी सैन्याद्वारे तो ते करु शकला नाही. आणि त्याने त्याला एक जुनी वक्र वाळवंटातील काठी दिली, आणि त्याने ते त्याच्या बरोबर केले. देव लीनतेत, साधेपणात देव त्या काठीमध्ये आणि मोशेमध्ये होता. आणि जोपर्यंत मोशेकडे काठी होती, देव तिच्यात होता, कारण देव मोशेमध्ये होता. निश्चितच.

175 लक्ष द्या, "बलाने नव्हे, सामर्थ्याने—ने नव्हे, परंतु माझ्या आत्म्याच्या द्वारे." परंतु साध्या विश्वासा द्वारे!

176 मोशे हे समजून होता, त्याच्या आईच्या शिकवणीद्वारे, की तो एक सोडवणूक करणारा बनणार होता. आणि त्याने स्वतःला लष्करी सामर्थ्याचे प्रशिक्षण दिले, तसे करण्यासाठी, परंतु ते अयशस्वी झाले. पाहीले? त्याच्याकडे समज होती, त्याच्याकडे शिक्षण होते, परंतु त्याचा उपयोग झाला नाही. म्हणून त्याला ते सर्व विसरावे लागले, आणि देवाचे वचन घेण्याद्वारे साध्या गोष्टीकडे यावे लागले, आणि नंतर त्याने लोकांना सोडविले. होय, महाशय.

177 देव (कशाने?) सोडवणूक करतो त्याच्या वचनावरील विश्वासा द्वारे. नेहमीच करीत आला. आपण त्या गोष्टी घेऊ शकलो असतो जर आपल्याकडे वेळ असता. आपल्याकडे बहुतेक वीस मिनीटे अजून आहेत.

178 आपण काईन आणि हाबेल ह्यांच्याकडे पाहू शकलो असतो, काईनाने कशाप्रकारे सौंदर्या द्वारे देवाला संतोषविण्याचा प्रयत्न केला.

179 दुसरा मार्ग, लोक विचार करतात, "महान, चांगले कपडे घातलेल्या मंडळ्या, एक याजक...झगे घातलेल्या सेवकां बरोबर, आणि झगे घातलेले गाणारे समुह, आणि सर्व जे काही घातलेले आहे, त्याद्वारे देवाला संतोष होतो." तुम्ही पाहू शकता की हे कोठून आले? काईनाने तीच गोष्ट करण्याचा प्रयत्न केला. आणि त्याने एक वेदी बांधली, ह्यात संशय नाही की ती त्याने सुंदर बनवली.

180 आणि, तो मनुष्य प्रामाणिक होता. त्याने भक्ती केली. त्याला वाटले, "जोपर्यंत मी प्रामाणिक आहे, त्याने काही फरक पडत नाही." त्याने फरक पडतो. तुम्ही प्रामाणिकपणे ही चुका करु शकता.

181 लक्ष द्या, त्याने—त्याने ही वेदी बांधली आणि त्याने, अशी चांगली, त्यावर फुले ठेवली आणि सजवली आणि सुंदर फळे ठेवली, आणि विचार केला, निश्चितच महान, पवित्र, स्वच्छ सुंदर देव त्या अर्पणाचा स्विकार करील. परंतु पाहा, त्याने ते त्याच्या स्वतःच्या ज्ञानाने त्याने ते त्याच्या स्वतःच्या विचारांद्वारे केले.

182 आणि आजही तेच आहे. तो—तो...ते त्यांच्या स्वतःच्या ज्ञानाने ते करतात, त्यांच्या शिक्षणाद्वारे, त्यांच्या शिक्षणाद्वारे आणि नीतीतत्वे जे ते शिकले.

183 "परंतु हाबेलाने प्रकटीकरणाद्वारे, विश्वासाद्वारे देवाला अधिक चांगला यज्ञ देवाला केला." स्वच्छ असे काही नाही, त्याकडे पाहता, मानवीरीतीने बोलताना. तो लहानसा प्राणी, आणि त्याच्या मानेला पकडून आणि त्याभोवती द्राक्षासारखे आच्छादन करुन, तसेच *काही*, आणि त्याला वेदीपर्यंत ओढीत आणले. येथे त्याबद्दल सुंदर असे काही दिसत नाही त्याला वेदीवर रचले, आणि त्याचा लहानसा गळा एका—एका टोकेरी दगडाने

कापला, जोपर्यंत त्याचे फडफडत सर्व त्याच्यावर पडते आणि तो किंचाळतो मरतो, पाहताना ते भयंकर दृश्य होते ते तरीही साधे होते.

184 साधेपणात, त्याला हे माहीत होते की त्याचा जन्म त्याच्या आईच्या आणि वडिलांच्या रक्ताने झाला, त्याच्या आईच्या रक्ताने, त्याच्या वडिलांच्या रक्ताने जन्मला; आणि ते रक्तच होते ज्यामुळे पतन झाले, म्हणून ते रक्तच होते की जे ते परत घेणार होते. “म्हणून त्याने देवाला अधिक चांगला यज्ञ केला, कारण ते त्यास प्रगट झाले होते.”

185 आणि काही भाऊ, आज, ज्यांना वाटते त्यांनी सफरचंद आणि पेर खाल्ले! आणि मी दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात, सर्वात मूलगामी गोष्ट पाहिली. ते म्हणाले, “आता त्यांनी सिध्द केले आहे की जे हव्वेने खाल्ले, ते सफरचंद नव्हते.” ते मला—मला वाटते ते दावा करितात, “ते जर्दाळू होते.” म्हणूनच, ओह, पाहा तो आत्मा कोठून आला!

186 आणि ते म्हणतात, की “मोशेने वास्तवात तांबडा समुद्र कधीच ओलांडला नाही. की, तो तेथे एक—एक बोरुचा घड होता, एक बोरुचा समुद्र. आणि त्याने इस्त्राएलाच्या संततीस बोरुच्या समुद्रातून बाहेर आणले. वर समुद्राच्या शेवटी, तेथे मोठा बोरूंचा घड होता. आणि मोशेने समुद्र ओलांडला, परंतु तो बोरूचा समुद्र होता जो त्याने ओलांडला; तुम्हाला माहीत आहे, गवत, उंच, पाण्यातील मोठ्या प्रमाणात आणि गोष्टींसारखे जे तो ओलांडून तेथे गेला.” किती मुर्खत्व!

187 जेव्हा “पाणी” पवित्रशास्त्र सांगते, “उजवीकडून डावीकडे विभागले गेले, आणि देवाने एक अफाट पूर्व दिशेचा वारा ते वेगळे करण्यासाठी निर्माण केला.” समजले? पाहिले?

188 ते त्यांच्या स्वतःच्या मार्गाने आकृती करण्याचा प्रयत्न करु इच्छितात. आणि त्याचप्रकारे ते नेहमीच अयशस्वी ठरले आहेत, आणि ते अयशस्वी होत राहतील. तुम्हाला ह्या सर्व गोष्टी ठाऊक आहेत.

189 आणि काईन हा आजच्या ऐहीक मनाच्या प्रकारचा मनुष्य होता, जो बाहेरुन धार्मिक होता. तो काहीतरी बाहेरुन करु इच्छित आहे. परंतु तो आहे...तो मंडळीत जातो, आणि—आणि तो इमारतीसाठी खूप गोष्टी करतो.

तेथे फक्त एकच मंडळी आहे, आणि तुम्ही तेथे जात नाही.

190 ती विश्रामगृहे आहे. पाहा, तुम्ही मेथडिस्ट विश्रामगृहात सामिल होतात. बाप्टिस्ट विश्रामगृह, प्रेसबेटेरियन विश्रामगृह, पेंटेकॉस्टल विश्रामगृह.

परंतु तुम्ही मंडळीत जन्माला येता. होय, महाशय. पाहीले?

191 ती सर्व विश्रामगृहे आहे. त्या मंडळ्या नाही. ती विश्रामगृहे आहेत. आणि मेथडिस्ट “मंडळी” अशी काही गोष्ट नाही, किंवा पेंटेकॉस्टल “मंडळी” नाही. तेथे अशी गोष्ट नाही आहे. नाही, ते सर्व चुकीचे आहे. पाहा? ते...बरोबर आहे. ते, ते विश्रामगृहे आहेत. ज्यात लोक सामील होतात.

192 परंतु तुम्ही जीवंत देवाच्या मंडळीत जन्मास येतात, आणि तेच येशू ख्रिस्ताचे रहस्यमय शरीर आहे जे रचले जात आहे.

193 आता, परंतु, हे देवाला बरे वाटले की त्याचे गुपीत हाबेलास प्रगट करावे, ओतल्या गेलेल्या रक्तावरील सामान्य विश्वासाद्वारे. ओह, माझी इच्छा आहे की माझ्याकडे ह्यावर अधिक थांबण्यासाठी थोडा वेळ आहे. पाहीले

194 तरीही, आणि काईन, त्याच्या सर्व ज्ञानासह, एक हुशार मनुष्य! "ओह," तुम्ही म्हणाल, "आता, भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही म्हणालात तो...तुम्ही त्याला शिक्षित अलौकिक असलेला व्यक्ती बनविण्याचा प्रयत्न करीत आहात? तो होता. तो हुशार होता...त्याची शक्ती पाहा. त्याच्या मुलांकडे पाहा. त्यांच्यातील प्रत्येक जण वैज्ञानिक, आणि वैद्य होते, आणि प्रत्येक जण, हुशार मनुष्य."

195 परंतु, तुम्ही शेथाचे वंशज पाहा, ते नम्र, शेतकरी होते, आणि असेच पुढे, खाली नाशा पर्यंत.

196 परंतु काईनाची संतती हुशार, बुध्दीमान समुह होता. ते सुध्दा, ते दावा करतात, तांब्याला आकार देणारे, आणि ते धातू बनविणारे, आणि बांधकाम व्यावसायिक. आणि ते बुध्दिमान मनुष्य होते.

197 जेव्हा—जेव्हा इतर माणसे फक्त तंबूत राहत होती, आणि त्यांच्या मेंढ्या चारीत होती आणि देवाच्या अभिवचनावर विसंबून होती. पाहिले? पाहा ते काय होते? आता फक्त वंशा वळ्यांचे अनुसरण खाली केले, आणि पाहा की ते बरोबर आहे की नाही. पाहीले? ते देवाच्या वचनावर विसंबून होते.

198 त्याचप्रकारे नोहाला निवडले होते, त्या लोकांमधून. त्याच प्रकारे पौलाला त्याच्या कळपांतून घेतले होते. पाहा? त्याचप्रकारे जॉन वेस्ली, मार्टीन लुथर, आणि किती अनेक तसेच बनण्याकरिता तुम्ही आज आला आहात, पाहा, तीच गोष्ट, नम्र, देवाच्या साध्या वचनावर विश्‍वास ठेवण्या करिता.

199 आता, लक्ष द्या, ते देवाला संतोषकारक वाटते की ओळखावे. आता, देव सदैव प्रगट करितो की ते खरे आहे की नाही. पाहा? आता, कित्येक काही गोष्टी स्वतःहून करण्याचा प्रयत्न करितात की ज्या पासून देव लाखो मैल दूर राहतो. ते खरे आहे. परंतु जेव्हा तुम्ही पाहता देव परत सभोवती येतो ते आहे, ते अवतरण चिन्हात लिहा, म्हणतो, "*ते* खरे आहे, *ते* खरे आहे, *ते* खरे आहे," तेव्हा तुम्हाला कळते ते खरे आहे.

200 आता, जेव्हा अर्पण वेदीवर होते, देवाने देवाविषयी बौध्दिक संकल्पनेचा नकार केला. परंतु त्याने हाबेलाला पाहिले, साध्या विश्वासाद्वारे विश्‍वास ठेवला की ते सफरचंद नाही किंवा शेतातील फळे, परंतु ते रक्त होते; विश्वासाद्वारे त्याने त्यावर विश्‍वास ठेवला, देवाकडून मिळणाऱ्या प्रकटीकरणाद्वारे. देवाने प्रगट केले त्याचे अर्पण स्विकारण्या द्वारे. पाहीले?

201 तेथेच कुठे आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्याचा विचार करतो, इतर गोष्टी. येशूने म्हटले "जर, तुम्ही माझ्यामध्ये राहिला व माझी वचने तुम्हामध्ये राहिली तर जे काही तुम्हाला पाहीजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल."

202 आता, जसे आपण खाली बरोबर येत आहोत, जलद रितीने आता, आपल्याकडे वीस मिनीटे आणखी आहेत.

203 लक्ष द्या, एलीयाच्या दिवसात, देवाने त्याला लपविण्यासाठी एक साधा मनुष्य निवडला. आता, फक्त त्याचा विचार करा. देवाने निवडला. ती त्याची निवड होती. लक्षात घ्या, त्यांच्याकडे रब्बी, याजक होते. त्यांच्याकडे त्या दिवसात महान मनुष्य होते. त्यांच्याकडे त्या दिवसात महान मनुष्य होते. तेवढेच नाही राजा अहाब, स्वतः एक यहुदी होता. त्याच्याकडे त्याच्या राज्यात त्या दिवसात महान मनुष्य होते. परंतु देवाने स्वतःला एका साध्या मनुष्यात लपविले, विद्वानात नाही, नाही, जगातील सुप्रसिध्द मनुष्यात. नाही. काही महान लष्करी बुध्दीमानात किंवा काही गोष्टी नाही, मोठे नाव

नाही. आपल्याला हे ही माहीत नाही की त्याचे बाबा कोण होते किंवा आई कोण होती. आपल्याला त्याच्या वंशावळीबद्दल काहीच ठाऊक नाही. फक्त एक वयस्कर शेतकरी कुठेतरी वाढवण्यात येत होता एक संदेष्टा होण्याकरिता. देवाने त्याच्या उदरनिर्वाहाची सोय जंगलात केली होती. फक्त एक गोष्ट आपल्याला माहीत आहे तो दणदण पावले टाकीत निघून गेला, थेट आत गेला आणि संपूर्ण धर्मोपदेशकाच्या प्रणालीला दोष दिला. माझ्या देवा!

204 आणि तुम्हाला माहीत आहे त्यांना त्याच्याविषयी काय वाटले? "कोणत्या शिक्षणसंस्थेतून तो आला आहे?" पाहीले? तो कोणत्या संप्रदाया बरोबर आहे? तो परुश्यांबरोबर, सदुश्यांबरोबर आहे का? किंवा त्यांच्याकडे आणखी काय होते? तो त्यांच्या पैकी कोणाचाही नव्हता, परंतु त्याने त्या सर्व गोष्टींना दोष दिला. पाहिले? देवाने ते करण्याकरिता त्याला निवडले.

205 परंतु, एक साधा मनुष्य,शिक्षण नसलेला. आपल्याला एक ही ठिकाण माहीत नाही, जेथे तो कधी शाळेत गेला. आपल्याकडे त्याच्या विषयी काही नाही. फक्त एक साधा मनुष्य, परंतु देवाला त्या साध्या मनुष्यात लपण्यास आनंद होता. देव, मागे तेथे, त्या साध्या मनुष्यात, मनुष्यात वास करीत होता. तुम्ही ते समजू शकता का? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.]

206 देव जगासाठी "अशिक्षीत, विक्षिप्त" असलेल्याच्या मध्ये गुप्त होता. कारण, तुम्हाला माहीत आहे, त्यांनी त्याला सर्व गोष्टींचा दोष दिला, अगदी "चेटकीण," म्हटली एलीया. सर्व संदेष्टांना दोषी ठरविण्यात आले, पाहिले.

207 तसेच, येशूलाही त्यातलाच एक म्हणून दोष देण्यात आला, तुम्ही पाहीले, "बालजबूल, वेडा ते म्हणाले, काय, तू वेडा आहेस. होय, ठाऊक आहे तुझ्यात सैतान आहे. तू—तू डोक्याने गेला आहेस." पाहिले?

208 तेथेच जेथे तो त्यांना म्हणाला, "जेव्हा ते शेवटच्या दिवसांत येतील...तसे करणे, देवनिंदा करणे होईल." त्याने त्यांना क्षमा केली, परंतु ह्या शेवटच्या दिवसांत त्याची क्षमा केली जाणार नाही. त्याच्यासाठी दंड भरावा लागेल, अनंत काळासाठी वेगळे होणे, "त्याची क्षमा होणार नाही. ह्या युगी नाही व येणाऱ्या युगीही नाही."

209 परंतु एलीयाला एक वेडा मनुष्य म्हणून गणले गेले. तुम्ही कल्पना करु शकता की वर उभे राहून...सर्व स्त्रीया, आधुनिक दिवसां सारख्या, त्यांचे केस कापीत होत्या, मला वाटते, ईजबेल सारख्या ते चेहरे रंगवीत होत्या, त्या देशातील प्रमुख पहिली स्त्री. आणि—आणि. सर्व प्रचारक जगिक झाले होते आणि सर्व गोष्टी. आणि तेव्हा काय झाले? तेव्हा येथे वृध्द एलीया आला, संपूर्ण गोष्टींना दोष देत होता, थेट इजबेलपासून खालपर्यंत सर्वांना.

210 "का," वाटले, "आम्हाला तुझे ऐकण्याची गरज नाही! आमच्याकडे पाळक आहेत."

211 निश्चितच, त्यांना ऐकण्याची गरज नाही, परंतु तो त्यांचा कसेही करुन पाळक होता. तो इजबेलीचा पाळक होता. तिला ते नको होते. तिच्याकडे वेगळ्या प्रकारचे होते. परंतु, देवाने पाठविलेला, तो होता. पाहिले? तो देवाने तिच्यासाठी पाठविलेला पाळक होता. तीने त्याचा द्वेष केला, परंतु तो तरीही पाळक होता. लक्ष द्या.

212 आणि एलीयाने स्वतःला नम्र केले आणि तो देवाने जे सांगितले, त्यावर ठाम अशा प्रकारे राहिला, की त्याने देवाला संतोष झाला. की एलीयाकडून तोच आत्मा घेतला आणि

गती देऊन तीन वेळा तेथे मार्गात कार्य दर्शविण्याचे अभिवचन दिले. पाहिले? आमेन. आणि त्याने ते केले. आमेन. निश्चितच त्याने केले. निश्चितच. त्याने ते अभिवचन दिले आहे की तो आणि तो अलीशा वर आला, त्याचा उत्तराधिकारी बाप्तिस्मा देणारा योहान; आणि मलाखी 4 प्रमाणे तो येथे शेवटच्या दिवसात पुन्हा असेल. समजले?

213 देवाला तो आत्मा, जो त्या साध्या अशिक्षित जंगलात कोठे तरी राहणाऱ्या व्यक्तीवर होता, आवडला. आणि तो त्याच्या वचनाशी इतका आज्ञाधारक की तो सांगू शके, "एलीया, *हे* कर," आणि एलीया ते करत असे. आणि देवाने स्वतःला तेथे त्याच्यात लपविले, अशा साधेपणात!

214 ते सर्व त्याला म्हणाले, "तो म्हातारा विक्षिप्त मनुष्य, त्याच्याबरोबर काही करायचे नाही," आणि असेच पुढे.

215 परंतु एके दिवशी, जेव्हा तो—तो वृध्द झाला, त्याच्या डोक्याला टक्कल पडले, आणि त्याच्या मिशा लटकत होत्या, पिकलेल्या, आणि काही केस त्याच्या खांद्यावर लटकत होते, लहान वयस्कर त्वचेला चिकटलेले हात, आणि मांस त्यावर लटकत होते. तो खाली शोमरोनी रस्त्यावर चालत आला, आणि त्याचे डोळे वर आकाशा कडे पाहात होते, त्याच्या हातात वाकडी काठी होती. तो दिसण्यास खूप चांगला नव्हता, परंतु त्याच्याकडे, त्या दिवसासाठी, "**प्रभू परमेश्वर म्हणतो**" वचन होते. तो त्यावर बोबडा झाला नाही. तो तोतरा बनला नाही. तो बोलला नाही. "आता, *महान* अहाब." तो वर गेला आणि म्हणाला, "आकाशातून दहिवर अथवा पर्जन्य मी सांगेपर्यंत पडणार नाही." हालेलुयाह! पाहिले? देवाने त्याच्या साधेपणाचा सन्मान केला.

216 आता, तुम्ही पाहिले, जेव्हा तो साध्या मार्गात होता, आणि सगळे त्याच्या विरुध्द होते. सगळे त्याच्या घशाशी होते. सर्व सेवकांच्या संघटना, इतर सर्व गोष्टी, त्याच्या घशाशी होत्या, ते खरे आहे, त्याच्यापासून पळण्याचा प्रयत्न करीत होते. इतर सर्व गोष्टीत परंतु, त्या साधेपणात, जरी ते त्याच्या सभेसाठी त्याला सहकार्य नव्हते आणि जे अधिक त्याच्याकडे होते. सगळे विचार करीत होते की तो विक्षिप्त मनुष्य आहे. देव स्वतःला लपवित होता.

217 परंतु जेव्हा बीज उगविण्याची वेळ आली, जे पेरण्यात आले होते, देवाने आकाशातून अग्नी पाठविण्या द्वारे आणि अर्पण भस्म करण्या द्वारे त्याला प्रगट केले. देव साधेपणात लपवितो. आणि नंतर त्याला पुन्हा प्रगट करतो. पाहीले? निश्चितच. तसे करणे देवाला आवडते. त्याने—त्याने ते नेहमीच तशा प्रकारे केले आहे. होय, महाशय, आता, आपल्याला कळते की त्याने ह्या गोष्टींचे अभिवचन दिले आहे.

218 आज समस्या ही आहे, की आमच्यातील कित्येक लोक, आम्ही तसे होऊ इच्छितो, तुम्हाला ठाऊक आहे, सेमिनरी, आणि संप्रदायी, शैक्षणिक बुध्दीचे, की देव आमचा उपयोग करु शकत नाही. देव एका मनुष्याला काही करण्यासाठी चालना देऊ शकतो, आणि ज्याला सेवकाई देऊ शकतो. पहिली गोष्टी तुम्हाला माहीत आहे, तो जाऊन चौकशी करील की इतर काय सांगतात, आणि, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे काय, तो मोठ्या भरलेल्या समुहात त्याला झाकून घेतो. आणि मग देव त्याचे हात त्याच्यापासून काढून घेतो, आणि त्याला एकटे सोडतो. पाहिले पाहिले?

219 नंतर तो दुसरा मनुष्य शोधण्याचा प्रयत्न करीतो, समजले? कोणीतरी जो ते करील. पाहिले? त्याला कोणीतरी शोधावेच लागते जो त्याचा शब्द घेईल. दैवी प्रकटीकरण घेईल आणि त्यापासून दूर जाणार नाही, तेथे त्या शब्दावर राहील. अशाच प्रकारे तो ते करतो. त्याने सदैव अशाच प्रकारे केले आहे त्याने सदैव अशाच प्रकारे केले आहे.

220 म्हणून जेव्हा मनुष्य इतका शिक्षित आणि हुशार होतो, की, तो त्याचे स्वतःचे प्रकटीकरण घालण्याचा प्रयत्न करतो. जसे ते सांगतात, ठिक आहे "पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा," ते म्हणतील, "ओह, तो दुसऱ्या दिवसासाठी होता." परंतु, ते करणार नाहीत, तर, "तो दुसऱ्या दिवसासाठी नव्हे, परंतु, मी तुम्हाला सांगतो, तो तशा प्रकारे येत नाही जशा प्रकारे त्याने पेंटेकॉस्टच्या दिवशी केले. आपल्याला पवित्र आत्मा प्राप्त होतो जेव्हा आम्ही विश्वास ठेवतो." आणि—आणि सर्व प्रकारचे तसे समुह; तुम्हाला समजले. आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा विषयी बोलतात, ते...पवित्र शास्त्र त्याप्रकारे कोठे शिकवते; ठीक आहे, तुम्ही म्हणता, "परंतु, सेमिनरी म्हणते! आणि*असे*–*आणि*–*असे* सांगते!" ते तडजोड करतात. पाहीले? देव तशा मनुष्याचा उपयोग करु शकत नाही. कळले?

221 तो त्या मनुष्याला संपूर्ण देशभर तशा प्रकारे मारु देतो, आणि मनुष्याला बाहेर काढले जाते आणि त्याच्यावर हसले जाते, आणि मजा केली जाते, आणि इतर प्रत्येक गोष्ट अशा प्रकारे. परंतु जेव्हा खरी दृश्याची वेळ येते, देव उभा राहतो आणि त्याला त्याच साधेपणात प्रगट करतो.

222 लगेच, फुलासारखे उभे राहा. ते बीज, असे दिसते की तेथे संपले, ते मरते आणि जमिनीत पडते. त्या लहान बीजाला खणून वर बघितले; आणि ते कुजते, आणि संपले असे दिसते. परंतु वसंत ऋतुत त्यांतून जीवन वर येते दुसरे फूल पुन्हा निर्माण करण्यासाठी.

223 देव साधेपणात. तो नेहमीच तीच गोष्ट करीतो. जो मार्ग वर जातो तोच नेहमी खाली येतो. तुम्ही स्वतःला नम्र करा. असे कधीच म्हणू नका, "माझ्याकडे *हे* आहे आणि *ते* आहे." तुमच्याकडे काहीच नाही. एवढे—एवढे लक्षात ठेवा, जर तुमच्याकडे देवाची कृपा आहे, त्यासाठी आभार माना, आणि त्यासाठी नम्र व्हा. पाहा, तुम्ही स्वतःला नम्र ठेवा.

224 आता, मला घाई करावी लागणार आहे, कारण घड्याळ...मी तुम्हाला खूप वेळासाठी थांबवू इच्छित नाही, कारण मी तुम्हाला कंटाळू इच्छित नाही, पाहा. आपल्याकडे अजूनही आठवडाभर खूप वेळ आहे.

225 आता, आणि आता आपण पाहतो की लोक इतके हुशार आणि सुशिक्षित होत जात आहेत.

226 आता मी तुम्हाला दुसरे दाखवू इच्छितो. ते दुसरे दूसऱ्या बाजूला इतके दूर जातात की, ते धर्मांध बनतात, धार्मिक बनण्याचा प्रयत्न करतात. आता, आपल्याला माहीत आहे आपल्याकडे तो समुह आहे. पाहा? ते दुसऱ्या बाजूस जातात.

227 येथेच मी भावांच्या समुहाबरोबर सहमत नाही. जे प्रकाशाच्या मार्गांतून खेचले गेले काही काळा अगोदर. ते ती घटना घडत असता पाहू शकले नाही जो पर्यंत ते त्यांना त्यांचा समुह बनला नाही. म्हणून ते कॅनडा येथे एकत्र आले. आणि—आणि त्यांनी लोकांचा एक समुह तयार केला ज्यांतून ते प्रेषित आणि संदेष्टे बनविणार होते आणि ह्यासारख्या गोष्टी ते त्यांत अयशस्वी ठरले, पाहा? ते सदैव असेच होईल....त्यांना असे वाटले...कारण त्यांनी त्या गोष्टींना इतका दोष दिला, आणि—आणि जोपर्यंत ते दुसऱ्या बाजूला त्यांना सच्चे म्हणून साबीत करीत नाहीत. पाहा?

228 तेथे एक बाजू आहे जी अत्यंत बौध्दीक, भावना शून्य आणि तटस्थ आहे, ते तेथे सर्व काही नाकारतात. आणि ते इतर दुसऱ्या बाजूला जातात दुसऱ्या बाजूला भावनांच्या संपूर्ण घडासह, आणि वचनाला नाकारतात.

229 परंतु वास्तविक खरी मंडळी रस्त्याच्या बरोबर मधोमध राहते. आता, जर तुम्ही लक्ष दिले, ते—ते—ते त्यांच्याकडे पवित्रशास्त्राचे ज्ञान आहे की देवाने काय सांगितले आहे. आणि ते—ते पुरेसे आत्मिक आहे की त्यांच्या हृदयात उबदार करील, आणि तो फक्त रस्ता आहे. यशयाने म्हटले ते तशाप्रकारे होईल. तो म्हणाला, "तेथे राजमार्ग होईल..."

230 आणि आशिर्वादीत, पवित्र, नॅझरिन चर्चचे मौल्यवान मित्र, देवाने चालू कलेले कार्य. परंतु त्यांना काय मिळाले? जेव्हा देव अन्य भाषेत बोलण्यास सुरुवात करतो, ते ऐवढे धार्मिक व हट्टवादी होते त्यामुळे त्यांनी त्याला "सैतानी" नाव दिले. आणि तुम्ही पाहता त्यांचे काय झाले. पाहा? पाहा? ते, "तुझ्यापेक्षा पवित्र" आणि—आणि म्हणून आम्हाला दिसते त्या सर्व गोष्टी बीजामध्ये गेल्या आणि मरण पावल्या. पाहा? आणि ती—ती दूसरी बाजू.

231 आता, एक बाजू धर्मवेडी बनते. दुसरी बाजू थंड व ताठर बनली.

आता, यशया म्हणतो, "तेथे महामार्ग होईल..."

232 आणि नाजरिन, आणि कित्येक जुने पवित्रपणावर विश्वास करणारे लोक, म्हणत असत, "तो पवित्र पुरातन राजमार्ग! गौरव देवाला!, आपण त्या पुरातन राजमार्गाकडे चालत आहोत!" परंतु, तुम्हाला लक्षात आहे, तो जे म्हणाला ते हे नाही आहे.

233 तो म्हणाला, "तेथे राजमार्ग होईल, आणि," *आणि* हे दोन भागांना एक करणारा आहे, "आणि एक मार्ग" आणि त्यास पवित्रांचा राजमार्ग म्हणून संबोधले जाणार नाही, परंतु, "पवित्रांचा मार्ग."

234 आता, पवित्रांचा राजमार्ग, लोकं त्यांना पवित्र बनविण्याचा प्रयत्न करतात. आणि जेव्हा तुम्ही करता, ते तसेच आहे जसे मी अगोदर सांगितले ते असे आहे...ते जसे काही घार कबुतराचे पंख स्वतःला लावण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यांतून कबुतर बनविण्यासाठी, जेव्हा त्याचा स्वभाव अजुनही घारी सारखाच. पाहा? ते...ते तशा प्रकारे आहे जसे एक—एक कावळा कबूतराचे पंख, किंवा मोराचे लावण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि म्हणतो, "तुम्ही पाहा, मी एक सुंदर पक्षी आहे." पाहा, ते काही तरी बनवित आहेत.

235 परंतु मोराला काळजी करण्याची आवश्यकता नाही की त्याला मोराचे पंख असतील किंवा नाही. कबुतरालाही काळजी करण्याची आवश्यकता नाही की त्याला कबुतराचे पंख असतील किंवा नाही. जोपर्यंत त्याचा स्वभाव कबुतराचा आहे, त्याला कबुतराचे पंख असतील

236 आणि, पाहा, पवित्रपणावर विश्वास करणारे लोक म्हणण्यास सुरुवात करतील, "स्त्रीयांनी लांब केस ठेवले पाहिजे आणि पोशाखात लांब बाह्या ठेवल्या पाहिजे, आणि अशा गोष्टी आणि लांब स्कर्टस, आणि विवाहाची अंगठी किंवा कुठल्या प्रकारचे दागिने घालू नये." पाहा, हे स्वत:च्या नीतिमत्वाद्वारे मिळविलेले पवित्रता बनते. परंतु जीवंत देवाची खरी मंडळी...पाहा संप्रदायांना काय झाले आहे. आता ते सर्व केस कापतात, पेंटेकॉस्टल प्रमाणे, आणि—आणि तशाच प्रकारे. आणि—आणि ते सर्वच, जवळ—जवळ, अंगठी घालतात आणि अशा प्रकारे. काही वर्षां अगोदर पेंटेकॉस्टलांकडे पाहा, ते कशा प्रकारे वारंवार तेच रडगाणे गात होते, पाहा, आणि, "आम्ही, देवाची मंडळी! आम्ही, देवाची मंडळी!"

237 मंडळी ही ख्रिस्ताचे शरीर आहे. ती एक व्यक्ती आहे, इतर व्यक्तीमध्ये, जिचा जन्म देवाच्या मंडळीत झाला आहे. ते आतून येते. ते जीवन आपोआपच येते.

238 तुम्ही मेंढ्यांना लोकर घेऊन...या किंवा लोकर बनवा असे सांगत नाही. मेंढ्यांना लोकर बनविण्याची गरज नाही. तो म्हणतो, "आता, माझ्या मालकाची इच्छा आहे की माझ्याकडे ह्या वर्षी काही लोकर असावी. मला व्यस्त राहीले पाहीजे." नाही एक गोष्ट फक्त त्याला करावी लागेल ती म्हणजे मेंढी राहावे लागेल. ते बरोबर आहे. लोकर आपोआप बनणार...ती—ती बनेल...तो ती देणार कारण...

239 आणि आपल्याला फळे बनविण्यास सांगितले नाही. आपल्याला फळे निर्माण करावी लागतील. पाहा, फळे द्या. पाहा? आपल्याकडे फळे असली पाहीजे. आणि जोपर्यंत तुम्ही देवाचे फळ देणारे झाड आहात, देवाच्या वचनासह, देवाचे वचन स्वतःहून प्रगट होईल. जोपर्यंत तेथे वचन आहे तोपर्यंत ते फळ देईल. येशूने म्हटले, "जर तुम्ही मजमध्ये राहिला आणि माझी वचने तुम्हामध्ये राहिली, तर जे काही तुम्हाला पाहीजे असेल, ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल." पाहा? तुम्ही ते बनवित नाही. तुम्ही ते स्वतःच काम करीत नाही. ते अगदी प्रत्यक्षात तेथे असते. आणि वाढत जाते.

240 आता आपण जाऊ या, आता घाई करु या, अगदी काही मिनीटे उरलीत, आणि नंतर आपण बंद करु.

241 आता, इतर धर्मांध होईपर्यंत पुढे जातात. आता, ते दुसऱ्या बाजूला जातात. आणि ते विचार करतात, कारण ते वर आणि खाली उड्या मारतात, किंवा काही प्रकारच्या संवेदना किंवा भावना त्यांच्यात असतात, अन्यभाषा बोलतात, किंवा—किंवा—किंवा भविष्यवाणी करतात जी खरी ठरते, किंवा तसेच काही तरी त्यांना वाटते तेच ते आहे, त्यांच्याकडे ते—ते आहे. परंतु, ते ते नाही.

242 येशूने म्हटले, "त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, 'प्रभो आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला? तुझ्या नावाने भूते घालविली व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?'" तो म्हणेल, "मला तुमची कधीच ओळख नव्हती. अहो, अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा." पाहा? ते हे नाही, ते हे नाही, मित्रा.

243 तेच कारण आहे...आणि अन्य भाषा, हा पुरावा? मी अन्य भाषा बोलण्या मध्ये विश्वास ठेवतो, परंतु मी असे मानत नाही की पवित्र आत्मा असण्याचा तो एकच पुरावा आहे. नाही, महाशय. आत्म्याची फळे हाच पुरावा आहे. पाहा? होय, आता तुम्हाला माहीत आहे, तेच कारण आहे मी पेंटेकॉस्टल भावांच्या कार्याबरोबर सहमत नाही, ज्या तहेने, ते म्हणतात, "जर एखादा मनुष्य अन्य भाषा बोलतो, त्याच्यावर पवित्र आत्मा आहे." मी सहमत नाही. ते त्याच्यात पवित्र आत्मा असण्याचे चिन्ह नाही. पाहा?

244 मी ऐकले आहे सैतानही निरनिराळ्या भाषा शक्य होईल तितक्या वेगाने बोलतात, मनुष्याच्या कवटींतून रक्त पितात, आणि सैतानाला बोलावितात.

245 मी पाहिले आहे की इंडियन साप घेतात आणि त्यांच्या सभोवती गुंडाळून पाऊसात नाचतात. तेथे ॲरिझोनामध्ये ते हात *अशा* प्रकारे फडकतात आणि सभोवती चेटकीण वैद्यीण बाहेर येतो, स्वतःला स्पर्धेत उतरतो आणि पेन्सिल खाली ठेवतो, आणि ते अज्ञात भाषेत लिहीतो; आणि त्याचे भाषांतर देतो. पाहा?

म्हणून, ते मला सांगू नका. मी त्यासाठी जूना आहे. पाहिले?

246 म्हणून आत्म्याची फळे हाच...येशूने, म्हटले "त्यांच्या फळांवरून," निरनिराळ्या भाषा, किंवा नाही, परंतु त्यांच्या फळावरून तुम्ही त्यांना ओळखाल पाहा? तर तेच आत्म्याचे फळ आहे. ते देवाचे स्वतःला लीनतेत, मधुरतेत, प्रगट करणे आहे. आणि प्रत्येक तसेच ते काही त्याविषयी आहे, मनुष्य जो सत्याने वचनाबरोबर राहतो. प्रत्येक वेळी

जेव्हा तो वचन पाहतो, तो “आमेन” म्हणून त्यावर जोर देतो इतर लोक काय बोलतात ह्याचा विचार न करता. तो त्यावर विश्वास ठेवतो, तुम्ही पाहिले. ठीक आहे. पाहा?

247 परंतु आपण इतके दूर जातो, मग, धर्मांध गोष्टीवर विसंबण्यासाठी आणि सैतान लोकांमध्ये शिरतो, तोच सैतानाचा व्यापार आहे. आणि तो एक चांगला व्यापारी आहे. आणि तो लोकांमध्ये शिरतो, त्यांना विचार करण्यास लावतो की त्यांच्याकडे तो आहे कारण ते वर आणि खाली उड्या मारु शकतात. आणि मग तुझ्या शेजाऱ्याचा द्वेष कर? नाही. पाहा?...काही गोष्टी बोलणे, आणि विविध भाषा अद्भूतरितीने बोलणे, आणि अशाच काही गोष्टी.

248 आणि, लक्षात ठेवा, तुम्ही खऱ्यारितीने पवित्र आत्म्याच्या विविध भाषा बोलू शकता आणि तरीही तो पवित्र आत्मा नाही. पवित्र शास्त्र तसे सांगते. “जरी मी माणसांच्या व देवदूतांच्या भाषांमध्ये बोलत असलो, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी काहीच नाही, तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज असा आहे.” 1 करिंथ 13. पाहा? म्हणून तुम्ही ते करु नका, पाहा.

249 मेथडिस्ट म्हणतात, “जेव्हा आम्ही ओरडतो, आमच्याकडे तो आहे,” परंतु त्यांच्याकडे नाही. नाजरिन म्हणतात, “जेव्हा ते पवित्रतेने जगतात, तो त्यांच्याकडे आहे,” परंतु त्यांच्याकडे नाही. पेंटिकॉस्टल म्हणतात, “आम्ही विविध भाषांमध्ये बोलतो, आमच्याकडे तो आहे,” परंतु त्यांच्याकडे नाही. पाहिले? समजले?

250 देव, त्याला प्रगट करतो, संवेदना द्वारे नाही. नाही...संवेदना, अजूनही, त्याबरोबर आहे. तुम्ही ठिकाण पाहा? तो इतका नम्र होतो, जो पर्यंत त्याला कोणीही पाहू शकतो, जर तुम्ही—जर तुम्ही स्वतःचे विचार त्यात घालण्याचा, भरण्याचा प्रयत्न करणार नाही, पाहा, आणि तुमचे स्वतःचे विचार. तो देव आहे.

251 आता, पाहा मग ते धर्मांधाचा एक समुह बनतात. तर, *येथे* ह्या बाजूला भावनाशून्य, औपचारिक आहेत, *येथे* दुसऱ्या बाजूला धर्मांध आहेत; आणि *येथे* वधू ह्या सर्वांतून योग्य सरळ जात आहे, दोन्ही बाजूंमधून बोलवीत आहे. ते बरोबर आहे. देव ते प्रगट करीत आहे. जसे तो, आपल्या वचना बरोबर जात आहे.

252 आता, ओह, मला ह्यातील काही गाळावे लागेल, कारण येथे माझ्याकडे खूप आहे. आणि माझा—माझा...माझा वेळ धावत आहे. मी आता जितके होईल तितके घाई करीत आहे.

253 एदेन पासून, एदेन मधून ते आले आहे, भविष्यवाणी केली जात होती, की तेथे मसिहा येणार; व एदेने पासून सर्व मार्गात.

254 आता मी काही माझी वचने जी मी येथे खाली लिहीली आहेत, आणि टीपा. संदेश वेळेत संपविण्यासाठी जर होईल तर मी गाळणार आहे. देव लीनतेत लपलेला आहे. आता मी, लवकर बोलेन, परंतु, तरीही माझी—माझी इच्छा आहे की तुम्ही हे पकडावे. पाहा?

255 एदेन पासून, त्याची भविष्यवाणी केली होती की तेथे मसीहा मध्ये येणार आहे. हे अगोदरच सांगण्यात आले होते की तो कशाप्रकारचा व्यक्ती असेल. आपण खूप वेळ रेंगाळू शकतो. तुम्हाला पवित्र शास्त्र माहीत आहे, तो काय असेल, तो कशा प्रकारचा मनुष्य असेल. मोशे म्हणाला, “प्रभू परमेश्वर तुम्हासाठी माझ्या सारखा संदेष्टा तुमच्या बांधवांमधून उभा करील.” त्यांना माहीत होते, की तो मसिहा संदेष्टा असणार, ह्या प्रकारची सेवकाई त्याच्याबरोबर असेल. सर्व संदेष्टे तो जे करणार आहे त्याविषयी बोलले. ते त्याच्याविषयी चिन्हांतून बोलले. आणि ते सरळ त्यांच्या डोक्यावरुन गेले, आणि सरळ

करण्यासाठी त्यांच्या मधील उरलेल्यांच्या खाली गेले. पाहिले? एकाच्या खालून गेले, आणि दुसऱ्याच्या वरुन गेले. पाहा?

256 तो दृश्यात येई पर्यंत, ज्या लोकांकडे त्याला पाठविण्यात आले होते, त्यांनी स्वतःचा अर्थ लावला की तो कसा असणार आहे, त्यांच्या स्वतःच्या कल्पने प्रमाणे अर्थ लावला.

257 पवित्र शास्त्र कधीच बदलले नाही. पवित्र शास्त्र सदैव तेच आहे. म्हणूनच मी सांगतो, वचन म्हणते, आणि मी त्याबरोबर राहतो, पवित्रशास्त्राचे खासगी भाषांतर नाही.

258 म्हणून, मेथडिस्ट, बाप्टिस्ट, पेंटेकॉस्टल, तुमचे भाषांतर त्यात घालण्याचा प्रयत्न करु नका, म्हणा. "त्याचा तसा अर्थ नाही. त्याचा *असा* अर्थ आहे."

259 त्याचा अर्थ काय फक्त ते सांगेल, तोच आहे. कोणीतरी म्हणाले, "ते कसे होऊ शकेल?" मला कसे ते ठाऊक नाही. ते मी सांगत नाही. तो देव आहे जो त्याची काळजी घेतो. तोच हे बोलला आहे, मी नाही, पाहा, आणि तो त्याची स्वतःची काळजी घेईल.

260 परंतु आता, परंतु, ह्या मसीहाची भविष्यवाणी करण्यात आली होती. संदेष्ट्यांनी अगदी बरोबर सांगितले होते की तो कसा येईल, जेव्हा तो येईल, तो काय करील. परंतु, लोकांमध्ये, त्यांच्या स्वत:च्या त्यास खासगी अर्थ लावल्याने! आणि जेव्हा तो आला, तो इतक्या साधेपणाने आला, साधेपणात, की संपूर्ण मंडळीचा समुह त्यावर अडखळला. ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] तेथे, ती माणसे ज्यांना शिकविण्यात आले होते.

261 एक मनुष्य शिक्षक, याजक असू शकत नाही, जो पर्यंत त्याचा जन्म एका विशिष्ट वंशात होतो, लेविनंतर. आणि जरा विचार करा, त्याचे महान–महान–महान–महान–महान–महान आजोबा त्याचे मंदिरी याजक होते, त्याच्या वचनात दिवस व रात्र योग्य रितीने चालणारे होते.

262 ज्याप्रमाणे कॅथलिक धर्मगुरु किंवा सेवक ते नेमून दिलेले एक—एक सेवक आहेत, कित्येक पिढ्यांपासून, काही विशिष्ट प्रार्थना गृहांसाठी, आणि तसेच पुढे, "माझे महान पणजोबा एक मेथडिस्ट बिशप होते. माझे आजोबा एक बिशप होते. आणि असेच पुढे." पाहा?

263 ते सर्व, वचनात योग्य जगले, परंतु त्यांनी त्यांचे स्वतःचे मार्ग रचले. आणि त्यांच्या मुलांनी ते अशा प्रकारे स्विकारले, जसे त्यांच्या वडिलांनी ते शिकवले. वडिलांनी तो खरा मार्ग सोडून शिकविले, आणि त्यांनी त्यांतून असे संप्रदाय निर्माण केले, जेव्हा आत्मा त्यांच्यापुढे सत्य सादर करण्याचा प्रयत्न करीत होता, ते ते स्विकारु शकले नाही.

264 आणि तीच गोष्ट आजही आहे. मी उध्दट होऊ इच्छित नाही, परंतु ते खरे आहे. आजही तीच गोष्ट आहे. त्यांनी ते इतके—इतके गुंतागुंतीचे केले, आणि—आणि काही इतर मार्गाने गेले. ते...अशाप्रकारे ते सांगितले आहे, "देवाला कोणी नातवंडे नाहीत." तुम्हाला ते माहीत आहे न? देवाला पुत्र आहेत आणि त्याला कन्या आहेत, परंतु नातू आणि नाती नाहीत. प्रत्येक मनुष्याला तीच किंमत द्यावी लागेल आणि त्याच मार्गाने यावे लागेल, जसे तुमच्या वडिलांनी केले, तसेच तुम्हाला केले पाहिजे.

265 आता, त्यामुळे, तो इतका साधा होता, जेव्हा हा मसीहा...चार हजार वर्षांपासून, प्रत्येक संदेष्टा त्याच्या विषयी बोलला; दाविदाने त्याच्या विषयी गायले, आणि सर्वांनी खाली पुढे. आणि जेव्हा तो आला, लोकांनी त्याच्या स्वतःच्या कल्पना बनविल्या होत्या, त्याने काय केले पाहिजे, तो कसे करणार आहे. ते सर्व कसे स्पष्ट केले होते, आलेखावर

आखले होते आणि सर्व काही, जेव्हा तो प्रत्यक्षात साधेपणाने आला, त्याने—त्याने त्यांचे देवाविषयीचे ज्ञान नष्ट केले. पाहा, त्यांना ते कळू शकले नाही.

266 तो वचनानुसार आला. आता, तुम्ही विश्वास करता की देव संदेष्ट्यांद्वारे बोलला, की तो मसीहा अशा प्रकारे येईल? हे खूपच वाईट आहे की आपल्याकडे दुसरा तास नाही की आपण त्यामध्ये जाऊ शकू आणि ते कसे होते हे स्पष्ट करण्यासाठी. पाहा? आपल्याला सर्वांना, ते कसे होते हे ठाऊक आहे तरी, आपल्यातील खूप जण, देव कसे बोलला तो येईल, आणि ते कसे, "हे बेथलेहेमा, तू यहूदाच्या सर्व सरदारांमध्ये कनिष्ठ आहेस असे मुळीच नाही..." आणि सर्व तेथे तो कालपर्यन्त कसे करील, आणि तो काय करील;

267 आणि, तरी, तो इतका साधा होता! त्या थोर विद्वानांनी ते इतकी मिश्रित करेपर्यंत, त्यांनी ते गमावले. परंतु, ते तुम्हाला माहीत आहे, येशू वचनाच्या विरुध्द आला नाही. तो वचनाप्रमाणे आला, परंतु त्यांनी लावलेल्या अर्थाविरुध्द. पाहीले? त्याने त्या गोष्टी शिकविल्या ज्या त्यांच्या त्याच्या विषयीच्या धर्मोपदेशाच्या प्रशिक्षणाच्या विरुध्द होत्या.

268 आता, ते म्हणाले, उदाहरणार्थ, "जेव्हा मसिहा येईल, निश्चितच, तो मंदिरात येईल आणि म्हणेल, 'कैफा,' किंवा जो कोणी मुख्य याजक असेल, 'मी आलो आहे.' तो दहा लक्ष देवदूतांच्या सलामी बरोबर येईल. देव म्हणेल, 'शिष्यांनो, ठीक आहे, तेथे खाली, तुम्ही खरोखरच एक—एक सामर्थ्यशाली मंडळी आहात. तुम्ही माझे लोक आहात. मी विक्षिप्त मनुष्यांनी येथे वळवणार आहे आणि आकाशाचा मार्ग खाली येऊ दे. मी मसीहाला, ह्या सकाळी तुमच्याकडे पाठवित आहे. मी त्याला थेट ह्या भूमीत त्या अंगणात उतरवीन, आणि सर्व लोक त्याभोवती जमतील.' म्हणतो, 'डॉक्टर *अमुक-आणि-अमुक*, तुम्ही आणि डॉक्टर *अमुक-आणि-अमुक*, तुम्ही सर्व मुख्य दरवाजाकडे त्याचे स्वागत करण्यासाठी, प्रथम उभे राहा, तुम्हाला समजले'"

269 आता ते कदाचित असे काही होते जसे आज ते विचार करीत आहे. आता, मला हे ठाऊक आहे ते जरासे...जरासे विश्वास करण्यास कठीण वाटते. परंतु...मी माझा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

270 "आणि—आणि, तेथे, त्याचप्रकारे ते होणार आहे. आणि जर ते त्या प्रकारे येत नाही, ते बरोबर नाही; ते ख्रिस्त विरोधक आहे. पाहा? जर ते त्या प्रकारे येत नाही, तर ते ख्रिस्त विरोधक आहे. तुम्ही पाहिले, म्हणून ते तसे नसणार आणि असे, नंतर...नंतर, पुढची गोष्ट खाली येते, दहा लाख देवदूतांची सलामी त्यांच्या वाद्यावृंदासहीत विषयी. आणि ते तेथे अंगणात उतरतील, जेथे शलमोनाने ते मंदिर बांधले आहे, आणि ओह, सर्व चढ आणि उतार येथपर्यंत, हे पवित्र ठिकाण जेथे संत आणि साधू मृत्यू पावले, आणि अशा प्रकारे!"

271 "होय," येशू म्हणाला, "तुम्ही ढोंग्यांनो! तुम्ही सैतानाच्या मुलांनो!" म्हणाला, "तुम्ही संदेष्ट्यांच्या कबरा बांधता व सजविता, आणि तुमच्या वडिलांनी त्यांना त्यात घातले." ते बरोबर आहे. ते बरोबर आहे. पाहिले? किती तरी नीतीमान मनुष्यांना आणि संदेष्ट्यांना तुमच्याकडे पाठविले, आणि तरी तुम्ही त्या प्रत्येकाला ठार मारले! पाहा? परंतु तो कोणाला "नीतीमान" म्हणेल? ते त्यांस काय म्हणतात, "धर्मन्ध आणि विक्षिप्त मनुष्य." होय.

तेथे, त्यांनी विचार केला ते त्याप्रकारे होईल.

272 परंतु, जेव्हा, तो गोठ्यात आला, कुमारीद्वारे जन्मला, एका साध्या सुताराकडे एक संगोपन करणारा पिता म्हणून आणि एक—एक लहान, अनोळखी मुलगी. पाहा,

मुख्य याजकाची मुलगी नाही, किंवा काय अधिक. तो—तो आला म्हणून...एका लहान स्त्रीपासून जी खाली, लहान नाजरेथ नावाच्या जुन्या देशात राहात होती आणि फक्त एक साधा विधुर, त्याची पत्नी मृत्यु पावली होती. त्याला काही मुले होती; योसेफ. आणि—आणि तिचे वाग्दान झाले होते. मग तो वाईट नावासह आला, सुरुवात करण्यासाठी. ते म्हणाले त्याचा जन्म बेकायदेशिररित्या झाला होता. बाप रे!

273 त्याने त्यांच्या सभ्यतेला फार मोठा आघात झाला. पाहा? त्यांची शैक्षणिक आचारसंहिता ते सहन करु शकत नाही. त्यांच्या पवित्रशास्त्राच्या अनुवादाला ह्या विषयी काहीच ठाऊक नव्हते, परंतु तरीही ते **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** होते. ओह, बापरे!

274 त्याचा विचार करुन मला कापरे भरते, आणि हे पाहून की तीच गोष्ट पुन्हा घडत आहे. देव बदलू शकत नाही.

275 बारा वाजून गेले आहेत. तुम्ही थोडा वेळ...मी बंद करु का, किंवा थोडा...[मंडळी म्हणते, "नाही. चालू ठेवा."—सम्पा.] धन्यवाद. जरा शांत बसा, थोड्या वेळासाठी, पाहा. ["उजवीकडे जात राहा."] आता, मी येणाऱ्या संदेशासाठी येथे थोडा पाया करीत आहेत, पाहा. आणि मी तुम्हाला लवकरच जाऊ देण्याचा प्रयत्न करीन, नंतरचे दहा किंवा पंधरा मिनीटे, जर आपण करु शकतो. देव तुम्हास आशीर्वाद देवो.

276 आता, लक्ष द्या, ते इतके साधे होते, की ते—ते—ते त्यांना, जरा साठी चिन्ह कळले नाही. परंतु त्याने देवाच्या चिन्हावर आघात केला. पाहा, त्याने वचनाला तडाखा दिला. तो अगदी तसाच आला जसे त्याने सांगितले. परंतु, ते, त्यांचा त्याविषयीचा अनुवाद चुकीचा होता. मोशेच्या वेळेतील सोडवणूक करणाऱ्याचा अनुवाद चुकीचा होता. नोहाच्या वेळचा अनुवाद चुकीचा होता, पाहा, परंतु देव त्याच्या वचनाप्रमाणे आला.

277 आणि मग येशू आला, आणि त्याने—आणि त्याने ज्या गोष्टी शिकविल्या त्या विरुध्द होत्या. "जर तू मसीहा असशील, तर! *हे आणि ते* कर," तुम्ही पाहीले. "जर तू असशील, वधस्तंभावरुन खाली उतर आणि ते आता आम्हाला दाखव." पाहीले? परंतु देव त्याच्या लोकांसाठी अडाणी नाही. देवाने फक्त त्याच गोष्टी केल्या ज्या सुखकारक आणि योग्य होत्या.

278 त्यांना वाटले होते की अशा व्यक्तीला निश्चितच देवदूतांच्या महान सलामी सह यावे लागेल. परंतु तो गोठ्यात आला. आणि त्यांच्या स्वतःच्या निर्दोष आचरसंहितेस, एका सामान्य मनुष्यासाठी की तो सर्व सामर्थी परमेश्वर आहे असा विचार करणे हास्यास्पद होते, महान सामर्थ्यशाली यहोवा, पृथ्वी ज्याच्या मालकीची आहे आणि त्याने सर्व गोष्टी निर्माण केल्या, त्याच्या स्वतःच्या पुत्राच्या जन्मासाठी गायीच्या धान्याच्या कोठारा पेक्षा चांगली एक जागा ठरवू शकला नाही. तेथे कसे असू शकेल...पाहा?

279 ते काय होते? देव साधेपणात. तेच काय जे त्याला इतके महान बनविते. पाहा, शैक्षणिक आचार संहिता स्वतःचे महत्व अशा प्रकारे कमी करु शकत नाही; पाहा, ते उभे राहू शकत नाही. परंतु देव इतका महान आहे की त्याने स्वत:ला इतके लीन केले की, त्याच्या स्वतःच्या पुत्राला घालण्यास कपडे ही नव्हते. त्याचा विचार करा! आणि हे जग...तेथे पथिका श्रमात खोली नव्हती. आणि तो गायीच्या गोठ्यात गेला, एक लहानसा खडकाचा कंगोरा, एक लहानशी गुफा त्यासारखे, टेकडीच्या मागच्या बाजूला. आणि ते एका पेंढ्याच्या बिछान्यावर देवाचा पूत्र आला. ओह, ते त्या सभेपासून खूप वेगळे होते...

280 आणि त्याची आई आई होणार होती. ती आई होणार हे कळले होते. आहे. त्यांच्या वाग्दान होण्याच्या अगोदर...विवाह होण्याच्या महिन्यां अगोदर पाहिले? ती आई होणार

होती. आणि लोकांनी ते पाहिले, त्यांना कळले की ते अशा प्रकारे होते. आणि, मरीया, तिच्या अंतःकरणात, तिला ठाऊक होते की काय घडत होते.

281 आणि योसेफाला समजले नाही. परंतु प्रभूचा दूत त्या रात्री त्याच्याकडे आला, म्हटले, “योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तू मरियेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करु नकोस, कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे.” ते व्यवस्थित झाले. तो मनुष्य, योसेफ, देवाबरोबर असे नाते जडले होते, की देव त्याच्याशी बोलू शकला.

282 परंतु आज आपण आपल्या भोवती धर्मोपदेशकाचे आच्छादन अशा प्रकारे आखतो की आपल्या धर्मोपदेशकात समुहाच्या बाहेर ज्यात आपण सदस्य आहोत, तो पर्यंत आपल्याशी कोणीही बोलू शकत नाही. मी खूप कठोर किंवा अत्यंत पुरोगामी होऊ इच्छित नाही, म्हणून मी ते तेथेच सोडून देतो. लक्ष द्या, परंतु तुम्ही समजता मला काय म्हणायचे आहे. लक्ष द्या.

283 एक गोठा, त्यांच्यासाठी हास्यास्पद होता, सभ्य लोकांमध्ये. आपल्याकडे बिलकुल नोंद नाही की तो एक दिवस तरी शाळेत गेला, आणि तरीही, वयाच्या बाराव्या वर्षी, एक साध्या मुलाने, मंदिरातील याजकांना त्याच्या शिकवणीद्वारे दु:खी केले. अरे बापरे! ते काय होते? देव स्वतःला लपवित होता...?...आता मला खूप धार्मिक असल्यासारखे वाटते देव त्याला स्वतःला धान्याच्या कोठारात लपवित होता. देव त्याला स्वतःला एका लहान मूलात लपवित होता. पाहा? निरिक्षण करा, थोड्या वेळानंतर ते दाखविण्यास जाणार आहे, जरी, पाहा. त्याला करावे लागेल.

284 जेव्हा तो रस्त्यांवर गेला, आई–वडिलांनी, संशय नाही, असे म्हटले असेल, “त्या मुलाबरोबर खेळू नको. त्याच्याबरोबर काहीच करायचे नाही. त्याची आई कोणीही नव्हती परंतु एक साधी वेश्या आहे, पाहा. आणि वडिल आणि आई, मुलगा जन्मला होता...त्यांचे प्रत्यक्षात लग्न होण्या अगोदर, ती आई होणार होती. त्याच्याशी काहीच कर्तव्य नाही.”

285 मरीयेने काय विचार केला! परंतु, एकंदरित बाहेरचे काय विचार करतात ह्याची पर्वा केली नाही, तीने ह्या सर्व गोष्टींचा विचार केला. त्यांनी ते त्यांच्या हृदयात ठेवले. त्यांना माहीत होते. ते त्याच्या विरुध्द काही वाईट बोलू शकले नाही.

286 देव त्याच्या माणसाशी बोलला, काधीतरी, बोलला “शांत राहा. त्या विषयी काहीच बोलू नको.”

287 माझ्या सभेत माझ्याकडे लोक आहेत जे म्हणतात, “तसेच, जर तू ख्रिस्ताचा सेवक असशील, तुला ठाऊक असेल *तेथे* हे चालले आहे.”

288 निश्चितच, मला ठाऊक आहे ते चालले होते, परंतु मग तुम्ही काय करणार आहात जेव्हा तो म्हणेल, “तुम्ही शांत बसा. त्या विषयी काही बोलू नका?”

289 काही मनुष्यांना दुसऱ्या दिवशी घेतले, आणि त्यांना, एका पुस्तकावर दाखवले. “काही वर्षांअगोदर, काही तरी बोललो” मी म्हणालो,

म्हणाला, “ठीक आहे, मला ते समजू शकत नाही.”

290 मी म्हणालो, “तुम्ही तेथे पाहिले?” येथे ते होते. मागे येथे. कित्येक लोकांनी ते त्या पुस्तकावर तेथे पाहिले होते. मी म्हणालो, “ते घडेल की हे *ह्या* प्रकारे होईल आणि *त्या* प्रकारे.”

291 म्हणाला, “ठीक आहे, तू त्याविषयी काही बोलला का नाहीस?”...ते तसेच व्हावयास हवे होते. पाहा?

292 आणि योसेफाला वेगळे माहीत होते. त्याला ठाऊक होते की ते बाळ कोणाचे आहे. मरीयेला ठाऊक होते की ते कोणाचे आहे. येशूला माहीत होते त्याचा पिता कोण आहे. तो काय बोलला? “मी माझ्या पित्याच्या कामात असावे.” लाकडे कापणे नव्हे आणि—आणि दरवाजा बनवणे ह्यात नव्हे, परंतु त्याच्या पित्याच्या कामात असावे. आमेन. त्याच्या आईला ते सांगितले, “हे तुझ्या ध्यानात आले नाही काय, की, मी, ही अशी वेळ आहे की मी माझ्या पित्याच्या कामात असावे?”

293 आता, त्यांना वाटले, “हा लहान वेडा मुलगा...” कुठले ही अनौरस मुल हे कसेही करुन विचित्र, जिज्ञासेची गोष्ट असते. आणि तेथे तुम्ही आहात, परंतु, देव त्याला स्वतःला लपवित आहे. लक्षपूर्वक ऐका. देव त्याला लपवित आहे. जे जगाच्या विचारात, “अश्लील, नीतीभ्रष्टता, अनौरस संतती आहे.”

294 पाहा, देव त्याला स्वतःला मृत बीजाच्या कुजण्यामध्ये लपवितो, ह्यासाठी की जीवन पुढे आणावे. पाहा? तुम्हाला ते समजते काय? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

295 देव त्याला स्वत:ला एका साध्या, लहान कपडे धुणाऱ्या स्त्रीमध्ये लपवितो, एक सामान्य मनुष्य डबा त्याच्या खाकेत, त्याच्या पत्नीचे चुंबन घेतो आणि लेकरांना गुडबाय करतो आणि तेथे बाहेर जातो, आणि स्वतःला कदाचित त्या मनुष्यामध्ये लपवितो काहीतरी करण्यासाठी ज्या विषयी आर्च बिशपलाही माहीत नाही. पाहीले? तुम्ही त्याचे ऐकत नाही, त्याच्यापुढे पावा वाजवित नाही आणि ते बाहेर पाठविता. देवाला फक्त गौरव मिळतो, तेच सर्व आहे. साधे ते ऐकतात आणि आनंदीत होतात. पाहिले.

296 आता, देव त्याला त्या बाळाच्या साधेपणात लपवित होता, एका—एका सामान्य कुटूंबाच्या साधेपणात स्वत:ला लपवित होता. देवा! आणि धर्मोपदेशक आणि थोर मनुष्य, थोर विचारवंत अलौकीक बुध्दीमत्ता असणारे, आणि—आणि त्यांच्यातील सर्वजण, आणि हेरोदी, आणि तसेच अधिक त्या दिवसातील, आणि नीरो, आणि त्या सर्वांनी त्याकडे दुर्लक्ष केले. देव साधेपणात लपला आहे.

297 आता, वेगाने, बाप्तिस्मा करणारा योहान, यशया 40 मध्ये. आपल्याला मिळू शकते जर तुम्हाला पाहिजे असेल. मलाखी 3. सर्वांनी, तेथे खाली खूण करा जर तुम्हाला पाहीजे असेल. यशया 40, तुम्हा सर्वांना माहीत आहे, शांतीबद्दल बोलते...हे चांगले होईल की मी—मी—मी येथे ते वाचीन, जर तुमच्याकडे एवढा वेळ असेल [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] आपण ते करुया, फक्त काही मिनीटासाठी. आपण येथे यशया पुस्तकाच्या 40 व्या अध्यायाकडे वळू या, आणि येथे वाचू या आणि जरा बघू या की तो ह्या विषयी आता काय सांगत आहे. येथे पाहा, “सांत्वन करा, माझ्या लोकांचे सांत्वन करा.” आता, लक्षात ठेवा, हे सातशे बारा वर्षे होते. तेथे शिर्षका वर लक्ष द्या, पाहा. तो जन्मला होता, त्याच्या सातशे बारा वर्षां अगोदर येथे संदेष्टा त्याच्या विषयी बोलत आहे.

*सांत्वन करा, माझ्या लोकांचे सांत्वन करा, असे तुमचा देव म्हणतो.*

*यरुशलेमेच्या मनाला धीर येईल असे बोला, तिला पुकारुन सांगा, तुझे युध्द संपले आहे, तुझ्या पापाबद्दलचा दंड मिळाला आहे...परमेश्वराच्या हातून तुझ्या सर्व पापांचा तुला दुप्पट बदला मिळाला आहे.*

*घोषणा करणाऱ्याची...वाणी ऐकू येते की, अरण्यात परमेश्वराचा मार्ग सिध्द करा, आमच्या देवासाठी रानात सरळ राजमार्ग करा.*

*प्रत्येक खोरे उंच होवो, प्रत्येक डोंगर व टेकडी सखल होवो, उंचसखल असेल ते सपाट होवो व...खडकाळीचे मैदान होवो.*

298 ओह, माझ्या देवा! तो काय मनुष्य असणार होता! पाहा? आता मलाखीकडे वळूया, माझ्या बरोबर शेवटचे पुस्तक...जुन्या करारातील शेवटचा संदेष्टा. आता, मलाखी मध्ये, येथे लक्षपूर्वक ऐका. मलाखी ते वर उचलत आहे, अगदी अंतिम समयात, म्हणून तुम्ही खात्री करा की ते विसरणार नाही. मलाखी 3रा अध्याय.

*पाहा, मजपुढे मार्ग तयार करण्यासाठी मी आपणास निरोप्या पाठवितो, ज्या प्रभूला तुम्ही शोधिता तो एकाएकी आपल्या मंदिरात येईल. पाहा, करार घेऊन येणाऱ्या निरोप्याची तुम्ही अपेक्षा करीत आहा तो येत आहे, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो.*

299 अजूनही योहाना विषयी बोलत आहे, "पाहा, मी आपल्या दूताला तुझ्या पुढे पाठवितो, तो तुझ्या पुढे तुझा मार्ग सिध्द करील." येशू त्या विषयी मत्तय 11:10 मध्ये बोलला, म्हणाला:

जर हे पत्करण्याची तुमची इच्छा असेल, तर ज्याविषयी बोलले *आहे, पाहा, माझ्या दूताला तुझ्यासमोर पाठवितो...*

300 पाहिले? ते बरोबर आहे. आता, हे सर्व कसे बोलले! जेव्हा सातशे वर्षानंतर, तेथे मार्ग सिध्द करण्यास मसिहाच्या अगोदर येणार होता. परंतु जेव्हा तो आला, इतक्या साधेपणात, ते त्याला ओळखू शकले नाही. ते त्याला ओळखू शकले नाही.

301 आता, लक्ष द्या, तो याजकाचा पुत्र होता. आता बघा, त्याच्या साठी हे किती हास्यास्पद होते की त्याच्या वडिलांचे याजकपद पुढे न चालविणे, सेमिनरीत जाणे. परंतु त्याचे काम फार महत्त्वाचे होते. वयाच्या नवव्या वर्षी, तो रानात गेला. आणि तो बाहेर प्रचार करीत आला. त्यांनी त्याला ओळखले नाही. तो इतका साधा होता, खूप साधा, त्यांच्या उच्च–उत्कृष्ट शिक्षणामुळे की अशा एकावर त्यांनी विश्वास ठेवावा. त्यांना वाटले, जेव्हा हा मनुष्य येईल...

302 कशा विषयी, "सर्व उंच जागा सखल केल्या जातील, सर्व सखल जागा उंच केल्या जातील, सर्व खडकाच्या जागा सपाट होतील?" दाविदाने ते पाहिले, आणि म्हणाला, "पर्वतांनी मेंढ्या सारख्या उड्या मारल्या आणि पानांनी हातांनी टाळ्या वाजविल्या!" [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी टाळ्या कित्येक वेळा वाजवितात—सम्पा.]

303 काय? ते घडले काय? एक मिशी असलेला मुलगा काहीही शिक्षण नसलेला, मेंढ्याची कातडी त्याच्या भोवती लपटलेला, यहूदाच्या रानाच्या मार्गाने आला, सांगू लागला, "पश्चाताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आहे. आणि तुम्ही सापांच्या पिल्लांनो, तुम्ही असे म्हणण्याचा विचार करु नका, 'मी अमुक संघटनेचा आहे.' ह्या दगडांपासून अब्राहामासाठी मुले निर्माण करण्यास देव समर्थ आहे." माझ्या देवा!

"तेथे त्याच्यात तो नव्हता. आपल्याला माहीत आहे की तो तो नव्हता."

304 परंतु तो तोच होता! पाहा, तो मार्ग नीट करीत होता. पाहीले? तेथे जेव्हा खडकाळी जागा सपाट केल्या गेल्या. तेथे जेथे उंच जागा सखल केल्या गेल्या. अब्राहाम, आमचा बाप आहे, असे म्हणण्याची कल्पना आपल्या मनात आणू नका; कारण मी तुम्हाला सांगतो, ह्या दगडा पासून अब्राहामासाठी मुले निर्माण करण्यास देव समर्थ आहे. उंच ठिकाण सखल केले गेले. ओह, माझ्या देवा! ते हेच आहे. होय, फरक पाहा? तो म्हणाला, त्याच प्रकारे होईल.

305 आणि जेव्हा ते आले, त्यांना वाटले, ओह, ते त्याला स्विकारायला तयार असते, जर तो त्यांच्या स्वतःच्या संघटनेत आला असता. परंतु कारण...तो तशा प्रकारे आला, इतक्या साधेपणाने. तरी वचनांचा अनुवाद करताना, उंच जागा सखल केल्या गेल्या. ते हे स्विकारु इच्छित नव्हते, परंतु ते होते.

306 तो मुलगा, त्याने त्याला तासले. त्याने त्यांच्यातील लपलेल्यांना बरोबर हादरविले. म्हणाला "तुम्ही सापाच्या टोळीनो! तुम्ही गवतातील सापांनो! मी तुम्हास सांगतो, आताच तर झाडाच्या मुळाशी कुऱ्हाड ठेवलेली आहे; जे जे झाड चांगले फळ देत नाही ते, ते तोडून अग्नीत टाकले जाते. मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चातापासाठी करतो खरा; परंतु माझ्यामागून जो येत आहे, तो माझ्यापेक्षा समर्थ आहे. त्याच्या वाहणा उचलून चालण्याची देखिल माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे. आणि त्याच्या हातात त्याचे सूप आहे तो आपले खळे अगदी स्वच्छ करील व...आपले गहू कोठारात साठवील; पण भूस न विझत्या अग्नीने जाळून टाकील." आमेन.

307 त्याच वेळेस जेव्हा खडकाळ जागा सपाट केल्या गेल्या, पाहा, परंतु लोक हे समजत नाही. परंतु ते अगदी वचना बरोबर आहे, अगदी त्याप्रमाणेच जसे वचनाने सांगितले. इतके साधे, की ते त्याना कळू शकले नाही. ते बघून त्यांनी ओळखले नाही.

308 तुम्ही आंधळे होऊ नका. पाहा? तुम्ही तसे आंधळे होऊ नका. म्हणून आता लक्षपूर्वक ऐका.

309 त्यांनी ओळखले नाही. तो इतका साधा होता, त्यांच्या त्या मनुष्यावरील साध्या विश्वासामुळे, की त्यांना ते कळले नाही. पुन्हा, ते काय होते? देव, जो वचन आहे, साधेपणात लपलेला आहे; याजक नाही ज्याच्या सभोवती त्याची कॉलर आहे, हुशार, शिकलेला.

310 येशूने त्यांना तीच गोष्ट विचारली. तो म्हणाला, "तुम्ही तेथे काय पाहावयास गेला होता?" जेव्हा योहानाचे शिष्य आले. म्हणाला, "तुम्ही काय पाहावयास गेला होता? तलम वस्त्रे धारण केलेल्या माणसाला काय, तुम्हाला माहीत आहे, आणि तलम वस्त्रे," तो म्हणाला, "त्या—त्या—त्या—त्या प्रकारचा प्रचारक?" तो म्हणाला, "तुम्ही ते पाहावयास गेला होता काय?"

311 म्हणाला, "नाही. त्या प्रकारचे लहान बालकांना चुंबन घेतात, आणि तुम्हाला माहीत आहे, आणि मेलेल्यांना गाडतात. ते त्यांना युध्द भूमीवरील तलवारीविषयी दोन्ही हातांनी पकडायची या बद्दल काहीच ठाऊक नाही. ते तेथे बाहेर काही बौध्दीक भाषणासह असतात. काही कीवानीस क्लबला किंवा असेच काही, तुम्हाला माहीत आहे ते तेथे ठीक असतात. परंतु जेव्हा तेथे युध्दाला तोंड देण्याची वेळ येते, त्यांना त्याविषयी काहीच ठाऊक नसते. ते—ते, ते राजाच्या राजवाड्यात असतात. ते तशा प्रकारच्या ख्यातनाम व्यक्तींच्यामागे वेडे असतात."

312 परंतु म्हणाला, "तर तुम्ही काय पहावयास गेला होता? वाऱ्याने हालविलेला बोरु काय? एक मनुष्य जो म्हणू शकतो...कोणी म्हणते, 'तुम्हाला माहीत आहे, तुम्ही वननेसशी संबंधीत आहा; परंतु जर तुम्ही येथे मंडळ्यात याल, मी तुम्हाला सांगतो मी काय करीन, आपण—आपण ते...' 'मी विश्वास करीतो, मी ते करीन.' हूं! हालविलेला बोरु? योहानाला नाही. नाही, नाही. नाही, नाही. 'जर तुम्ही याल तर सदुक्यांसारखे असा आणि परुशी किंवा अजून काही असू नका. तर? तुम्ही कोणालाही वाऱ्याने हालताना पाहीले नाही काय; योहानाला नाही. नाही, महाशय, भावा; त्याला नाही."

313 तो म्हणाला, “मग तुम्ही काय पाहावयास गेला होता? एका संदेष्ट्याला काय?” ते करण्यासाठी एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे, पाहा. तो म्हणाला आता, तोच एका संदेष्ट्याचा पुरावा आहे, पाहा देवाचे वचन त्याच्या बरोबर होते. पाहिले? म्हणाला, “तुम्ही काय पाहावयास गेला? संदेष्ट्याला पाहावयास काय?” म्हणाला, “होय, ते बरोबर आहे. परंतु, मी तुम्हाला सांगतो, हो, संदेष्ट्याहूनही जो श्रेष्ठ त्याला.”

314 तो संदेष्ट्याहूनही का श्रेष्ठ होता? तो कराराचा संदेशवाहक होता, खचितच तो होता, नियमशास्त्र आणि कृपा यांच्या मध्ये मार्ग तयार करणारा होता. तो मुख्य दगड होता, तेथे, ज्या विषयी बोलले गेले होते.

315 तो म्हणाला, “जर तुम्ही ते स्विकारु शकता, हाच तो आहे ज्याच्या विषयी संदेष्टा बोलला, ‘पाहा, मजपुढे मार्ग तयार करण्यासाठी मी आपला निरोप्या पाठवितो.’” पाहा? ओह, तो इतका साधा होता. देव पुन्हा एकदा साधेपणात लपवित आहे.

316 नंतर, लक्ष द्या त्याने काय केले. त्याने सामर्थ्यशाली ख्रिस्ताच्या आगमना विषयी असा प्रचार केला, “त्याच्या हातात त्याचे सूप आहे. तो करील...तो सूपाने त्याचा मार्ग करीत आहे. मुला, मला म्हणायचे आहे, तो आपले खळे अगदी स्वच्छ करील. तो आपले गहू कोठारात साठवील, आणि भूस न विझत्या अग्नीने जाळून टाकील, ते बरोबर आहे. तो गहू गोळा करील आणि कोठारात साठवील.” पाहा, तो प्रेरित होता.

317 परंतु जेव्हा येशू आला, ते शोधीत होते...आणि सर्व त्यांचे प्रेषित तुम्हाला ठाऊक आहे, कोणी महान येण्याची वाट पाहात होते. माझ्या देवा! माझ्या देवा! ओह, तो येत आहे. ते सर्व तेथे होते. मुलगा, तो प्रबळ असेल, तो सर्व रोमी लोकांना पृथ्वीच्या पाठीवरुन हाकलून देईल. माझ्या जेव्हा तो येईल, तो ग्रीकना *ह्या* मार्गाने जाण्यास लावील, आणि रोमी लोकांना *त्या* मार्गाने.

318 जेव्हा तो येईल, एक लहानसा नम्र मनुष्य एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे शेकला गेला. तो काय होता? देव त्याला स्वतःला साधेपणात लपवित आहे. ओह, बापरे!

319 मग तो त्याच्या संदेशाच्या शेवटी उभा राहिला, आणि म्हणाला, “मला पापाबद्दल कोण दोष लावील? जे सर्व पवित्र शास्त्र सांगत आहे ते मी करीन...जर मी माझ्या पित्याची कृत्ये करील नसेल, तर मला दोष द्या. परंतु जे पवित्र शास्त्र सांगते ते मी करीन, ते मी केले नाही?” अविश्वास पाप आहे, तुम्हाला ठाऊक आहे. “मला कोण दोष लावू शकले? जर मी देवाच्या सहाय्य्याने भूते काढतो, तर मला दाखवा तुम्ही त्याविषयी काय म्हणता.” साधेपणा!

320 तो स्वतः मृत्युपर्यंत शरण गेला! परंतु, ओह, त्या सकाळी इस्टरला, हालेलुयाह, तेथे जेथे त्याने खळे स्वच्छ केले. त्याने भूस झाडली, बरोबर आहे, भावा. हो, खरेच. आणि गहू कोठारात सिलबंद केला. तेथे भूमीवर सार्वकालिक जीवनासह त्यात विसावा घेतला, त्या मोठ्या दिवसाची वाट पाहत ज्याविषयी आपण बोलणार आहोत, येशू ख्रिस्ताचे येणे, जेव्हा त्यांतील जीवन जीवनाकडे येईल; आणि आपण पुनरुत्थानात उठविले जाऊ, आकाशात त्याच्यासह घेतले जाऊ, आणि कोठारात एकत्र केले जाऊ. आणि भूस अग्नीत टाकली जाईल; भुसी गुंडाळली जाईल, आणि ती *ह्या* मार्गाने आणि *त्या* मार्गाने ओढण्याचा प्रयत्न करतील, न विझणाऱ्या अग्नीत फेकले जातील. आमेन, ओह, तो किती अद्भूत आहे नाही! [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

321 त्यांनी त्याला ओळखले नाही, देव साधेपणात. का? का? त्याने कधीही धर्मोपदेशकाच्या अटीवर प्रचार केला नाही. त्याने कधीच नाही. त्याने कधीही प्रचारकासारखा प्रचार केला नाही. पाहीले? त्याने असा प्रचार केला...त्याने देवाच्या

साधेपणाच्या शब्दांचा वापर केला असे शब्द जसे “कुऱ्हाड ठेवली आहे,” शब्द “झाड,” शब्द “साप.” कोणी शिक्षक नाही, जसे त्या दिवसातील, धर्मोपदेशक, दैवशास्त्राचा डॉक्टर, डॉक्टर *अमुक–आणि–अमुक*. त्याने ते केले नाही. त्याने पलिकडे कुठेतरी एका जंगलात लाकडे तोडणाऱ्या माणसासारखा प्रचार केला. तो कुऱ्हाड आणि झाडे, आणि साप आणि तशासारख्या गोष्टींचा आणि गहू आणि कोठार, आणि अशासारख्या गोष्टींविषयी बोलला. आज त्याला विचारात घेतले जाईल जसे मला वाटते “रस्त्यावर बोलणारा प्रचारक” म्हणून. मला वाटते त्याला त्या दिवसातील, झाडाचा बुडखा राहीलेला प्रचारक म्हटले गेले आहे.जो तो यार्देनेजवळ झाडाच्या बुडखावर उभा राही. कदाचित...देव साधेपणामध्ये आहे, जगाच्या ज्ञानापासून लपवित आहे.

322 आता, आपण शोधूया. येशू म्हणाला, “पित्या मी तुझे आभार मानतो, ह्या गोष्टी जगातील विचारवंतापासून गुप्त ठेवल्या, आणि अशा बालकांना प्रगट करील जे शिकू इच्छितील.” पाहीले? देव साधेपणात, ख्रिस्तामध्ये लपत आहे. देव साधेपणात, योहानात लपवित आहे, पाहिले? जरा...जरा...तो—तो जरा ह्याविषयी विचार करा, देव साधेपणात, त्याला स्वतःला जगाच्या विचारवंतापासून लपवित आहे.

323 आता, आपण काही मिनिटातच किंवा दोन, बंद करुया, कारण मी तुम्हाला जास्त वेळ थांबवू इच्छित नाही.

324 पाहा, आपण जरा मिनीटासाठी थांबूया, काहीतरी वैयक्तिक. आपण ज्यात राहात आहोत त्या दिवसाचा करा, आता हे बंद करण्यासाठी. त्या दिवसाचा विचार करा ज्यात आपण राहात आहोत, जेव्हा देव एका लहान जुन्या नम्र स्थानात खाली येत आहे ज्यात आपण राहात आहोत, आजाऱ्यांना बरे करीत. आणि श्रीमंत, आणि गर्विष्ठ आणि अति–विद्वान, “चमत्कारांचे दिवस गेले. तेथे दैवी आरोग्य अशी गोष्ट नाही.”

325 तुम्हाला तो संदेश आठवतो का जो मी ह्या जागेवरून प्रचार केला, त्या सकाळी जेव्हा मी गेलो, दाविद गल्याथाविषयी?

326 म्हणाले, “तु कसा तेथे सुशिक्षित जगाला सामोरा जाणार आहेस, भाऊ ब्रॅन्हम, ह्या सर्व गोष्टींसह?”

327 मी म्हणालो, “मी ते सांगु शकत नाही मी कसा त्यांना भेटणार आहे. देवाने म्हटले, ‘जा.’” पाहीले? तेच सर्वकाही आहे, पाहा. तो त्याचा शब्द आहे. त्याने ते अभिवचन दिले आहे. येथे ती वेळ आहे.

328 ह्या येत्या जूनच्या तीस वर्षांअगोदर, जेव्हा तो देवदूत, जो तुम्ही ह्या चित्रात तेथे पाहात आहात, त्या दिवशी, नदीवर तेथे खाली आला, अधिक निश्चित. ह्या येत्या जूनच्या; आणि म्हणाला, “जसा बाप्तिस्मा देणारा योहान मजपुढे पाठविला होता,” पाच हजार किंवा अधिक लोकांसमोर, “अशी वेळ आली आहे जेव्हा तुझा संदेश जगामध्ये पसरवला जाईल.”

329 तुम्हाला ही टिका आठवते, जर तुमच्यातील कोणी तेथे असतील. मला वाटते, रॅाय स्लॅाटर, किंवा तुमच्यातील येथे बसलेल्यांना, तो दिवस आठवत असेल; किंवा काही, श्रीमती स्पेन्सर, किंवा—किंवा येथील काही वृध्द लोक त्यांना माहीत असेल, पाहा; जॅार्ज राईट, किंवा त्यांच्यातील काहींना, पाहा, माहीत आहे की ते कसे होते. परंतु ते पूर्ण झालेले नाही. [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] त्यांनी ते केले.

330 आणि मग मध्येच, जेव्हा त्यांनी धुडकावून लावले, आणि म्हणाले, “ते फक्त मानसिक आरोग्य आहे.” आणि देव लगेच सभोवती मागे वळला आणि तेथे एका वृध्द मुका अपोस्सम नावाचा प्राणी पाठवला, आणि देवाच्या सामर्थ्याने बरा झाला.

331 लीली वुड आणि बँक्स, आम्ही तेथे बसलो होतो, देवाने प्रकट केलेले सत्य माहीत आहे. जेव्हा, एक लहान जुना मृत मिनो, मासा पाण्यावर पडला होता. आणि पवित्र आत्मा बोलला, त्या दिवसाअगोदर, तो त्याचे गौरव दाखविणार होता आणि त्याविषयी काहीतरी करणार होता. आणि तेथे त्या सकाळी, तेथे उभा असताना, आणि पवित्र आत्मा त्या नावेत खाली उतरला, आणि मी उठलो आणि त्या मास्याशी बोललो आणि तो पाण्यावर मृतावस्थेत, अर्ध्या तासापासून पडला होता; त्याचे श्वसनेंद्रीये आणि त्याच्या शरीरातील आतील भाग त्याच्या तोंडातून बाहेर आले होते. तो जीवंत झाला, आणि इतर माशांसारखा पोहत गेला. ते काय आहे? देव त्याला स्वतःला साधेपणात लपवित आहे.

332 ह्या दगडांपासून अब्राहामासाठी मुले निर्माण करण्यास देव समर्थ आहे. देव त्या अपोस्समला आरोग्य देण्यास समर्थ आहे, किंवा एका माश्याला किंवा काहीही जर तो त्याचा संदेश पुढे आणील आणि लोकं त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीत, देव अपोस्समला विश्वास ठेवण्यासाठी निर्माण करु शकतो. हालेलुयाह! देव मृत माशाला उठवू शकतो. तो मृत अपोस्समलाही उठवू शकतो. तो करु शकतो. तो त्याला जे काही वाटेल ते करु शकतो.

333 ह्या पीढीस किती दोष देईल! जेव्हा ते त्यावर अडखळतात, आणि त्याविषयी कुजबूज करतात. आणि “तू हे केले नाही आणि *ते* कर.” आणि देवाने साध्या प्राण्यास आत पाठविले. पाहा? काय टीका आहे! ते काय होते? देव साधेपणात, पाहा, त्याला स्वतःला महान बनुन दाखवितो. ओह, माझ्या देवा, ह्या पिढीच्या ह्या मनुष्यांना, त्यांच्या अविश्वासासाठी दोष लाव.

334 आता, ते आता विचार करतात. जसे ते नेहमीच करीत होते, ते त्यांच्या स्वत:च्या मार्गाने केले पाहिजे होते. “आता, जर तेथे दैवी आरोग्य अशासारखी काय गोष्ट आहे...” जसे एक कॅथलिक मनुष्य मला हे बोलला एक मनुष्य त्या रात्री, मला त्याविषयी बोलला. तुम्हाला त्याविषयी माहीत आहे. सांगितले...तो अयर्स, की मी त्याच्या मुलास तेथे हस्टन येथे पाहावयास गेलो, तो म्हणाला—तो म्हणाला, “ठीक आहे आता, जर—जर ते देवाचे दान आहे, ते कॅथलिक मंडळीत यावयास पाहीजे होते.” तुम्ही पाहिले? पाहिले? मेथडिस्ट विचार करतात की ते त्यांच्या मंडळीत यावयास हवे होते. आणि पेंटेकॉस्टल विचार करतात ते त्यांच्या मंडळीत यावयास हवे होते. परंतु ते त्यांच्याकडे कोणाकडे आले नाही.

335 ते येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याद्वारे त्याला प्रगट करण्यास आले. ते खरे आहे. खरेच, त्याने केले. होय. फक्त लक्ष द्या. ते तुमच्यापासून जाऊ देऊ नका. ते तुमच्या—तुमच्या हृदयात ठेवा आणि ते लक्षात ठेवा. तेथे विचार करा.

336 ते त्यांच्या स्वतःच्या मार्गाने, त्यांच्यासाठी, त्यांच्या स्वतःच्या संप्रदायातून यावयास हवे होते. “आणि त्याशिवाय ते केले, ते तो नव्हता. पाहा. ते फक्त मानसिक आहे, किंवा तो सैतान आहे. तो—तो...तो देव नाही. कारण, जर तो देव असता, त्याला यावे लागेल,” त्यांच्या स्वतःच्या मार्गाने, तुम्ही पाहीले, “तो मार्ग ज्याचा अनुवाद आम्ही लावला आहे.”

337 त्याचप्रकारे येशूला परुश्यांकडे यावे लागले. ते त्याप्रकारे व्हायला पाहिजे होते. पाहिले? जर त्याचे...जर देव एक—एक मसीहाला पाठविणार होता, त्यांनी त्या सर्वांचा अनुवाद केला होता की तो कसा असला पाहीजे. आणि कारण तो निराळ्या प्रकारे

आला, तर, “तो मसीहा नव्हता. तो अनौरस संतती होता. तो बालजबूब होता.” परंतु देव साधेपणात लपला होता.

338 पुढे पाठविलेला सुशिक्षित मनुष्य असला पाहिजे...प्रत्येक दिवशी, प्रत्येक वर्षी जेव्हा ते, होय, त्यांच्या सेवकांची नियुक्ती करीतात आणि त्यांना बाहेर मिशनरी म्हणून पाठवितात, परिवर्तन करण्यासाठी आणि त्यांना मध्ये आणण्यासाठी, प्रत्येक विचार, “हा तो मार्ग सिध्द करण्यासाठी असेल जो पुढे येणार आहे.” परंतु देवाने त्याला जंगलातून बाहेर काढले जेव्हा सेमिनरी बिलकुल नव्हती, पाहा, आणि त्यासारख्या गोष्टी. पाहिले? देव त्याला स्वतःला लीनतेत व साधेपणात लपवितो.

339 परंतु आता थांबा. बंद करताना, आपण हे बोलतो. परंतु देवाचा साधा संदेश नाकारणे; त्यास नाकारणे, देवाचा साधा मार्ग, म्हणजे सार्वकालिक नाश होणे. आता, आपण बोलत आहोत ते किती साधे आहे, आणि लोक विचार करतात, ठीक आहे, ते त्यावर हसू शकतात आणि त्यावरुन धावतात, आणि त्यांना पाहिजे तसे ते वागवितात, परंतु ते देवापासून सार्वकालिक विभक्त होणे आहे,

340 ते जे नोहाच्या दिवसात मरण पावले, आणि त्याच्या संदेशाकडे लक्ष दिले नाही, ते नाश पावले. आणि येशू गेला आणि जे अंधःकारात होते त्यांना घोषणा केली, त्याच्या मरणामध्ये, तो उठण्याअगोदर. तो अधोलोकात गेला, आणि तुरुंगातील आत्म्यांना घोषणा केली, हे आत्मे म्हणजे पूर्वी नोहाच्या दिवसात प्रलयाच्या वेळी ज्यांनी पश्चाताप केला नाही, जेव्हा देवाचा साधा संदेश एका साध्या मनुष्याद्वारे, प्रचार केला जात होता. तो गेला. तो म्हणाला, “नोहाने प्रचार केला की मी येथे असेन, आणि मी येथे आहे.” ते बरोबर आहे. पाहा?

341 ज्यांनी संदेष्ट्याच्या संदेशाकडे लक्ष दिले नाही. मोशे तेथे रानात, जे त्याला देवाकडून मिळाले, अग्नीस्तंभाद्वारे व्यवस्थित प्रकट केले आणि रानात तो चालविला गेला. आणि नंतर ज्यांनी उभे राहण्याचा आणि संघटना बनविण्याचा प्रयत्न केला, आणि ते नाश पावले आणि त्यांच्यातील प्रत्येकाचा, मृत्यू झाला; परंतु दोन मनुष्य, यहोशवा आणि कालेब.

342 आणि तेथे, परुशी इतके आंधळे झाले होते, की ते त्याला पाहू शकले नाही; म्हणून त्यांनी मागे पाहिले आणि म्हणाले, “आमच्या पुर्वजांनी रानामध्ये मान्ना खाल्ला.”

343 आणि येशू म्हणाला, “आणि ते प्रत्येक जण, मृत्यू पावले.” त्यांनी देवाचे गौरव पाहिले. ते त्या प्रकाशात चालले...ते प्रकाशात चालले. ते अग्नीस्तंभाच्या प्रकाशात चालले. ते त्या सामर्थ्याच्या उपस्थितीत चालले. ते अशा ठिकाणाहून चालले जो पवित्र आत्म्याने त्यांना चालण्यासाठी केला. त्यांनी देवाने स्वर्गातून दिलेला मान्ना खाल्ला. आणि, नाश पावले, आणि नरकात गेले. “ते प्रत्येकजण *मृत्यू* पावले.” जर तुम्ही ते वचन काढून घेतले, ते देवाच्या समक्षतेपासून, “सार्वकालिकतेसाठी वेगळे होणे आहे.” “ते प्रत्येकजण मृत आहेत.” पाहिले?

344 प्रत्येकजण ज्यांनी येशूला नाकारले ते नाश पावले. पाहा, मला काय म्हणायचे आहे? देवाचा साधेपणा नाकारणे! ते फक्त काहीतरी असे नाही...तुम्ही म्हणता, “ठीक आहे, मी चूक केली.” तुम्ही ते तशाप्रकारे करु नका. देव तशाप्रकारे त्याचा स्विकार करीत नाही. तुमचा नाश, अनंतकालासाठी झाला. आपण त्याविषयी चांगला विचार करीत असू. आता, ते देवाकडून योग्यरितीने ओळखले गेले पाहिजे, पाहा, आणि नंतर, जर ते आहे, ते त्याचे वचन आहे. पाहा? ओह, त्यांच्या सारखा ज्यांनी मोशेला नाकारले, एलीयास नाकारले, योहानास नाकारले, येशूला नाकारले, त्यांच्या दिवसांतील.

345 येथे, मला तुम्हाला जरा एक लहान कडू गोष्ट सांगू द्या. आणि, नंतर मी अपेक्षा करितो मी तुम्हाला खूप दु:खवीत नाही. परंतु, लक्ष द्या. दुसऱ्या दिवशी मला हाउस्टन, टेक्सास येथे, क्षमा मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठी, बोलविण्यात आले. काही लोकांना एकत्र केले, संदेशाचा प्रचार करण्यासाठी आणि लोकांनी तेथे तरुण पुरुष आणि तरुण मुलीच्या क्षमा पत्रावर सही करावी. तुम्हाला माहीत आहे ते त्या संकटात होते. मला वाटते तुम्ही त्याविषयी वर्तमान पत्रात वाचले असेल. आणि तो श्रीमान अयर्सचा सावत्र मुलगा होता.

346 आणि श्रीमान अयर्स हे आहेत ज्यांनी प्रभूच्या दूताचा फोटो काढला, जो तुम्ही तेथे पाहात आहात. एक रोमन कॅथलिक, आणि त्याची पत्नी यहुदी होती. आणि त्याने त्या यहुदी मुलीशी विवाह केला. ते एकमेकांबरोबर धर्माविषयी बोलत नसत, आणि तसेच पुढे, त्यासारखे. आणि टेड किपरमॅन, तो सुध्दा त्याच्याबरोबर व्यवसायात होता, यांचा डगलस स्टूडिओ होता.

347 आणि जेव्हा तो तेथे आला, जेथे श्रीमान बेस्ट, डॉ. बेस्ट, बाप्टिस्ट मंडळी याने त्याची मूठ भाऊ बोसवर्थच्या नाकाखाली धरली, आणि ती हालवली, आणि म्हटला, “आता तसे करताना माझा फोटो घे.” म्हणाला, “मी त्या म्हाताऱ्या मनुष्याची चामडी घेणार आहे आणि ती माझ्या अभ्यासाच्या खोलीत लटकवणार आहे, दैवी स्मारक म्हणून.”

348 आणि मी हाऊस्टन, टेक्सास येथे जाण्याआधी, प्रभू परमेश्वराने मला तेथे जाण्यास सांगितले. आणि मी तेथे प्रभूच्या नावाने गेलो होतो. आणि तुम्हा सर्वांना माहीत आहे तो वादविवाद आणि गोष्टी तेथे बाहेर आल्या. ते तुम्ही पुस्तकांमध्ये वाचले आहे आणि तसेच पुढे आणि तेथे ते होते. आणि त्या रात्री...फक्त नम्रतेने चालण्याचा प्रयत्न करीत होता.

349 “काय” ते म्हणाले, “ते अडाणी लोकांचा समुह आहेत.” डॉ. बेस्ट म्हणाले, “ते काहीच नाही परंतु एक लोकांचा समुह आहेत.” म्हणाले, “तेथे असे लोक नाहीत जे दैवी आरोग्यावर विश्वास ठेवतात. तशाप्रकारच्या गोष्टी. तो निरुपयोगी प्राण्याचा समुह आहे.” त्यांना ठाऊक नाही की तो देव साधेपणामध्ये होता. “का” म्हणाला, “त्या मनुष्याकडे व्याकरण शाळेचे शिक्षणसुध्दा नव्हते.”

350 तो शक्य तितक्या सर्व विद्वानाच्या पदव्यासह सभ्य होता, जोपर्यंत ज्याला वाटेल तो भाऊ बोसवर्थला कसेही करुन खाली दाबू शकतो. परंतु जेव्हा ते वचनाकडे आले, तो अगदी त्याच्यासाठी सामन्याचा दहावा भागही नव्हता. पाहा? आणि भाऊ बोसवर्थला माहीत आहे की तो कोठे उभा आहे. येथे बसलेले त्याचे कित्येक लोक त्या वादविवादाच्या वेळी होते. आणि तेथे ते होते.

351 नंतर त्याने आमच्यावर फेकला, असे म्हणून आम्ही अडाणी लोकांचा समुह आहोत, म्हणाला, “सभ्य विचार करणारे लोक ह्यावर विश्वास ठेवीत नाही.”

352 भाऊ बोसवर्थ म्हणाले, “एक क्षणभर थांबा.” तो म्हणाला, “ह्या शहरातील किती लोक,” अंदाजे तीस हजार त्या रात्री, त्यासारखे आमच्यामध्ये बसलेले आहेत, “ह्या शहरातील किती लोक, जे त्या मोठ्या, सुरेख बाप्तिस्ट मंडळ्यात जातात, डॉक्टरच्या विधानाद्वारे सिध्द करु शकतील की त्यांना देवाच्या सामर्थ्याद्वारे आरोग्य मिळाले आहे कारण भाऊ ब्रॅन्हम शहरामध्ये होते, उगे राहा.” आणि तीनशे उभे राहीले. “त्या विषयी काय?” तेथे ते होते. देव साधेपणात लपत होता. नंतर तो म्हणाला, “भावा...”

353 तो म्हणाला, "दैवी आरोग्य देणाऱ्याला पुढे आणा. मला त्याला कोणालातरी संमोहीत करताना पाहू द्या, नंतर मला आजपासून एका वर्षाने त्याच्याकडे पाहू द्या." आणि टेड किपर...

354 आणि तेथे अयर्स, एकाने फोटो घेतला, म्हणाला, "श्रीमान ब्रॅन्हम, हे कोणी नाही परंतु एक संमोहीत करणारा आहे. मी एका स्त्रीला पाहीले, तीच्या गळ्यात गाठ होती, *त्या*सारखी, आणि," म्हणाला, "त्या स्त्रीला संमोहीत केले. दुसऱ्या दिवशी मी बोललो, आणि तीच्या गळ्यात ती गाठ नव्हती." म्हणाला, "त्या मनुष्याने तीला संमोहीत केले." आणि ओह, त्याने माझा उपहास केला. म्हणाला मी शहरातून बाहेर पळालो पाहीजे, आणि तो त्यातील एक ते करणारा असला पाहिजे. पाहा, आणि सर्व. त्यासारखे मोठ्या ओळीत *हाउस्टन क्रॉनीकलच्या* पहिल्या पानावर.

355 मी कधीच एकही शब्द बोललो नाही. मी तिथे माझ्या पित्याचे काम करण्यासाठी होतो, तेच ते आहे; त्या वचनाशी एकनिष्ठ राहा. त्याने मला तेथे पाठविले आहे, आणि हे त्याचे काम आहे.

356 त्या रात्री जेव्हा मी तेथे चालत गेलो. मी म्हणालो, "मी—मी—मी—मी दैवी आरोग्य देणारा नाही. मी नाही. जर कोणी तसे म्हणते," मी म्हणालो, "ते चुकीचे आहेत." आणि मी म्हणालो, "माझी इच्छा नाही की मला एक दैवी आरोग्य देणारा म्हणून संबोधण्यात यावं." मी म्हणालो, "जर डॉक्टर बेस्ट येथे तारणाचा प्रचार करतील, तर त्यांना दैवी तारणारा म्हणावे अशी त्यांची इच्छा नसणार." आणि मी म्हणालो मग, "मी दैवी आरोग्याचा प्रचार केला तर, मला दैवी आरोग्यदाता म्हणावे असे मला वाटत नाही. परंतु तो म्हणाला, तो निश्चितच दैवी तारणारा नाही; तो नाही. मीही दैवी आरोग्यदाता नाही. परंतु, 'त्याला बसलेल्या फटक्याने आम्हाला आरोग्य मिळाले आहे,' मी ते दाखवू इच्छितो." पाहा?

आणि म्हणून, तो, "मुर्खपणा!" तुम्हाला माहीत आहे, सभोवती चालले.

357 आणि मी म्हणालो, "परंतु जर त्याची उपस्थिती आणि देवाचे हे दान, हा प्रभूचा दूत, जर त्याचा प्रश्न आहे, तर ते सिध्द करता येईल," सुमारे त्या वेळेस, ती येथे आदळून खाली आली. म्हणाली, "आता बोलण्याची गरज नाही. तो माझ्यासाठी अगोदरच बोलला आहे." आणि मी निघून गेलो.

358 आणि मी हाऊस्टनला गेलो, ते मोठे शहर, त्या देशांतील सर्वात सुंदर असे शहर ते आहे, कुठेही. जेव्हा मी तेथे आत गेलो, दुसऱ्या दिवशी त्या शहराकडे पाहणे लज्जास्पद होते. तेथील रस्ते घाणेरडे होते. त्या जागेतील दुकानांचे मेज, टेक्सास अवेन्यू येथील, आणि मी हॉटेल राईस मध्ये गेलो, जेथे चित्रपटातील सिनेमा तारे राहात असत, आणि तेथे खाली तळाशी गेलो, ते उपहारगृह, आणि छतांतून खाली गळत होते, आणि जमिनीवरील गिलावा, आणि घाण आणि अस्वच्छता. आणि असा प्रचारकामध्ये गोंधळ जो आजपर्यंत माझ्या जीवनात मी कधीच अनुभवला नाही किंवा ऐकले नाही.

359 का? प्रकाशाला नाकारणे म्हणजे अंधारात चालणे आहे. तेथे त्यांची लेकरे मरणाच्या रांगेत बसली आहे. बरोबर आहे. देव खाली आला. जेव्हा साधेपणा प्रदर्शित झाला आणि नाकारला गेला, नंतर देवाने त्याला स्वतःला साधेपणात दाखविले.

360 आणि तेथे त्यांनी तो फोटो घेतला ज्याने जगाला झाडून टाकले. शास्त्रज्ञसुध्दा म्हणाले, ते अद्भूत आहे ज्याचा आजपर्यंतच्या जगाच्या सर्व इतिहासात असा तो फोटो आहे आणि वॉशिंग्टन डीसी, येथील एका धार्मिक कलेच्या सभागृहात टांगला. तेथे ते आहे,

साधेपणा प्रगट झाला, तेव्हा. पाहा? पाहा? देव त्याला स्वतःला साधेपणात लपवित आहे, नंतर त्याला प्रगट करीत आहे. पाहा?

361 आता, त्याने त्याला ख्रिस्ताच्या मरणात लपविले, परंतु, पुनरुत्थानाद्वारे त्याला स्वतःला प्रगट केले. ओह, बापरे! असेच पुढे...त्याला अंत नाही; फक्त बोलत राहा. परंतु तेथेच तुम्ही आहात! पाहा.

362 तेथे सुर्यप्रकाश आहे हे सांगण्यासाठी नकार देणे, म्हणजे तळाशी जाणे आणि प्रकाशापासून तुमचे डोळे बंद करणे. आणि ते बरोबर आहे. आणि, लक्षात ठेवा, एकच मार्गाद्वारे तुम्ही चुकीचे ठरु शकता, ते म्हणजे प्रथम प्रकाशाला नाकारणे. पाहा? आणि तुमचे डोळे उघडण्यास नकार देणे. तुम्ही अंधकारात जगाल. पाहा? जर तुम्ही पाहण्यास नाकारले तुम्ही कसे पाहणार? पाहा? साध्या गोष्टींचे निरीक्षण करा...त्या लहान गोष्टी आहेत ज्या तुम्ही न करता सोडता, मोठ्या गोष्टी नाही. ज्या करण्याचा तुम्ही प्रयत्न करता.

363 ओह, बापरे! तर, येथे पाहा, मला...तुम्हाला सांगू द्या. मत्तय 11:10 मध्ये, तो म्हणाला, "जर तुमची पत्करण्याची इच्छा असेल, हा तोच आहे." पाहा, "हा तोच आहे. ज्यास माझ्यापुढे पाठविण्यात आले होते." तो साधेपणा होता.

364 त्याला एके दिवशी विचारण्यात आले, तर शास्त्री असे का म्हणतात की...

365 तो म्हणाला, "मनुष्याचा पुत्र वर यरुशलेमेत जाईल. मला पाप्यांच्या हाती दिले जाईल, आणि ते मनुष्याच्या पुत्राचा वध करतील. आणि तो मरण पावेल आणि तो तिसऱ्यादिवशी पुन्हा उठेल." म्हणाला, "हा दृष्टांत तेथे कोणालाच सांगू नका."

366 आणि शिष्य, आता त्याचा विचार करु लागले. शिष्य जे योहानाबरोबर चालले होते, त्याच्याशी बोलले होते त्याच्याबरोबर खाल्ले, अरण्यात, किनाऱ्यावर बसले, ते म्हणाले, "गुरुजी असे का म्हटले की एलीया प्रथम आला पाहीजे? तू म्हणतो तुला वधस्तंभावर दिले जाणार आहे, आणि तू उठणार आहेस. तू तो मसीहा आहेस, राजासनावर विराजमान हो. आता, शास्त्री असे का...म्हणतात. आपली संपूर्ण पवित्र वचने म्हणतात, पवित्र वचने स्पष्ट रितीने सांगतात, व ख्रिस्त येण्याअगोदर एलीया प्रथम आला पाहिजे. होय." पाहा?

367 तो म्हणाला, "तो आलाच आहे, आणि तुम्ही त्याला ओळखले नाही." आता तो कोण होता? शिष्य.

368 मी तुम्हाला इथे इजा पोहचवणार आहे, अगदी थोडा वेळ आता, मला तसे म्हणायचे नाहीए. पुढच्या काही मिनिटांसाठी, पाहा, एक मिनिट दोन, परंतु त्यामुळे तुम्हाला नक्कीच समजले. तुम्ही ऐकत आहात? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा]

369 पाहा! का? ती मनुष्ये जी ख्रिस्ताबरोबर चालली होती, "शास्त्रवचन असे का म्हणते, पहिल्याने, एलीया आला पाहिजे?" आणि ते योहानाद्वारे बदलले गेले होते, त्याला तरीही ओळखत नव्हते. "शिक्षकांनो, शास्त्रवचन असे का म्हणते? तुम्हाला कळते का मी काय म्हणत आहे? पाहा? शास्त्रवचन असे का म्हणते? एलीया पहिल्याने आला पाहीजे? शिष्य जे त्याच्या बरोबर चालत होते. शास्त्रवचने असे का म्हणतात, की तो पहिल्याने आला पाहिजे? त्या अगोदर तो सर्व गोष्टी यथास्थित करील?" ते त्याने, त्याच्या अर्धा डजन लोकांबरोबर केले, आणि जे सर्व तेथे होते. पाहा? तेच सर्व ते स्विकारणारे होते, तेच ते लोक पाहण्यासाठी नियुक्त केलेले होते.

370 येशू म्हणाला, "तो आलाच आहे, आणि तुम्ही ते ओळखले नाही. परंतु त्याने तेच केले जे शास्त्रात लिहीले होते की तो करिल. त्याने त्यांना पूर्वस्थितीत आणले, ज्यांनी

माझा स्विकार केला व विश्वास ठेवला, त्याने तेच केले ज्याविषयी शास्त्र वचनात सांगितले होते तो करिल. आणि त्यांनाही त्याला तेच केले जे शास्त्रवचनात सांगितले होते की ते करतील. तो आलाच आहे, आणि तुम्ही ते ओळखले नाही."

371 तुम्ही तयार आहात काय? मी तुम्हाला लहानसा धक्का देऊ इच्छितो, त्याचप्रकारे रुपांतर होईल ते फार साधेपणात असेल, यात काही संशय नाही की. ते तसेच होईल. ह्यांतील एके दिवशी रुपांतर होईपर्यंत आणि कोणालाही त्याविषयी काहीच कळणार नाही. आता, ऊठू नका, परंतु जरा मिनीटासाठी अभ्यास करा, मी नक्कीच आता बंद करीत आहे. न्याय येईपर्यंत रुपांतर इतक्या साध्याप्रकारे होईल, आणि ते मनुष्याच्या पुत्राला पाहतील आणि ते म्हणतील, "आपल्याकडे *अशा-अशा* गोष्टी असायला हव्या होत्या? आणि तेथे आपल्याकडे एलीयास पाठवणार होते? आणि तेथे रुपांतर व्हायला पाहिजे होते?"

372 येशू म्हणेल, "ते आधीच झालेले आहे, आणि तुम्हाला ते कळले नाही." देव साधेपणामध्ये पाहा?

373 आत, ह्या आठवड्यात आपण काही भयानक खोल शिकवणी पाहणार आहोत...?...आता, लक्ष द्या. रुपांतर, असे असेल फक्त थोडेच वधूमध्ये जातील! ते तसे नसणार...

374 आता पाहा, शिक्षकांना ते कसे मिळेल? त्यांच्याकडे तक्ता आहे, आणि ते जातात, येथे येणाऱ्या दहा लाख लोकांना दाखवतात; सर्व मेथडिस्ट, जर तो एक मेथडिस्ट प्रचारक आहे; जर तो पेंटेकॉस्टल आहे. येणाऱ्या पेंटेकॉस्टला, ते कधीच त्याला स्पर्श करणार नाहीत.

375 ते असे असेल, जेफर्सनविलेत एक जाईल आणि कोणीतरी हरवतील. ते म्हणतील, "बरे तू कधीच..." त्यांच्यातील इतरांना ते कळणार नाही. तेथे एक जॉर्जिया सोडून जाईल. पाहा? आफ्रिकेतून एक जाईल. आणि आपण असे म्हणू तेथे पाचशे लोक, जीवंत रुपांतरात जातील. आता, ती मंडळीचे शरीर नसेल. ती वधू आहे. ती कलीसीया नसणार. ही वधू आहे. पाहा?

376 मंडळी हजार वर्षांच्या काळात येईल, परंतु ते दुसऱ्या पुनरुत्थानात आहे. "ते हजार वर्षांच्या काळात नसतील." पाहा.

377 परंतु, वधूमध्ये जर ह्या मिनीटाला पाचशे लोक हे जगातून जातील, तर जगाला ह्याविषयी काहीच कळणार नाही. येशूने म्हटले, "तेथे पलंगावर एक राहील, आणि मी एकाला घेईन, एक राहील," ते रात्रीच्यावेळी असेल. "त्या वेळेस शेतात असलेल्या दोघांपैकी एक घेतला जाईल" आणि एक ठेवला जाईल. "पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूस आणि नोहाच्या दिवसात होते तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमनासमयी होईल."

378 विचार करा! सर्व काही तशाचप्रकारे चालत राहील तसे ते होऊ शकेल. हा कडवा संदेश पुढे चालेल, आणि, पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, "हा सेवक, कुठे चालला आहे, तो कधी परतला नाही, तो कदाचित जंगलात, शिकारीसाठी गेला असेल. तो कधी परतलाच नाही. आणि *हा* व्यक्ती कुठेतरी गेला. काय झाले तुला माहीत आहे? मी विश्वास करीतो ती एक तरुण मुलगी, तिलाही—तिलाही कोणी कुठेतरी उचलून नेले असणार, तुम्हाला माहीत आहे, आणि त्या मुलीला बाहेर नेऊन बलात्कार करुन, तिला नदीमध्ये फेकून दिले असेल. तिच्या बरोबर कोणी नव्हते." अर्धा...नव्याणव...मी असे म्हणू इच्छितो की एक करोडमधून एक जणाबद्दल काही माहीत पडत नाही, पाहा, तिच्याबरोबर जर कोणी परिचित नाही तर म्हणतील, "मुलगी हरवली आहे. का? मला काही समजत नाही. तीने तशाप्रकारे कधीच सोडले नाही." नाही.

379 आणि जेव्हा ते म्हणाले, “थडगी उघडतील.” थडगी कसे काय उघडतील? कधी, माझ्याकडे वेळ नाहीए की मी—मी तुम्हाला देवाचा साधेपणा दाखवावा. आणि ते कॅल्शिअम, क्षार आणि सगळे काही, जे—जे काही...सर्व जे तुमच्यामध्ये आहे जे घटक, ते फक्त चम्मचाभर बनते. हे खरे आहे. आणि ते काय करते, ते परत वर तोडण्यासाठी आत्मा आणि जीवनात बदलते. देव फक्त बोलणार, आणि रुपांतर हे घडणार. ते असे बाहेर जाणार नाहीत की स्वर्गदूत खाली उतरुन फावड्यांनी कबरा उघडून मृत शरीरे बाहेर काढतील. ते काय आहे? ते शरीर पापात जन्मलेले आहे. पण तुम्ही जाणता नवीन जे देवाच्या स्वरुपाचे बनवले आहे. पाहा? जर *हेच* शरीर असेल, तर आपण पुन्हा मरु. पाहा? कोणी पण नाही...तुम्ही म्हणाल, “थडगी उघडतील व मेलेले बाहेर येतील.” हे कदाचित खरे असेल, पण उघडणे म्हणजे जसे तुम्ही उघडणे म्हणता तसे नव्हे. समजलं? हो. ते बरोबर आहे. ओह, समजलं? हे तसे नसणार.

380 ते गुप्त असणार. कारण त्याने सांगितले आहे. “जसा चोर रात्री येतो, तसा मी येईन.” त्याने अगोदरच आपल्याला हे सांगितले आहे, रुपांतर.

381 नंतर न्याय येईल; व सर्वत्र पाप, प्लेग, आजार व सर्वकाही असेल, आणि लोकं मरण मागतील आणि म्हणतील, “प्रभू आमच्यावर हा न्याय का? जर तू सांगितलेस की प्रथम रुपांतर होईल?”

382 तेव्हा तो म्हणेल, “ते तर अगोदर झाले आणि तुम्हाला कळले नाही.” समजलं? परमेश्वर स्वतःला साधेपणात लपवितो. अरेरे! “ठीक आहे. ते सगळ अगोदरच झालं, व तुम्हाला माहीत पडलं नाही.”

383 का विश्वासणारे त्याच्या येण्याच्या साध्या चिन्हांवर विश्वास ठेवीत नाहीत?

384 ते अपेक्षा करतात की, ज्याप्रमाणे वचनात लिहीले आहे की, आणि—आणि चंद्र मध्येच खाली येईल...किंवा सुर्य दिवसाच्या मधोमध खाली येईल व अशा सर्व गोष्टी. अरे! जर आपल्याकडे वेळ असता...बघा, तुम्हाला दाखवण्यासाठी माझ्या ह्या सर्व गोष्टींची टिप्पणी केलेली आहे. आणि आपण त्यावर बोलूया आठवड्यात जेव्हा शिक्के उघडण्याचा संदेश जेव्हा मी प्रचार करीन. तिथे समजेल की कशा ह्या गोष्टी घडून जातील व समजणारसुध्दा नाहीत. बघा, जर देवाचा दूत हे शिक्के उघडून प्रकट करील, तर ते समजेल. लक्षात ठेवा की ह्या सर्व गोष्टी त्या सात रहस्यात मेघगर्जनांमध्ये शिक्कामोर्तब करण्यात आल्या आहेत. समजले?

385 आता काय? लोकं का विश्वास ठेवू शकत नाहीत, ह्या छोट्या समुहाच्या साध्या साधेपणावर व देवाच्या येण्याच्या चिन्हांच्या वाणीवर? ते का विश्वास करु शकत नाहीत? परमेश्वराचे वचन नेहमी असेच प्रगट झाले आहे. परंतु ते लोक खूप जास्त शिकलेले व खूप जास्त चलाख आहेत की ते देवाच्या वचनाच्या साधेपणावर विश्वास करु शकत नाहीत. ते त्यामध्ये स्वतःचे विचार घालू पाहतात व म्हणतात, “ह्याचा अर्थ *हा* नाही, ह्याचा अर्थ *तो* नाही.” बघितले? ह्याचा अर्थ हाच आहे.

386 ऐका आता, मला लवकर तुम्हाला हे सांगू द्या. देव जे दृष्टांत ह्या जागेवर दाखवतो, त्यांविषयी सुध्दा गैरसमज केला जातो, आणि म्हणूनच त्या टेपवर तुम्ही मला असे बोलताना ऐकले असेल. “जे टेप सांगते तेच सांगा. जे दृष्टांत सांगतात तेच सांगा.” आता तर तुम्ही पूर्ण जागे असाल, जर तुम्हाला समजेल. मी आशा करतो की मला माझ्या हातात पकडून हे तुम्हाला दाखवण्याची गरज नाही. बघितलं? बघितलं? बघितलं?...हे—हे इथे आहे. आपण शेवटच्या समयात आहोत. बघितलं? होय श्रीमान. हुशार शिकलेले

ह्यांना हे कळत नाही. साधे दृष्टांत, जे इतक्या साधेपणात प्रगट केले जातात की ते लोकांच्या डोक्यावरुन जातात. बघितलं?

387 कारण मी एक दृष्टांत बघितला व तुम्हाला शिकारीला जाण्याविषयी वगैरे सर्व काही सांगितले व लोकांना त्याचे अडखळण झाले. आणि परमेश्वराने त्याचा अर्थ दाखविला. माझ्या आईच्या जाण्याविषयी दाखविले. आणि अगोदरच त्या गोष्टी देवाने दाखविल्या आणि त्या सर्व गोष्टी जशा त्याने दाखविल्या होत्या त्याचप्रमाणे घडल्या. पहा?

388 आणि तरी योहानाने बाहेर येऊन कबूली दिली. तो म्हणाला, "मी मसीहा नाही, पण मी अरण्यात ओरडणाऱ्याची वाणी आहे."

389 आणि नंतर तेच शिष्य म्हणाले, "शास्त्री असे का म्हणतात की, शास्त्र... शास्त्रलेखाप्रमाणे एलीया प्रथम आला पाहिजे? बघितलं?" परमेश्वराचे साधेपण लोकांच्या डोक्याच्या वरुन जाते.

390 मला हे घेऊ द्या, व मग मी संपवतो. परमेश्वराच्या सहाय्याने मी हे घेतो. बघा? आपण ह्याची फोड करुया. मला—मला क्षमा करा की मी तुम्हाला थांबवून ठेवले आहे. पण फक्त आणखी थोडा वेळ.

बघा, आता एका शाईच्या थेंबाकडे आपण बघूया.

391 प्रत्येक गोष्टीचा एक उद्देश आहे. तुम्ही आजच्या सकाळी ह्या ठिकाणी एका उद्देशासाठी जमा झाले आहात. मी तुमच्या घरी जेवतो, चार्ली; नेली; तुम्ही माझ्यासाठी स्वयंपाक बनविता, एका उद्देशासाठी. सर्व गोष्टी काहीना काही उद्देशासाठी आहेत. हे चर्च एका उद्देशासाठी उभारले आहे. कोणतीच गोष्ट उद्देश व कारण ह्याशिवाय नाही.

392 एक साधा शाईचा थेंब घ्या. तुम्हाला माझा आवाज येतो का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] एक साधा शाईचा थेंब घ्या व त्याकडे पाहा. हे काय आहे? एक शाईचा थेंब हा कुठून आला? ठीक आहे. आता एक शाईचा थेंब घेऊया व समजूया की हा काळ्या शाईचा थेंब आहे. आता, ही शाई एका उद्देशासाठी आहे. ती माझी क्षमा पेनाद्वारे लिहू शकते. ती एका लेखणीद्वारे माझे क्षमापात्र लिहू शकते, मृत्यू कोठडीतून मला सोडविण्यासाठी, माफीनामा, लिहू शकते. बरोबर आहे? ती योहान 3:16 लिहू शकते, व त्यावर विश्वास ठेवण्याने, माझा जीव वाचवू शकते काय हे बरोबर आहे? ["आमेन."] किंवा, ती माझ्या मरण फर्मानावर सही करु शकते. बघितलं? ती मला न्यायसभेमध्ये दोषी ठरवू शकते. ती एका उद्देशासाठी आहे. काय हे बरोबर आहे? ["आमेन."]

393 ठीक आहे. आता शाईकडे पहूया की ती कोठून आली. आता ती शाई आहे. आणि काही रासायनिक द्रव्यांच्या मिश्रणाने ती बनविली गेली आहे. व ती काळ्या रंगाची आहे. जर ती तुमच्या कपड्यावर पडली, तर ते डागाळेल.

394 परंतु आपण ब्लीच पूड नावाचा एक घटक तयार केला आहे. तुम्ही स्त्रीया क्लोरोक्स ब्लीच नावाचा घटक वापरता. आता, मी जर एक शाईचा थेंब घेऊन तो एका ब्लीचने भरलेल्या अंघोळीच्या बादलीत टाकला त्या शाईच्या थेंबाचे काय होईल? बघितले? का? ब्लीच हे अशाप्रकारच्या रासायनिक पदार्थांच्या मिश्रणाने बनवले आहे की, ते मिश्रण शाई इतके वाईट विभाजन करते, की ती शाई पूर्ण नष्ट होते. आता, पाणी हा ब्लीचचा एक भाग आहे.

395 पाणी हा $H_2O$ म्हणजे हायड्रोजन व ऑक्सीजन व ह्यांचे मिश्रण आहे. व दोन्ही हायड्रोजन आणि ऑक्सिजन भयानक ज्वलनशील आहेत आणि हायड्रोजन व ऑक्सिजन हे खरे तर राख आहेत. हे बरोबर आहे. ते तेच आहे; रासायनिक राख. फक्त रासायनिक

राख. आता, त्या दोघांना मिसळा व तुम्हाला पाणी मिळेल. पण त्याचे विभाजन करा, तुम्हाला ऑक्सिजन व हायड्रोजन मिळेल, आता मागे जात राहा.

396 आता, यात खोल जात असता, आपण घेवू...आणि मी करु शकत नाही आता इथे कदाचित रसायन शास्त्रज्ञ बसलेला असेल. आणि मला हे सांगू द्या की मला याचे सूत्र माहीत नाही, कारण इथे कदाचित कोणी रसायन शास्त्रज्ञ हे ऐकत असेल. परंतु मी माझ्या स्वत:च्या नम्रतेने हे समजावून सांगू इच्छितो व मी विश्वास करीतो की देव ह्यामध्ये स्वत:ला प्रगट करील.

397 बघा, मी तो थेंब एक—एक—एक ब्लीचमध्ये टाकला. आणि काय झाले लगेचच तो काळा डाग निघून गेला. तो तुम्हाला परत हवा असेल तर तो तुम्हाला मिळणार नाही, तो निघून गेला. तुम्हाला तो परत दिसणार नाही. काय झाले? आता तुम्हाला त्यातून काही बाहेर येताना दिसत नाही. तुम्हाला दिसत नाही? का दिसत नाही? कारण त्याचे विभाजन झाले.

398 आता विज्ञान असे म्हणेल, की "त्याचे पूर्व आम्लात रुपांतर झाले."

399 पण ते आम्ल कुठून आले? बघितलं? तुम्ही म्हणाल, "ते काही घटकांतून आले." ठीक आहे. उदाहरणार्थ आपण म्हणूया की "धूरापासून आम्ल तयार झाले." धूर कुठून आले? बरे! आपण म्हणू, धूर रेणूपासून तयार झाले. रेणू कोठून आले? अणूपासून. अणू कोठून आले? विद्युतकणांपासून. ते कोठून आले? प्रचंड प्रकाशापासून. बघा, रसायन शास्त्रज्ञानांच्या शोधावरुन तुम्ही भटकत बसाल. आणि जर हे घटक निर्मिती आहे, तर ते एका निर्माणकर्त्याकडून यायला हवे.

400 तर मग, तुम्ही इथे दैवयोगाने बसले नाहीत. मी साडेबारा किंवा एक वाजेपर्यंत दैवयोगाने थांबवून ठेवले नाही. "नितीमानाची पावले परमेश्वराकडून आज्ञापिली जातात." बघितलं? त्याचे काहीतरी कारण आहे. तुम्हाला विश्वास ठेवण्यासाठी ते काही कारण आहे की तुम्ही विश्वास ठेवावा. तुम्हाला विश्वास न ठेवण्यासाठी काहीतरी कारण आहे. एकदम त्या शाईप्रमाणे.

401 आता आपण त्याचे विभाजन करुया, आता, पहिली गोष्ट, जसे आपण मागे जात राहू, आपण त्याला रेणूपर्यंत मागे आणू. आता, आपण एक रेणू घेऊया, मी म्हणेन, एक वेळचा रेणू 9, वेळचा रेणू 12, आता जर ते 11 असेल, तो लालसर होऊन बाहेर येईल. परंतु त्याला 12 असणे गरजेचे आहे, म्हणजे तो काळसर होईल.

402 मग ते आपण घेऊन अणूपर्यंत येऊ. तो अणू होता. आणि $9^6$ वेळा $+4^3$, बरोबर $16^{11}$ इतके. वेळा जर तो 16 च्या 12 ($16^{12}$) वेळा, तर तो जांभळा असेल. पाहा? मग तुम्ही त्याचे विभाजन करीत खाली येऊ शकता.

403 हे असे दाखविते की, सुरुवात करण्यासाठी तिथे मागे पलीकडे काहीतरी होते. हे फक्त सामान्य ज्ञान आहे. ही निर्मिती आहे. तिला निर्माणकर्ता असायलाच हवा. आणि ते निर्माणकर्त्याकडून बाहेर आले व नंतर अशाप्रकारे वेगळ्यारुपात निर्धारित केले गेले. आता, विज्ञान अणू $B_{16}$ बारा वेळा किंवा चौदा वेळा, किंवा असे काहीतरी करुन ते बनवू शकत नाही. देवाने ते केले पाहीजे.

404 आणि मग ते अणूच्या रुपात खाली आल्यानंतर विज्ञान त्याला स्पर्श करण्यास सुरुवात करु शकते. आणि मग ते रेणूच्या रुपात बाहेर येते, व त्यांना अधिक चांगले दिसू लागते. आणि मग ते रेणूतून, आणखी काहीतरी स्वरुपात खाली येते. आणि, प्रथम ते रासायनिक द्रव्याच्या स्वरुपात येते, व मग ते त्याला एकत्र मिश्रित करतात.

405 आता, मनुष्य, त्याने पाप करण्याअगोदर. आता मी बंद करतोय. पण तुम्ही हे चुकवू नका. जेव्हा मनुष्याने पाप केले. त्याने स्वत:ला देवापासून वेगळे केले, आणि ती मोठी दरी पार केली, व स्वत:ला बाजूला मरणात झोकले. तो निघून गेला. तेथे परतीचा मार्ग नव्हता. अगदी बरोबर. त्याच्याकडे परत जाण्याचा मार्ग नव्हता. पण जेव्हा त्याने असे केले, तेव्हा देवाने रक्तासाठी पर्यायाने कोकरु, किंवा बकरी किंवा मेंढी याचा स्विकार केला; ज्याच्याविषयी आदाम किंवा हाबेल, दरीच्या दुसऱ्या बाजूला बोलले.

406 त्या पलीकडे, तो देवाचा पुत्र आहे. तो देवाची संतती आहे. तो पृथ्वीचा वारीस आहे. तो निसर्गावर सत्ता करु शकतो. तो बोलून निर्मिती करु शकतो. कारण, तो स्वतः निर्माणकर्ता आहे. तो देवाची संतती आहे.

407 पण, ज्यावेळी त्याने पार केले, त्याने पुत्रत्वापासून स्वतःला वेगळे केले. तो स्वभावतः. पापी आहे. तो सैतानाच्या हातात व त्याच्या सत्तेखाली गेला.

408 आणि परमेश्वराने अर्पण म्हणून, रासायनिक द्रव, रक्त घेतले, परंतु बैलाच्या व बकऱ्याच्या रक्ताने पापाचा वियोग झाला नाही. तर त्याने पाप केवळ झाकले गेले. जर माझ्या हातावर तांबडा डाग आहे, व तो मी पांढऱ्या रंगाने झाकला, तर तो तांबडा डाग तेथेच आहे. बघितलं, तो डाग तसाच आहे.

409 परंतु परमेश्वराने स्वर्गातून खाली, पापासाठी ब्लीच पाठवले. ते त्याच्या स्वतःच्या पुत्राचे रक्त होते. जेव्हा आपले कबूल केलेले पाप देवाच्या ब्लीचमध्ये पडते, तेव्हा ते पुन्हा शोधण्याचा प्रयत्न करा. त्या पापाचा रंग मध्यस्थाच्या मागे तोपर्यंत जातो की तो शेवटी मुख्य दोष लावणारा, सैतान, ह्याच्यावर जातो व न्यायाच्या दिवसापार्यंत त्याच्यावरच राहतो.

410 पुत्राबरोबर काय होते? तो पुन्हा पित्याबरोबर परिपूर्ण सहभागितेमध्ये येतो, दरीच्या दुसऱ्या बाजूला उभा राहतो; त्याच्याविरुध्द पापाबद्दल कोणतीही आठवण न ठेवता. काहीच नाही. तेथे ब्लीचचा कोणताच डाग दिसत नाही. तो मुक्त आहे. हालेलुया! त्याचप्रमाणे जसे की त्या क्लोरोक्स किंवा शाईप्रमाणे, ती शाई पुन्हा शाई राहत नाही, कारण तिचे विभाजन करुन तिला परत पाठवण्यात येते. आणि जेव्हा कबूल केलेले पाप कबूल केले जाते व बुडविले जाते...एक पुरुष किंवा एक स्त्री जेव्हा येशू ख्रिस्ताच्या रक्तामध्ये बुडविले जातात, ते सर्व लक्षणांना मारुन टाकते आणि पापाचा प्रत्येक रेणू सैतानाकडे परत जातो, व त्याच्यावर थोपविला जातो, न्यायाच्या दिवसापर्यंत; जेथे त्याचे सार्वकालिक गंतव्य अग्नीच्या सरोवरात फेकून देणे आहे. आणि ती दरी पुलाने जोडली जाते व पुन्हा आठविली जात नाही. व मनुष्य नीतिमान, परमेश्वराचा पुत्र असा उभा राहतो. साधेपणा!

411 मोशे, बैलाच्या व बकऱ्याच्या रक्ताखाली, परमेश्वराच्या वचनाच्या कबूलीने! आणि देव त्या साध्या मनुष्याला घेऊन, आपले वचन त्याच्या मुखात घालू शकला. आणि त्याने सिध्द केले की तो यहोवाचा दास होता, कारण तो चालला व यहोवा त्याच्याशी दृष्टान्तामधून बोलला. तो चालला व त्याने आपले हात पूर्वेकडे पसरले.

412 आणि, आता, लक्षात घ्या, देव त्याच्याशी बोलला होता. हा देवाचा विचार आहे. देव मनुष्याचा वापर करतो. देव त्याच्याशी बोलला. हे बरोबर आहे. तो म्हणाला, “जा तुझ्या हातातली काठी, पूर्वेकडे पसर, व म्हण ‘माश्या!’”

413 मोशे, जो बकरी, मेंढी ह्यांच्या रक्ताखाली होता, काठी घेऊन चालत पूर्वेकडे गेला. **परमेश्वर असे म्हणतो**, “माश्या होवो!” कधीच माशीचा आवाज ऐकला नाही. चालून परत आला. ते अगोदरच परत बोलले गेले होते. तो एक विचार आहे, तो बोलला गेला,

व्यक्त करण्यात आला. मग तो देवाचा शब्द बनतो. तो मनुष्याच्या मुखात येतो, एक साधा मनुष्य बैलाच्या रक्ताखाली आहे, बैलाच्या किंवा बकऱ्याच्या.

414 पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, एक हिरवी माशी तिथे उडू लागली. नंतर काय झाले तुम्हाला माहीत आहे, त्या प्रत्येक पाच पाऊंड एवढ्या माश्यानी 1 गुंठा जागा व्यापली होती. ते काय होते? परमेश्वराचा शब्द होता जो मोशेद्वारे बोलला गेला, निर्माणकर्ता. कारण, रक्ताखाली असताना, तो परमेश्वराच्या उपस्थितीत उभा होता, व त्याचे शब्द हे त्याचे स्वतःचे शब्द नव्हते.

415 "जर तुम्ही माझ्यामध्ये व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली, तर तुम्ही जे काही मागाल ते तुम्हाला दिले जाईल." मंडळी कशावर उभी आहे?

416 "बेडके होवो!" आणि देशामध्ये एकसुध्दा बेडुक नव्हता. एका तासात, तेथे दहा–फूट खोल एवढे झाले. ते काय होते? तो देव होता. निर्माणकर्ता स्वतःला एका साध्या मनुष्यामध्ये लपवत होता.

417 आता मला तुम्हाला काहीतरी विचारायचे आहे. जर एका बैलाचे किंवा बकरीचे रक्त ब्लीच म्हणून वापरले जाते, जे केवळ झाकू शकते, व एका मनुष्याला अशा स्थितीत आणते की त्याने परमेश्वराचा निर्मितीक्षम शब्द बोलून माश्या अस्तित्वात आणाव्या, तर तुम्ही येशू ख्रिस्ताच्या रक्ताचा ब्लिच म्हणून वापरावर का अडखळता जे एक खार किंवा असे काही अस्तित्वात आणू शकते?

418 तुम्ही असे करु नका. साधेपणामुळे अडखळू नका. विश्वास करा की तो आजही देवच आहे. ओह, माझ्या! पापांची क्षमा! अरे, कसे मी इच्छितो मी करु शकलो असतो…

419 मग मार्क 11:22 मध्ये, "जो कोणी ह्या डोंगराला तू उपटून समुद्रात 'टाकला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल. अरे, जे तुम्ही म्हणता ते मिळवू शकता."

420 माझ्याकडे तीन–चार पान आहेत. आपल्याला ती सोडावी लागतील. धन्यवाद.

421 देव स्वतःला साधेपणात लपवितो. तुम्हाला हे दिसत नाही काय? कुठेतरी काहीतरी चुकीचे आहे. कुठेतरी काहीतरी चुकीचे आहे. जेव्हा देव एखादे विधान करतो, तो खोटे बोलू शकत नाही. त्याने वचन दिले. बघितले? तो साधेपणात लपतो. हे इतकं सरळ आहे!

422 सुशिक्षित व विद्वान म्हणतात, "अहा! हे…अरे! हे दूरसंवेदन किंवा असे काहीतरी आहे. तुम्हाला माहीत आहे. हे एक…"

423 देव स्वत:ला वेळेच्या प्रवाहामध्ये मागे झाडून नेऊन, नेमके काय घडले ते तुम्हाला सांगू शकतो, तुम्ही आज कसे आहा, व तुम्ही पुढे कसे असणार हे तुम्हाला सांगू शकतो. ते कसे अजूनही येशू ख्रिस्ताच्या विरंजक पदार्थाद्वारे आहे, जो एका पाप्याला घेऊन त्याला विरंजकाद्वारे शुध्द करतो आणि तो मनुष्य देवाच्या उपस्थितीत उभा राहतो.

424 "आणि जर तुम्ही माझ्यामध्ये व माझी वचने तुम्हामध्ये राहिली तर तुम्ही जे इच्छिता ते मागू शकता व ते केले जाईल. जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवितो, तो मी जी कामे करतो, तो तोही करील."

425 "तुम्ही मला दोष कसा लावता? ओह, तुमचे नियमच असे सांगत नाही काय ज्याच्याकडे देवाचे वचन आले, म्हणजे संदेष्टे, त्यांना तुम्ही 'देव' नाही म्हणत काय? आणि मग तुम्ही मला कसा दोष लावू शकता जेव्हा मी देवाचा पुत्र आहे असे माझ्या म्हणण्यामुळे?" ते समजण्यात चुकले. ते समजण्यात चुकले.

426 आता, मंडळी, जे संदेश, आज रात्रीपासून पुढे येणार आहेत, ते समजण्यात चुकू नका. बघितलं? आपण ज्या दिवसात राहत आहोत तो ओळखा. आणि हे लक्षात ठेवा की, येशू ख्रिस्ताचे रक्त तुमची पापे तुम्हापासून एवढ्या दूर नेते की ती देवाला पुन्हा आठवत देखील नाहीत. ते सर्व डाग काढून टाकते.

पापाने किरमीजी रंगाचा डाग लावला होता,
त्याने तो धुवून बर्फासारखा शुभ्र केला.

मग सिंहासनासमोर
मी त्याच्यामध्ये पूर्ण असा उभा राहतो.

427 अरे! मी पूर्ण कसा असू शकतो? मी पूर्ण कसा असू शकतो? कारण ते रक्त, मी नव्हे, तर ते रक्त माझ्यामध्ये व देवामध्ये उभे राहते. मी त्याचा स्वीकार केला. व त्याने ते ठेवले...मी एक पापी आहे. पण तो देव आहे. परंतु रसायनशास्त्र माझ्यापुढे उभे राहते. पापाचा नाश. तेव्हा देव विरंजकामध्ये (ब्लीच) असलेला पाणी जसा शुभ्र आहे, तसे मला पाहतो. माझे पाप निघून गेले. ते त्याच्यापर्यंत पोहचू सुध्दा शकत नाही. कारण तेथे एक बलिदान ठेवले आहे.

428 देवाच्या सरळ वचनावर विश्‍वास करण्यासाठी आपला विश्‍वास कुठे आहे? फक्त देव काय बोलला, त्याला त्याच्या वचनाप्रमाणे घ्या. देव स्वतःला एका नम्र व छोट्या कळपात, साधेपणामध्ये लपवितो. परंतु पुढे एखाद्या दिवसांत तो स्वतःला प्रगट करील, तसेच जसे मागील दिवसात केले आहे. काय तुम्ही त्याच्यावर प्रेम करता. [मंडळी “आमेन” म्हणते—सम्पा.]

मी त्याच्यावर प्रेम करीतो, मी त्याच्यावर प्रेम करीतो
कारण त्याने प्रथम माझ्यावर प्रेम केले
आणि माझे तारण
कालवरीच्या झाडावर विकत घेतले

429 काय तुम्ही त्याच्यावर प्रेम करता? [मंडळी “आमेन” म्हणते—सम्पा.] आह, काय तो विस्मयकारक नाही का? [“आमेन.”] मी आशा करतो व विश्‍वास करतो की ज्या उद्देशाने हा संदेश प्रचारला गेला तो पूर्ण करील, तो अशा जागी आणील की तुम्ही केवळ चांगल्या गोष्टींकडे बघणार किंवा काही...जेव्हा तुम्ही देवाला महानतेमध्ये पाहता, बघा की तो किती नम्र आहे, आणि मग तुम्हाला देव दिसेल. त्यास कशात शोधू नका...

430 जेव्हा अलीशा त्या गुहेमध्ये होता, तेव्हा धूर तेथून गेला, रक्त, मेघ, गर्जना, वीज चमकणे. आणि बघा, अशा सर्व प्रकारच्या संवेदना होत्या, चेहऱ्यवर रक्त व हातावर रक्त आणि संवेदना आणि सर्वकाही. त्याने तो संदेष्टा घाबरला नाही. तो तिथे पडून राहिला त्याने एक मंद आवाज ऐकला (ते काय होते?) वचन, नंतर त्याने आपला चेहरा झाकला व तो बाहेर पडला. बघितले. तेच ते होते.

431 लक्षात ठेव, मित्रा, मोठ्या व महान गोष्टींसाठी बघू नका...तुम्ही म्हणता, “परमेश्‍वर मोठ्या, व महान गोष्टी बोलतो. अशी एक वेळ येईल की तिथे *हे*, *ते* व *आदि* अशा मोठ्या महान गोष्टी असतील.” मी विश्‍वास धरतो की मी ज्याविषयी बोलतो ते तुम्ही पकडत आहा. बघितले? “महान, मोठ्या गोष्टी, बघितलं!” आणि, अरे, जेव्हा हे पूर्ण होईल ते *ह्या*प्रमाणे मोठे व महान असेल.

432 आणि ते इतके नम्र असेल की ते पूर्णपणे चुकवाल फक्त जात राहा. बघितलं? आणि तुम्ही मागे वळून पाहाल व म्हणाल, “बरे, हे असे झाले नाही...” पाहा ते घडून गेलं व

तुम्ही बघितलेसुध्दा नाही असेच गेले. बघा, हे इतके सरळ आहे, पाहा? देव साधेपणात राहतो. स्वत:ला महानतेत प्रगट करण्यासाठी. त्याला काय महान बनविते? कारण तो स्वत:ला साधे बनवू शकतो.

433 एक मोठा, महान व्यक्ती स्वत:ला साधे बनवू शकत नाही; त्याला मोठ्या पडदावर राहणे आहे. बघितलं? परंतु तो अजून पुरेसा मोठा नाही. जेव्हा पुरेसा मोठा होतो, तेव्हा तो *असा* खाली येतो, तुम्ही बघा, तो स्वत:ला नमवू शकतो.

434 जसे त्या म्हाताऱ्या संताने वर शिकागोमध्ये म्हटले, "तो मनुष्य त्याच्या शिक्षणाने व गोष्टींनी वर गेला." म्हणाला, "तो खाली आला. खटला चालविला, डोके खाली करुन. हरलेला असा बाहेर आला." तो म्हणाला, "जर तो जसा खाली उतरला होता तसा वर जाईल, ज्या पद्धतीने तो खाली उतरला होता त्याच पध्दतीने तो वर गेला." बरे, हे बरोबर आहे. बघितलं?

435 तुम्ही स्वत:ला नम्र बनवा. फक्त नम्र राहा. असाधारण बनण्याचा प्रयत्न करु नका. फक्त—फ़क्त येशूवर प्रेम करा. बघा? बोला. "प्रभू जर माझ्या हृदयामध्ये काही कपट असेल, जर तेथे काही चुकीचे असेल, बापा मला तसे राहायचे नाहीये, तू ते दूर कर, मला तसे रहायचे नाहीये. ओह त्यादिवशी माझी गणना त्यांच्यातील एकात व्हावी माझी इच्छा आहे. आणि मी पाहतो की तो दिवस जवळ येत आहे."

436 तुम्ही पाहता काय, ही शिक्क्यांची सुरुवात आहे, जर परमेश्वर ते आपणासाठी उघडेल. लक्षात ठेवा, तो एकटाच हे करु शकतो. आपण त्यावर अवलंबून आहोत. देव तुम्हाला आशिर्वाद देवो.

437 आणि आता मला वाटते की, आपल्या पाळकांकडे तुम्हाला बोलण्यासाठी काही आहे किंवा त्यांना तुम्हाला काही सांगणे आहे, आपण पुन्हा दुपारी भेटण्याअगोदर. आणि मला वाटते सभा...गीतांची सभा साडे सहा वाजता, पाळक? आणि ती...[भाऊ नेवील म्हणतात, "साडे सहा वाजता सुरु होईल"—सम्पा.] साडे सहा. आणि...["दरवाजे सहा वाजता उघडतील."] दरवाजे सहा वाजता उघडतील. गीतांची सभा साडे सहा वाजता सुरु होईल.

438 आता जर देवाची इच्छा असेल, तर मी आज रात्री सात शिक्क्यांचे पुस्तक ह्यांविषयावर बोलेन. आणि मग सोमवारी रात्री, (सफेद) पांढरा घोडेस्वार, मंगळवार रात्री...काळा घोडेस्वार. आणि मग सहाव्या...चौथ्या, पाचव्या आणि सहाव्यामध्ये जाईन आणि नंतर रविवार रात्र. पुढच्या रविवारी सकाळी कदाचित आरोग्य दानासाठी सभा. मला नाहीत नाही.

439 आता, लक्षात ठेवा, आपण प्रभूला समर्पित आहोत, आपण स्वत: व मंडळी, देवाच्या सेवेसाठी. देव तुम्हाला आशिर्वाद देवो.

440 मी—मी एक तास उशीरा आहे. तुम्ही मला क्षमा कराल का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] मी—मी, बघा, माझा तसे करण्याचा हेतू नव्हता. पण, बघा, मी—मी तुमच्याबरोबर फक्त हा आठवडा असेन व पुन्हा मला जाणे आहे. आणि मला माहीत नाही की मी कोठे जाईन, फक्त जेथे तो नेईल तेथे. आणि जे शक्य होईल ते प्रत्येक मिनिट मला द्यावा असे वाटते, कारण मला तुमच्याबरोबर अनंतकाळ घालवायचा आहे.

देव तुम्हाला आशीर्वाद देवो. आता भाऊ नेविल.

***देव स्वत:स साधेपणात लपवितो, मग त्याचप्रकारे स्वत:स प्रगट करतो*** MAR63-0317M

(God Hiding Himself In Simplicity, Then Revealing Himself In The Same)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रॅन्हम यांनी रविवार सकाळी, 17 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रॅन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**छपाईच्या हक्काची सूचना**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org